सप्टेंबर २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य




## महा-उद्योग-राष्ट्र

# सिंहस्थाचे ध्वजारोहण



नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सुरू असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात दिगंबर आखाडा,निर्मोही आखाडा आणि निर्वाणी आखाड्यांचे ध्वजारोहण झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ नेते अमित शाह उपस्थित होते.

वर्ष ६७ वे | अंक ३ | सप्टेंबर २०१५

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in




६

## महाराष्ट्र आता 'महा-उद्योग-राष्ट्र'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून राज्यात उद्योगवाढीसाठी पूरक वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता जनरल मोटर्स आणि फॉक्सकॉनसारख्या कंपन्यांनी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राबरोबर करार केले आहेत. यामुळे ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात होणार असून ५० ते ६० हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.

## एसटी प्रवास अधिक सुखकर



परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते वाहतूक विभागाच्या कायापालटासाठी सज्ज झाले आहेत. एअरपोर्ट्सप्रमाणेच अत्याधुनिक बस पोर्ट्सची संकल्पना, राज्यातील दुर्गम भागांना जोडणाऱ्या आधुनिक बसेस, खाजगी वाहतूक सेवांचे नियमितीकरण या सारख्या बऱ्याच गोष्टींचा या संकल्पनेत समावेश आहे.

१८

## महाराष्ट्राचे व्याघ्र वैभव

महाराष्ट्रात वाढत असलेले वाघ समृद्ध जंगलांच्या वाढीला अनुकूल बनत आहेत. महाराष्ट्र शासनाने उचलेल्या ठोस पावलांमुळे हे शक्य झाले. आगामी काही काळात महाराष्ट्र हा पुन्हा वाघांचा प्रदेश होईल यात शंका नाही.



१०




## प्रश्न सुटले, 'समाधान' मिळाले...

नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेले पहिले समाधान शिबिर अत्यंत यशस्वी झाले. या शिबिरात नागरिकांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले विविध प्रश्न मार्गी लागले. या पहिल्या समाधान शिबिराचे यश लक्षात घेऊन नुकतेच दुसरे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. नागरिकांचे प्रश्न तातडीने कसे सुटतील, याकडे मुख्यमंत्र्यांनी बारकाईने लक्ष दिले.

२२

## गाव बाप्पांचे

मुंबईपासून अवघ्या ८० कि.मी.वर असणारे पेण या गावाची लोकसंख्या जवळपास २५०००. वरकरणी बघायला गेले तर भारतातले कोणतेही खेडे दिसते तसेच पेण हे छोट्या घरांचे, भात-शेतीचे आणि खडबडीत रस्त्यांचे गाव आहे. तरीही पेणला आज गणपतीचे गाव म्हणून स्वत:ची ओळख आहे. हे गाव दरवर्षी २.५० ते ३ लाख गणपतीच्या मूर्ती बनवते.

४४



## याशिवाय

- दिल्लीतील महाराष्ट्र
- वैभव गडकिल्ल्यांचे
- प्रेरणा
- निरामय



## सप्रेम नमस्कार

### माहितीपूर्ण


लोकराज्यच्या ऑगस्ट अंकातील 'जलयुक्त शिवार' योजनेवरील लेखाबरोबरच 'मेक इन महाराष्ट्र'वर आधारित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अमेरिका दौरा, पंढरपूरचे आषाढीचे वृत्तांकन तसेच गडकिल्ले, प्रेरणा, संस्कृती, भ्रमंती ही नेहमीची सदरे अत्यंत वाचनीय व माहितीत भर घालणारी आहेत.

**– कौस्तुभ नाईक, जि. कोल्हापूर**

### शाश्वत विकास


जलयुक्त शिवार योजनेच्या यशस्वी वाटचालीवर आधारित असलेला लोकराज्यचा ऑगस्टचा अंक शाश्वत पाणी, शाश्वत सिंचन, शाश्वत शेती आणि शाश्वत विकासाची दिशा दर्शवणारा आहे. एकूणच अंक भरगच्च आणि वाचनीय झाला आहे.

**– सुधाकर वाघमारे,**
**मेरा, जि. बुलडाणा**




### वाचनाची पर्वणी

लोकराज्यच्या कुंभमेळा विशेषांकात पौराणिक महत्त्व तपोभूमी नाशिक हे लेख वाचतांना वाटते खरच महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असणारी सुजलाम् सुफलाम् भूमी आहे. गोदावरीत स्नान करून भाविकांचे स्वच्छ झालेले मन स्वच्छतेचा निर्धारच करतील. यातील सर्वच लेख वाचकांना परीसस्पर्श करणारे आहेत. **– पंडित शंकर गवळी, येवला, नाशिक**




### विचारांना नवी दिशा

जुलै २०१५ च्या अंकातील कुंभमेळ्यासाठी महाराष्ट्र सज्ज, सिंहस्थासाठी प्रशासन सज्ज, नाशिकची समृद्ध संस्कृती, रम्य हे नाशिक, योगसाधना, निर्धार स्वच्छतेचा, महाराष्ट्राची मानचिन्हे, स्वप्नांना जोड परिश्रमाची आदी लेख, वाचनीय, मननीय व विचाराला नवी दिशा देणारे आहेत. मुखपृष्ठ अत्यंत बोलके व आकर्षक वाटले. पुढील अंकांना शुभेच्छा.

**– सौ. प्रमिला जोशी,**
**ता. चिखली, जि. बुलढाणा**

### प्रतिबिंब महाराष्ट्राचे

जुलै २०१५ च्या लोकराज्यच्या अंकातील पर्वणी श्रद्धेची, भक्तिची अन् पर्यटनाची–नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा याद्वारे ऐसी अक्षरे रसिके दर्शवीन, यात थोड्या फरकाने ऐसी तीर्थक्षेत्रे भाविके दर्शविली असे म्हणणे उचित होय. आरसा हा आपले प्रतिबिंब दर्शवितो. लोकराज्य हा आरसा आहे.

**– अनंत सुतार, साहील,**
**मु.पो. ता. चिपळूण, जि. रत्नागिरी**




### आकर्षक

पर्वणी श्रद्धेची, भक्तीची अन् पर्यटनाची हा लोकराज्य मासिकाचा विशेषांक वाचण्यात आला. पौराणिक महत्त्व असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने प्रकाशित झालेला विशेषांक अत्यंत उत्कृष्ट व दर्जेदार आहे. समाविष्ट लेख व मुखपृष्ठाच्या प्रभावी मांडणीमुळे तो आकर्षक झाला आहे.

**– सु.ना. गावंडे, विद्यापीठ ग्रंथपाल,**
**महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर**




### हृदयस्पर्शी

जुलै २०१५ चा अंक मला अतिशय मनापासून आवडला लोकराज्याचे सर्वच अंक वाचकांच्या हृदयाला स्पर्श करून जातात. प्रत्येक अंक अतिशय नावीन्यपूर्ण साहित्याने ओतप्रोत भरलेला व मनाला मोहून टाकणारा असतो. हा अंक नाशिकच्या ऐतिहासिक वैभवाच्या रसभरित वर्णनाने व्यापलेला आहे.

**– शं. स. कुरुडे, नांदेड**

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

---

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# महा-उद्योग-राष्ट्र

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' या उपक्रमास प्रभावीरीत्या चालना दिली असून त्याच अनुषंगाने महाराष्ट्रात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस 'मेक इन महाराष्ट्र' हा उपक्रम राबवत आहेत. यामुळे गेल्या १० महिन्यात गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावरील विश्वास वाढला आहे. ही बाब या महिन्यात फॉक्सकॉन आणि जनरल मोटर्स या दोन मोठ्या कंपन्यांचे महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार झाले यावरून पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. या दोन्ही सामंजस्य करारांचे मूल्य हे ६५ हजार कोटी रुपये असून, या दोन्ही प्रकल्पांमुळे ५०-६० हजार व्यक्तींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्रात होणाऱ्या गुंतवणुकी आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संधी याविषयी या अंकात विशेष लेख समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात व्याघ्रसंवर्धन आणि संरक्षण अतिशय प्रभावीपणे केले जात आहे. विशेषत: विदर्भात वाघांची संख्या वाढत आहे. विदर्भातील ताडोबा अभयारण्याची ख्याती ही आता हमखास वाघदर्शन होणारे ठिकाण अशी झाली आहे .त्यामुळे या भागात पर्यटकांची संख्याही वाढते आहे. व्याघ्र आणि वनपर्यटनाला चालना मिळाली असून विदर्भ वाघांची राजधानी म्हणजेच टायगर कॅपिटल म्हणून आता नावलौकिकास येत आहे.

व्याघ्रसंवर्धनाच्या अनुषंगाने मंत्रालयात वनमंत्री श्री. सुधीर मुनंगटीवार यांच्या पुढाकाराने एका अभिनव प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे जाणीवजागृती होण्यास साहाय्य झाले. महाराष्ट्राच्या व्याघ्र प्रकल्पासाठी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी व्याघ्रदूत होण्यास मान्यता दिली तर श्रेष्ठ क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी वनसंरक्षण कार्यासाठी आपलेही योगदान देऊ केले आहे. यासंदर्भातील विशेष लेख या अंकात आम्ही समाविष्ट केला आहे.

सध्या राज्यात आणि विशेषत: मराठवाड्यात अत्यल्प पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मुख्यमंत्र्यांनी औरंगाबाद येथे जाऊन परिस्थितीची पाहणी केली आणि विविध निर्णय जाहीर केले. यामुळे आपद्ग्रस्त नागरिक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महासंचालनालयाची निर्मिती असलेला 'जय महाराष्ट्र' हा कार्यक्रम सह्याद्री वाहिनीवरील लोकप्रिय कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम झाला आहे. तसेच आकाशवाणीवरील दिलखुलास या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या महिन्यात २३ गावांनी लोकराज्य ग्राम होण्याचा सन्मान प्राप्त केला. या गावातील प्रत्येक घर आता लोकराज्यचे वर्गणीदार झाले आहे. लोकराज्यच्या वाढत्या लोकप्रियतेचा हा पुरावाच आहे.

हा अंक आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**




इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात जगात अव्वल समजल्या जाणाऱ्या फॉक्सकॉन कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला.
त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई.

# महाराष्ट्र आता 'महा-उद्योग-राष्ट्र'

**देशाचा विकास व्हायचा असेल तर तरुणांच्या हाताला काम मिळायला हवे. त्यासाठी देशातील मॅन्युफॅक्चरिंग अर्थात उत्पादन उद्योगाला चालना देण्याची गरज ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया'चा नारा दिला. देशाच्या विकासाचे इंजिन हे महाराष्ट्र आहे. त्यामुळे जास्तीत जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात होण्याची आवश्यकता होती, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून उद्योगवाढीसाठी पूरक वातावरण निर्माण करण्यास सुरुवात केली. देशाच्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्रा'चा नारा दिला. त्यासाठी राज्य, देश आणि विदेश पातळीवर प्रयत्न सुरू केले. त्यामुळे राज्यात आता जनरल मोटर्स आणि फॉक्सकॉनसारख्या जागतिक स्तरावरील महत्त्वाच्या कंपन्यांनी गुंतवणुकीची केवळ इच्छाच व्यक्त केली नाही तर तसे करार महाराष्ट्राबरोबर केले आहेत. यामुळे ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात होणार असून ५० ते ६० हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत.**




**वर्षा कुलकर्णी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून राज्यातील समस्यांचे मूळ काय आहे हे ओळखून त्यावर ठोस उपाय करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. ज्याप्रमाणे शाश्वत शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे हे ओळखून त्यांनी जलयुक्त शिवार योजना सुरू केली, त्याच पद्धतीने राज्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, त्यांच्या हाताला काम मिळावे, नवे उद्योजक तयार व्हावे यासाठी 'मेक इन महाराष्ट्रा'चा नारा दिला. तो प्रत्यक्षात येण्यासाठी सर्व बाजुंनी प्रयत्न सुरू केले. राज्यातील साठ टक्के जनता अद्यापही शेतीवर अवलंबून आहे. शेतीवरचे हे अवलंबित्व कमी करायचे असल्यास राज्यात उद्योगाने भरारी घेतली पाहिजे हे ओळखून त्यांनी पावले उचलायला सुरुवात केली. उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे परवाने कमीत कमी कसे लागतील, जाचक पण अनावश्यक अशा अटी कशा रद्द करता येतील याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले आहे. राज्यातून उद्योग बाहेर जाताहेत, की काय अशी परीस्थिती असतानाच मुख्यमंत्र्यांनी केवळ राज्यातील उद्योगांच्या वाढीसाठी पूरक वातावरण निर्माण केलेच शिवाय देश-विदेशातील उद्योगांना राज्यात गुंतवणूक करण्यासही प्रवृत्त केले. त्याचाच एक परिणाम म्हणून आज राज्यात एक लाख कोटी रुपयांच्यावर गुंतवणूक होणार असून लाखो लोकांना यातून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या रोजगार उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या स्वित्झर्लंडमधील डाव्होस, जर्मनी, अमेरिका, चीन, इस्राएल या देशांच्या दौऱ्यात त्यांनी उद्योगांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास उद्युक्त केले. त्याचे परिणाम आता दिसत असून महाराष्ट्रात मोठे उद्योग मोठी गुंतवणूक करणार आहेत.

**"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रयत्नांचे मी कौतुक करतो. आम्ही जवळपास सात बैठका घेतल्या, ज्यामध्ये राज्य सरकारचे पथक सहभागी झाले होते. फडणवीस हे खरोखर द्रष्टे नेते आहेत. महाराष्ट्रात विकासाभिमुख बदल झाला की देशातही तसे बदल होतील.**

**- टेरी गाऊ, फॉक्सकॉन"**

### फॉक्सकॉन कंपनीशी करार

डिजिटल, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात जगात अव्वल समजल्या जाणाऱ्या फॉक्सकॉन कंपनीशी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार ही कंपनी येत्या पाच वर्षांत पाच अब्ज डॉलर्स (सुमारे ३५ हजार कोटी) रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून ५० हजार रोजगार निर्माण होणार आहेत. सामंजस्य करारानुसार ही कंपनी राज्यात येत्या पाच वर्षांत पाच अब्ज डॉलर्स गुंतवेल आणि उत्पादन प्रकल्पासह संशोधन आणि विकास केंद्रही सुरू करेल. फॉक्सकॉनचे प्रकल्प मुंबई आणि पुणे दरम्यान उभे राहतील. तळेगाव येथे त्यांचा प्रकल्प असून राज्यातील ही आजवरची एकमेव एवढी मोठी गुंतवणूक असून देशातील बहुधा सर्वात मोठी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे ॲपलचे आयफोन आणि आयपॅड आता महाराष्ट्रात तयार होणार आहेत.

**"दोन महिन्यांपूर्वी मी चीन दौऱ्यावर गेलो होतो. त्यावेळी फॉक्सकॉनच्या उत्पादन प्रकल्पाला भेट दिली होती. त्यावेळी आमची प्राथमिक चर्चाही झाली होती. आता त्यांनी पाच बिलीयन डॉलर्सची गुंतवणूक राज्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा मला निश्चित आनंद आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले मेक इन इंडियाचे आणि आम्ही त्यास अनुसरून सुरू केलेले मेक इन महाराष्ट्रचे स्वप्न पूर्ण होणार आहे. राज्यात गुंतवणूक करण्याची ही एक योग्य संधी आहे असे मला वाटते. सध्याच्या आकडेवारीनुसार २०३० पर्यंत आपली इलेक्ट्रानिक्स वस्तूंची आयात ही कच्च्या तेलापेक्षा पुढे जाईल. या पार्श्वभूमीवर या सामंजस्य कराराला खूप महत्व आहे. प्रगतीच्या या वाटचालीत महाराष्ट्र आपला सहयोग नोंदवू इच्छितो. आम्ही आता आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

जागतिक पातळीवर उत्पादन क्षेत्रात चीन आता हळूहळू मागे पडणार आहे याची भाकिते जगभरातील अर्थतज्ज्ञ करत आहेत. पण त्याचबरोबर ही चालून आलेली संधी कोण साधेल त्यावर बरेच अवलंबून आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे फॉक्सकॉनशी सामंजस्य करारात महाराष्ट्र आघाडीवर राहिला. त्यामुळे ही कंपनी चीनप्रमाणे महाराष्ट्रालाही गुंतवणुकीसाठी प्राधान्य देणार आहे. ही कंपनी महाराष्ट्रात येत असल्याने अनेक लहानसहान कंपन्यांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. फॉक्सकॉनचे संस्थापक अध्यक्ष टेरी गाऊ यांनी स्वत:च ही गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे.

एकीकडे गेल्या काही वर्षात राज्यातील उद्योग बाहेरच्या राज्यात जाण्याचे प्रमाण वाढले होते, नवीन गुंतवणूक अपेक्षेपेक्षा कमी होत होती, पर्यायाने राज्यात रोजगारनिर्मितीच कमी होत होती.



## महाराष्ट्र पुन्हा क्रमांक एकचे राज्य

गेल्या दहा महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यात यश आले आहे. भारतीय राज्यांमध्येच गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी स्पर्धा वाढली आहे. मात्र महाराष्ट्राकडे अधिकाधिक गुंतवणूकदारांना ओढण्यासाठी आम्ही उद्योगस्नेही धोरण स्वीकारले आहे. आगामी काही काळात महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य होईल. महाराष्ट्राची स्पर्धा केवळ इतर राज्यांशी नाही; तर अनेक देशांशी आहे.

उद्योग उभारणीसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या महाराष्ट्राने कमी केल्या आहेतच पण त्याचबरोबर जमीन उपलब्ध करून दिली आहे. एमआयडीसीमधल्या वापराविना असलेल्या जमिनी उद्योगांना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचबरोबर जमीन अधिग्रहण सोपे केले आहे. महाराष्ट्रात शेतीची जमीन अकृषक करण्याची प्रक्रिया सुलभ केल्याने उद्योगांना जमिनीचा प्रश्न नाही. त्याचबरोबर उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. नागपूर-मुंबई हा कम्युनिकेशन एक्सप्रेस रस्ता होणार आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र जोडला जाईल. उद्योगांसाठी हा रस्ता खूपच महत्त्वाचा आहे. यामुळे दुष्काळी प्रदेशाचा विकास होण्यास हातभार लागेल. त्याचबरोबर बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्ससारखे आणखी काही प्रकल्प मुंबईच्या अवतीभवती करता येतील का याचीही चाचपणी सुरू असून काही ठिकाणी त्याची शक्यता निर्माण झाली आहे.
उद्योगवाढीसाठी अशा कॉम्प्लेक्सची मुंबई परिसरात आवश्यकता आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्येही आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याच्या दिशेने आम्ही प्रयत्न करत आहोत.

### फॉक्सकॉनविषयी...


**इलेक्ट्रॉनिक्स आणि तदनुषांगिक उत्पादने बनविणारी फॉक्सकॉन ही जगातील एक अत्यंत नामवंत कंपनी असून यात १० लाखाहून अधिक लोक काम करतात. जगातील नामवंत कंपन्यांसाठी फॉक्सकॉन डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने बनवित आहे. तैवान, हाँगकाँग आणि लंडन येथील शेअर बाजारात नोंदणीकृत असलेली ही कंपनी जगातील ५०० नामवंत कंपन्यांपैकी एक आहे. ॲपलसह अन्य कंपन्यांसाठी फॉक्सकॉन मोबाइल हँडसेटचे उत्पादन करते. १९७४ साली तैवानमध्ये नोंदणी झालेल्या या कंपनीने १९८८ पासून चीनमध्ये गुंतवणूक सुरू केली.फार्चुनने २०१४ मध्ये जाहीर केलेल्या जगातील सर्वोत्तम ५०० कंपन्यांमध्ये फॉक्सकॉनला ३२ वे नामांकन प्राप्त झाले होते. फॉक्सकॉनच्या समूहात १४ अन्य कंपन्या आहेत.**

FOXCONN 鴻海科技集團

शेतीवर ताण वाढत होता, अशा वेळी सर्वसामान्य कामगारांचे व शेतीचे हीत जपत एक उद्योगनीती आत्मसात करण्याची गरज होती. यासंदर्भात तातडीने आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा देण्याचे मुख्यमंत्र्यांनी केवळ उद्योगांना वचन दिले नाही तर त्याची कार्यवाहीही केली. त्यामुळे नागपूरच्या मिहानमध्ये अनेक उद्योगांनी आपली गुंतवणूक वाढविली आणि नवे उद्योग आले. जनरल मोटर्सची गुंतवणूकही महाराष्ट्रात खेचण्यात मुख्यमंत्र्यांना यश आले आहे.

### जनरल मोटर्सशी करार

पुण्याजवळ तळेगाव येथे जनरल मोटर्सचा प्रकल्प सुरू असून गुजरातचा प्रकल्प बंद करून तळेगावच्या प्रकल्पाचाच विस्तार करण्याचा निर्णय या कंपनीने घेतला आहे.सरकारने या कंपनीला जागाही दिली आहे. करारानुसार जनरल मोटर्स ही अमेरिकन कंपनी महाराष्ट्रात एकूण ६४०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करणार आहे.



**वाहन उत्पादनात जगात अव्वल समजल्या जाणाऱ्या जनरल मोटर्स कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री सुभाष देसाई.**



## राज्यात गुंतवणूकदार आकर्षित

गेल्या दहा महिन्यात महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्राने मोठी झेप घेतली आहे. भविष्यातल्या औद्योगिक भरभराटीची आम्ही पूर्वतयारी केली आहे. इतर राज्यांच्या तुलनेत उद्योगांसाठी महाराष्ट्रच योग्य कसा हे आम्ही उद्योगपतींच्या मनावर बिंबवण्यात यशस्वी झालोय. पूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी अनेक परवाने लागायचे. आता या प्रक्रियेत सुलभता आणली आहे. ७५ परवान्यांवरून आम्ही २५ परवाने केले आहेत. या परवान्यांची संख्या अजून कमी कशी करता येईल यावर काम करतोय. उद्योगांना लालफितीत अडकवण्यापेक्षा त्यांच्यासाठी लाल गालिचा घालण्यावर अधिक भर आहे.

पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया'ची घोषणा केली आहे. मेक इन महाराष्ट्राला आणखी गतिमान केल्याशिवाय मेक इन इंडियाचे स्वप्न साकार होणार नाही. त्यामुळे महाराष्ट्राला सर्व विदेश दौऱ्यात, मोठ्या गुंतवणूक निर्णयात आणि विदेशी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे महाराष्ट्राची 'मेक इन इंडिया'त घोडदौड सुरू आहे.

महाराष्ट्राला मोठी औद्योगिक संस्कृती आहे. महत्त्वाचे म्हणजे सुशिक्षित मनुष्यबळ येथे उपलब्ध आहे. इंग्रजी भाषेची उत्तम जाण आणि संवाद कौशल्य हे देशात महाराष्ट्रात अधिक आहे. महाराष्ट्र देशात उद्योगाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर राहील यासाठी जे जे शक्य आहे ते आम्ही करण्याचा प्रयत्न करत आहोत. अनेक ठिकाणी केंद्राच्या आणि राज्याच्या अटी समांतरपणे चालतात. त्यात काही प्रमाणात राज्यातील अटींबाबत सवलत देण्यात येत आहे. अशा सवलतींमुळे उद्योगवाढीचा वेग वाढतो, असे आमच्या लक्षात आले आहे. हे करत असताना मात्र कोठेही अनावश्यक तडजोडीला स्थान देण्यात आलेले नाही. सर्व कारभार स्वच्छ आणि पारदर्शी करण्यावर मुख्यमंत्र्यांचा भर आहे.



जगातील वाहन उत्पादनात आघाडीवर असलेल्या या कंपनीने महाराष्ट्रात अधिकाधिक वाहनांची निर्मिती करता यावी यासाठी पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथील प्रकल्पाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीची तळेगाव येथील वाहननिर्मितीची क्षमता १,७०,००० युनीट्स इतकी आहे. या प्रकल्पाच्या क्षमता वाढीसाठी ४.३ बिलीयन अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक कारच्या वेगवेगळ्या मॉडेलसाठी (उदा. बिट, सेल आणि स्पार्क) केली जाईल. देशांतर्गत वाहनांची पूर्तता केल्यानंतर २०१४ साली चिली या देशाला पहिली निर्यात सुरू केली. या प्रकल्पासाठी तीनशे एकर जागा महाराष्ट्रात औद्योगिक विकास महामंडळाकडून ९५ वर्षांच्या कराराने

### जनरल मोटर्सविषयी...

**'जनरल मोटर्स अर्थात जीएम या बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्यालय अमेरिकेच्या डेट्रॉइट या शहरात आहे. कंपनीचे ३७ देशात प्रकल्प आहेत. जवळपास ७७ वर्षे कंपनीने वाहन क्षेत्रावर साम्राज्य केले आहे. हीच कंपनी आता महाराष्ट्रात ६,४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. गुजरातमधील हलोल येथील मोटारनिर्मितीचा कारखाना बंद करून यापुढील देशातील सर्व उत्पादन तळेगाव येथूनच करणार असल्याचेही कंपनीने जाहीर केले आहे. तळेगाव येथे 'जनरल मोटर्स'चा कारखाना आहे. पुढील पाच वर्षांत 'शेव्हरोलेट'चे दहा नवी मॉडेल्स् बाजारात आणणार आहेत. या गाड्यांचे उत्पादन तळेगाव येथे होईल. या वर्षअखेरीपर्यंत 'शेव्हरोलेट'ची 'ट्रेलब्रेझर' ही 'एसयूव्ही' बाजारात दाखल होणार आहे.**




देण्यात आली असून १००० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. याशिवाय जवळपास २०० मिलीयन डॉलर्सची गुंतवणूक १,६०,००० युनीटचे शक्तिशाली इंजिन बनविण्यासाठी केली आहे. ही क्षमता ३,००,००० युनीट्स इंजिनइतकी वाढू शकते आणि त्यामुळे १४०० हून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. ग्राहकांना मागणी व सेवा पुरविण्यासाठी कंपनीने देशात २७५ सेवा केंद्रे व २६९ विक्री केंद्रे स्थापन केलेली आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात ३३ सेवा केंद्रे व २९ विक्री केंद्रे स्थापन केली आहेत व त्यांचे प्रमाण ११ व १२ टक्के इतके आहे.

जनरल मोटर्सची सद्य:स्थितीची गुंतवणूक व महाराष्ट्रातील मर्सिडिज, फोक्सवॅगन, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, टाटा मोटर्स, स्कोडा इ. यांचा एकत्रित विचार करता महाराष्ट्र वाहन निर्मिती क्षेत्रात भक्कम स्थितीत आहे. भारतातले वाहन निर्मिती क्षेत्रातील महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. राज्य सरकारने वाहन निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांसह विस्तार करण्यासाठी आगाऊ चर्चा व प्रयत्न सुरू केले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अमेरिका दौऱ्यात क्राइसलर या कंपनीने नव्याने ग्रॅण्ड चेरॉकी या वाहनाचे उत्पादन करण्याबाबत निर्णय घेतला आहे. जागतिक पातळीवर होणारी उत्पादने विदेशी गुंतवणुकीने महाराष्ट्रात सुरू करण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न आहे. जगाबरोबर राहायचे असेल तर त्याच्या वेगात वेग मिसळून धावावे लागते, एका बाजूला शेतीचा शाश्वत विकास करतानाच तिच्यावर पडलेला अतिरिक्त ताण हलका कसा होईल, याकडे लक्ष देणे आवश्यक होते. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी त्यांच्यात कौशल्य निर्माण करण्याची गरज ओळखून राज्यसरकारने कौशल्य विकासाची योजनाही हाती घेतली आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळाची कमतरता भासू नये यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा राज्यसरकरकडून उपलब्ध झाल्या आहेत. उत्पादन क्षेत्रात चीनशी स्पर्धा आहे कारण तेथे कुशल मनुष्यबळ ही जमेची बाजू आहे. महाराष्ट्रातही २० ते ३५ वयोगटातील तरुणांची संख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे साठ टक्के इतकी आहे. त्यामुळे कमी खर्चात मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध होतेच, मुख्यमंत्र्यांनी त्याला धोरणस्पष्टतेची जोड दिली त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांना महाराष्ट्र हे आकर्षक राज्य वाटू लागले आहे. त्याचाच परिणाम म्हणून फॉक्सकॉन आणि जनरल मोटार्सच्या गुंतवणुकीकडे पाहिले पाहिजे.

**(लेखिका गुंतवणूक आणि उद्योग याविषयी लिहिणाऱ्या मुक्त पत्रकार आहेत.)**



# महाराष्ट्राचे व्याघ्र वैभव

वाघ ज्या जंगलात असतो ते जंगल समृद्ध मानले जाते. कारण वाघाला आवश्यक असलेले तृणभक्षी प्राणी त्या जंगलात विपुल प्रमाणात असतात. तृणभक्षी प्राण्यांना आवश्यक असलेला चारा असतो. अन्न साखळीत वाघ हा सर्वात वर असला तरी तो इतरांवर अवलंबून असतो. त्यामुळे तो जिथे असतो तेथील अन्य कड्याही मजबूत असतात. त्याचबरोबर ज्या जंगलात वाघासारखा प्राणी असतो तेथे छुप्या आणि भुरट्या शिकारी होण्याचे प्रमाण कमी असते. जंगलातील वृक्षतोड मंदावते आणि जंगल समृद्ध होत राहते. त्यामुळे महाराष्ट्रात वाढत असलेले वाघ समृद्ध जंगलांच्या वाढीला अनुकूल बनले आहे. महाराष्ट्र शासनाने उचलेल्या ठोस पावलांमुळे हे शक्य बनले आहे. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्याघ्रसंवर्धनासाठी विशेष मोहीमच हाती घेतली आहे. आगामी काही काळात महाराष्ट्र हा पुन्हा वाघांचा प्रदेश होईल यात शंका नाही.

मिलिंद मधुकरराव उमरे

वाघ म्हणजे घनदाट रानात वावरणारं जिवंत तिलिस्म...एक अद्‍भुत प्राणी...श्रावणातल्या सोनपिवळ्या उन्हाचा रंग अंगावर पांघरतानाच अचानक दाटून आलेल्या काळ्याकुट्ट ढगांसारखे घनगर्द पट्टे अंगभर मिरवणारा. त्यातही पोटाकडून खालचा भाग आणि चेहरा हिरव्या उंच डोंगरकड्यातून कोसळणाऱ्या धबधब्याच्या दुधाळ रंगाचा. काळपट कानांमागे गोल पांढरे आरसे असलेला हा भव्य प्राणी खऱ्या अर्थाने जंगलाचा राजाच. आपण जंगलाचे अनभिषिक्त सम्राट आहोत हे बहुधा वाघालाही माहीत असावे. कारण मागील अनेक वर्षांपासून वाघांची निरीक्षणे, अभ्यास करताना मी बघितलंय तुम्ही एकटे असा किंवा तुमच्यामागे हजारो व्यक्ती असू देत; वाघाची चाल कधीच बदलत नाही. तो कधी तुमची पुसटशी दखल घेतो तर अनेकदा तुमची दखलही न घेता आपल्या मार्गाने रुबाबात बिनधास्त निघून जातो. आपल्या हाती केवळ भावविभोर आणि भयचकित होऊन त्याला न्याहाळण्यापलीकडे काहीच उरत नाही. पण, उरतात त्या पुढे आयुष्यभर उरणाऱ्या व्याघ्रदर्शनाच्या थरारक आठवणी. अनाघ्रात जंगलात व्याघ्रदर्शनाच्या अशा आठवणी संकलित करण्यास इच्छुक असणाऱ्यांना आता महाराष्ट्र विशेषत: विदर्भातील व्याघ्रविश्व साद घालू लागले आहे. वाघोबांची डरकाळी ऐकून संमोहित झाल्यागत अनेकांची पावले आता या व्याघ्रभूमीकडे वळत आहेत. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा जन्मच मुळी व्याघ्रभूमीत झाला असून त्यांनी राज्यातील वनांचे संवर्धन करतानाच वाघांचे रक्षण आणि सुयोग्य वनपर्यटन वाढीसाठीही पूर्ण ताकदीनिशी प्रयत्न चालविले आहेत.

### राज्यातील व्याघ्र प्रकल्प : एक दृष्टिक्षेप

महाराष्ट्र राज्यात एकूण ६ व्याघ्र प्रकल्प आहेत. यात ताडोबा– अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सह्याद्री व्याघ्रप्रकल्प, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि बोर व्याघ्र प्रकल्पाचा समावेश आहे. या सहांपैकी तब्बल पाच व्याघ्र प्रकल्प एकट्या विदर्भात आहेत. केवळ एकमेव सह्याद्री व्याघ्र प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापुरात आहे.

### ताडोबा– अंधारी व्याघ्र प्रकल्प

विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प आहे.१९५५ पासून अस्तित्वात असलेले ताडोबा राष्ट्रीय उद्यान आणि त्यात १९८६ मध्ये समाविष्ट करण्यात आलेले अंधारी अभयारण्य मिळून हा व्याघ्र प्रकल्प तयार झाला आहे. आज भारतातच नव्हे,तर जगभरात वाघांची प्रजनन भूमी म्हणून हा व्याघ्र प्रकल्प प्रसिद्ध आहे. असे म्हणतात की, भारत जगात दोन 'टी' मुळे ओळखला जातो. एक 'टी' म्हणजे जगातील आठवे आश्चर्य अर्थात ताजमहाल,तर दुसरा 'टी' म्हणजे टायगर अर्थात वाघ.

आता याच 'टी' मुळे आणखी एक 'टी' ओळखला जात आहे तो म्हणजे 'टी' फॉर ताडोबा. बांबूची दाट रांजी असलेल्या या जंगलात वाघांची संख्या प्रचंड आहे. या व्याघ्र प्रकल्पात तब्बल ७२ वाघ आहेत, तर प्रकल्पाबाहेरील जंगलात ४८ म्हणजे एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात एक, दोन नव्हे तर १२० वाघ आहेत. तर, येथील प्रत्येक १०० चौरस कि.मी. क्षेत्रात चक्क पाच बिबट्यांचे वास्तव्य आहे. म्हणूनच मार्जारकुळातील अतिशय देखण्या वाघ, बिबट्यांचे दर्शन या व्याघ्र प्रकल्पात हमखास होते. येथे ताडोबा, मोहर्ली व कोळसा असे तीन वनपरिक्षेत्र, सात उपक्षेत्र व ३४ नियतक्षेत्रे आहेत. वाघ, बिबट्यांची सर्वाधिक संख्या असलेला हा महाराष्ट्रातील एकमेव प्रकल्प आहे. पण, इथे केवळ वाघ, बिबटेच नसून काळ्याभोर पाठीचे, गुडघ्यापर्यंत पांढरे पायमोजे घातल्याप्रमाणे दिसणारे भरदार चंद्रकोरी शिंगांचे बलदंड गवे आहेत, भाँक भाँक आवाज करत टुणकन उडी मारत पसार होणारे भेकर, उन्हाच्या कवडशाप्रमाणे दिसणाऱ्या पांढऱ्या ठिपक्यांचे चितळ, काजळभरल्या काळ्या डोळ्यांची सांबरे, शेपटीचा काळा गोंडा मिरवणारे रानकुत्रे, ताडोबाच्या तळ्याकाठी निपचित पहुडलेल्या मगरी, चांदी अस्वल, ताडमांजर आणि अनेक दुर्मीळ प्राण्यांची रेलचेल आहे. सर्पगरुड, श्रृंगी घुबड, नवरंगा, धनेश व असंख्य प्रजातीचे पक्षी आहेत. विविध प्रजातींची फुलपाखरे आहेत. व्याघ्रदर्शनासोबतच पक्षिनिरीक्षण व फुलपाखरांच्या निरीक्षणासाठीही हा उत्तम प्रकल्प आहे.


संरक्षण वाघाचे
संवर्धन पर्यावरणाचे

### पेंच व्याघ्र प्रकल्प

टायगर कॅपिटल अशी ओळख असलेल्या नागपूरपासून जवळच असलेला पेंच हा एक अनोखा व्याघ्र प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे अतिसंरक्षित क्षेत्र (कोअर एरिया) २५७.२६ चौ. कि.मी. तर, बफर क्षेत्र ४८३.९६ चौ. कि.मी. आहे. या प्रकल्पातही व्याघ्र दर्शनाची मजा असते. याशिवाय येथे देखणे गवे, सांबर, चितळ, नीलगाय, चौशिंगा, असे अनेक प्राणी व विविध जातीचे पक्षी बघता येतात. स्कॅट एनकाउंटर स्टडीच्या निमित्ताने मला या व्याघ्र प्रकल्पात मनसोक्त फिरता आलं. इथला निसर्ग खरंच लोभसवाणा आहे.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्प

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प नावाप्रमाणाचे डोंगर कपारींच्या घाटांचा मेळ घालणारा असून येथे व्याघ्र दर्शनाची रंजकता काही औरच असते. या अनवट डोंगरी वाटांच्या जंगलात वाघ बघणेही एक आव्हानच आहे. पण, येथील वाघ पहाडी माणसांप्रमाणेच धिप्पाड आणि देखणे असतात. उंच, सखल पर्वतरांगांमुळे या दुर्गम भागात व्याघ्रदर्शनासाठी बरेच कष्ट घ्यावे लागतात. पण, या प्रकल्पातील रांगडे निसर्गसौंदर्य आपल्याला मोहिनी घालते. येथे वाघ, बिबट्यांसह दुर्मीळ रानपिंगळा (फॉरेस्ट स्पॉटेड ऑवलेट) आढळून येतो. सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या प्रकल्पातून खंडू, खापर, सिपना, गाडगा, डोलार या नद्या वाहतात. मेळघाट हे जैवविविधतेचे भंडार आहे.

### सह्याद्री व्याघ्रप्रकल्प

विदर्भाबाहेर असलेला महाराष्ट्रातील हा एकमेव व्याघ्रप्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात वसलेला आहे.

सातारा जिल्ह्यात असलेले कोयना अभयारण्य व शेजारच्या सांगली–कोल्हापूर जिल्ह्यात विस्तारलेलं चांदोली राष्ट्रीय उद्यान मिळून हा व्याघ्र प्रकल्प निर्माण झाला आहे. मेळघाट, ताडोबा–अंधारी व पेंच व्याघ्र प्रकल्पानंतर घोषित झालेला हा चौथा व्याघ्र प्रकल्प आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या जास्त नसली, तरी भविष्यात ती नक्की वाढणार आहे. पर्यटनसाठी हा प्रकल्प नितांतसुंदर असून वाघांसह अन्य वन्यजीव, पक्षी, सरीसृपांची दुनिया न्याहाळताना भान हरपून जाते.



### नवेगाव – नागझिरा व्याघ्र प्रकल्प

६५६.३६ चौ.कि.मी. क्षेत्रफळावर विस्तारलेल्या नवेगाव – नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला १२ डिसेंबर २०१३ रोजी मंजुरी मिळाली होती. सह्याद्रीनंतर हा राज्यातील पाचवा व्याघ्र प्रकल्प आहे. यात १२९.५५ चौ.कि.मी. नवेगाव राष्ट्रीय उद्यान, १२२.७५ चौ.कि.मी. नवेगाव वन्यजीव अभयारण्य, १५२.५८ चौ.कि.मी. नागझिरा वन्यजीव अभयारण्य, १५१.३३ चौ.कि.मी. नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य व १०० चौ.कि.मी. च्या कोका वन्यजीव अभयारण्याचा समावेश आहे.

थोर साहित्यिक व्यंकटेश माडगुळकरांपासून अरण्यऋषी म्हणून प्रसिद्ध लेखक मारुती चितमपल्ली यांच्या लेखणीतून नवेगाव, नागझिऱ्याचा निसर्ग श्रावणीसरींप्रमाणेच अक्षरश: रिमझिमला आहे. ताडोबाशी नैसर्गिक जवळीक साधणारा हा व्याघ्र प्रकल्प डोळ्यांचे पारणे फेडणाराच आहे. वाघ, बिबट्यांसोबतच येथील हिरवे डोंगर आणि आरस्पानी आरशांप्रमाणे दिसणारे जलायश मन मोहून घेतात. या जलाशयांवरची पक्षिसृष्टी बघताना आपण हरखून जातो. अरण्यपुत्र दिवंगत माधवराव पाटील डोंगरवार यांच्या पराक्रमाच्या आणि अरण्यओढीच्या असंख्य आठवणी जपून असलेला हा व्याघ्र प्रकल्प असंख्य दुर्मीळ वन्यजीवांचे सहज दर्शन घडवतो.

### बोर व्याघ्र प्रकल्प

फळांमध्ये बोर जसे लहानसे फळ तसेच राज्यातीलच नव्हे तर देशातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये सर्वांत छोटा हा पिटुकला व्याघ्र प्रकल्प आहे. राज्यात घोषित झालेल्या व्याघ्र प्रकल्पांपैकी शेवटचा सहावा व देशातील ४७ वा व्याघ्र प्रकल्प आहे. नागपूर व वर्धा जिल्ह्याच्या सीमारेषेवर असलेला अवघ्या १३४ चौ.कि.मी. चा हा व्याघ्र प्रकल्प आहे. खरेतर, व्याघ्र प्रकल्पाला कायद्यानुसार ८०० ते १००० चौ.कि.मी. क्षेत्रफळ आवश्यक असते पण, हा प्रकल्प ताडोबा–अंधारी आणि पेंच व्याघ्र प्रकल्पाला एकत्र जोडत असल्याने त्याला क्षेत्रफळात सूट मिळाली आहे. बोर नदीच्या परिसरात असल्याने याला बोर नाव पडले आहे. येथे बोर धरण असून हा परिसरही बघण्यासारखा आहे. पिटुकला व्याघ्र प्रकल्प असला तरी 'मूर्ती लहान पण, कीर्ती महान' अशी याची ख्याती आहे. मी वर्ध्याला असताना माझ्या काही पत्रकार मित्रांसह पाच,दहा मिनिटे नव्हे, चक्क तासभर वाघ पाहिला तोसुद्धा बोर धरण परिसरात. वाघ नीट बघता यावा म्हणून चक्क गाडीच्या टपावर चढून बसलो. आम्ही गाडीच्या टपावर आणि वाघ गाडीच्या समांतर, तर कधी पुढे झुडपातून चाललेला. खरच अविश्वसनीयच अनुभव होता. म्हणून आकाराने लहान असला तरी हा प्रकल्प कमी समजू नका.



### वाघासाठी धावून आलेला वाघमाणूस

राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना कधी कधी मुनगंटी 'वाघ' म्हणावसे वाटते. कारण, प्रत्येक कामाचा ते वाघ जसा शिकारीचा फडशा पाडतो तसा फडशा पाडतात. अनेकजण आपण कामात वाघ आहोत, असे म्हणतात. पण, कामात वाघ असलेला माणूस बघायचा असेल, अनुभवायचा असेल, तर मुनगंटीवारांची कार्यशैली बघावी. वाघाचे अभ्यासक मानतात की, वाघाने शिकारीचे १५ प्रयत्न केल्यावर तो यशस्वी होतो. पण, मुनगंटीवार पहिल्या प्रयत्नातच यशस्वी होतात. त्यांची कार्यशैली वाघासारखीच आहे. वाघ शिकार करतो तेव्हापासून शिकार खाण्यापर्यंतच्या त्याच्या



हालचाली न्याहाळण्यासारख्या असतात. तो आपल्या शिकारीवर पूर्ण लक्ष केंद्रित करतो. शिकार केल्यानंतर त्याला चाटून जिभेने पद्धतशीर केस काढतो. आपल्या नखांचा व दातांचा वापर करून सराईत शल्यचिकित्सकाप्रमाणे शिकारीचं मांस फाडून कोथळा बाजूला करतो. कुठेही घाण, अजागळ–पणा नाही, सारे काही शिस्तीत, टापटिपीत आणि निर्भयपणे. आरामात शिकार खाल्यानंतर मागच्या पायांनी पाचोळा टाकून शिकार काळजीपूर्वक झाकून ठेवतो. हाती घेतलेले काम कसे करावे हे वाघाकडून आणि मुनगंटी 'वाघ' यांच्याकडून शिकावे. वनमंत्रीपदी आरूढ होताच त्यांनी कामाचा धडाका लावून दिला. चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचा दर्जा वाढवून त्यास वन अकादमीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला. वाघ, बिबट आदी वन्यजीवांच्या हल्ल्यात मनुष्यहानी होते. पुढे संतप्त नागरिक वाघ, बिबट्यांना मारण्याची मागणी करतात. ही



समस्या दूर करण्यासाठी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील मनुष्यहानीसाठीच्या अर्थसाहाय्यात त्यांनी वाढ केली, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्यांसाठी रेस्क्यू सेंटर सुरू करण्यात आले. पर्यटकांच्या सोयीसाठी ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प अंशतः सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला व तो अंमलात आणला. ब्ल्यू मॉरमॉन या फुलपाखराला राज्य फुलपाखराचा सन्मान मिळाला. केंद्रीय चिडियाघर प्राधिकरणाच्या धर्तीवर राज्यात 'महाराष्ट्र राज्य प्राणिसंग्रहालय प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुनर्रचित वन्यजीव मंडळाच्या पहिल्या बैठकीत राज्यातील अभयारण्याची संख्या वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना, उत्तमराव पाटील वन उद्यानांची निर्मिती, अत्याधुनिक रोपवाटिका, वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवर आदी ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन, श्यामाप्रसाद मुखर्जी जन वनविकास योजना, ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व गोरेवाडा प्राणी संग्रहालय यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन केंद्र करण्याचा निर्णय, राष्ट्रीय वन्यजीव प्राधिकरण असते तसेच राज्यातही प्राधिकरण असावे, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. नुकतेच नागपुरात त्यांनी वनधन जनधन योजनेचं उद्घाटन करताना गडचिरोलीसारख्या वनसमृद्ध जिल्ह्यातील वनौषधी व तेथील वैदूंच्या पारंपरिक ज्ञानाला आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवून देण्याचा संकल्प सोडला. गडचिरोली जिल्ह्यात वनविभागाच्या मदतीने कार्यरत गोंडवाना हर्बसारख्या प्रकल्पाला बळ देण्याचं कार्य ते करीत आहेत.राज्यातील सहाही व्याघ्र प्रकल्पांना 'ए प्लस' दर्जा मिळावा, यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यासाठी या सहाही व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटन व व्याघ्र संवर्धनाच्या दृष्टीने सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. येथे पंचतारांकित हॉटेल, रिसॉर्टपासून १२७ प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सी प्लेनपासून तर बिबट सफारी, मनोरंजनासाठी मिनी थिएटर, निसर्ग पर्यटन केंद्र, डेक्कन ओडीसी, मासे संग्रहालय, नौकानयन, दक्षिण आफ्रिकेच्या धर्तीवर होमस्टे आदी सुविधा निर्माण होणार आहेत. ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पासारख्या अतिमहत्त्वाच्या व्याघ्र प्रकल्पातील जलस्रोत, कृषी क्षेत्र, पाणवठे, वन्यप्राणी या नैसर्गिक साधनसंपत्तीला कोणताही मानवी धोका पोहचू नये म्हणून 'इको सेन्सेटिव्ह झोन' जाहीर करण्यात आले. त्यामुळे अशा व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरात कोळसा खाणी किंवा अन्य प्रदूषणकारी उद्योग निर्माण करून तेथील जैवविविधता व वाघ, बिबट्यांचा कॉरिडोर उधळण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे मनसुबे उधळून लावले. या साऱ्यांवर कळस म्हणजे महानायक अमिताभ बच्चन व भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना व्याघ्रदूत होण्यासाठी त्यांनी साकडे घातले. या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांनी आपला होकारही कळविला आहे. हे त्यांच्या कारकिर्दीतील मोठे यशच मानावे लागेल. पण हे सारे कशासाठी...तर इथल्या वाघांच्या, वन्यजीवांच्या, इथल्या समृद्ध निसर्गाच्या रक्षणसाठीच...म्हणून म्हणावसं वाटतं, वाघोबा तुम्ही वाढत राहा, या वनांमध्ये निर्धास्त विहार करा. कारण, आता तुमच्या संरक्षण व संवर्धनासाठी एक वाघमाणूस सज्ज आहे.



**संरक्षण वाघाचे संवर्धन पर्यावरणाचे**

**(लेखक वाघ, वन्यजीव आणि जैव विविधता या विषयांचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**






# वाघ मंत्रालयात... वाघ मनामनांत

नॅशनल टायगर कॉन्झरर्व्हेशन ॲथॉरिटीमुळे गेल्या दहा वर्षात वाघांची संख्या वाढण्याबरोबरच त्याची माहिती संकलित (डॉक्युमेंटेशन) करण्यातही आपला देश पुढे आहे. भारतात १९७३ साली व्याघ्र प्रकल्पाची सुरुवात झाली. तेव्हाच्या ९ व्याघ्र प्रकल्पांची संख्या आता वाढून ३८ इतकी झाली आहे. स्टेटस् ऑफ टायगर्स इन इंडियाच्या अहवालानुसार २०१० च्या १७०० वाघांच्या तुलनेत देशात २०१४ साली झालेल्या सर्वेक्षणात २२२६ वाघ असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील वाघांची संख्याही २०१० च्या १६९ वाघांहून वाढून १९० इतकी झाली आहे. व्याघ्र संख्येमध्ये महाराष्ट्र देशात पाचव्या क्रमांकावर असला तरी, महाराष्ट्रातील एकूण सहा व्याघ्र प्रकल्पांपैकी पाच आणि इतर राज्यातील आठ व्याघ्र प्रकल्पांसह एकूण १३ व्याघ्र प्रकल्प विदर्भाच्या ३०० चौ.कि.मी च्या परिक्षेत्रात येत असल्याने, विदर्भ ही देशाची व्याघ्र राजधानी मानली जाते...

**महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या वाढत आहे. ही वाढलेली संख्या जंगलसमृद्धीसाठी जशी आवश्यक होती तशीच ती वन पर्यटनवाढीसाठी आवश्यक होती. या आपल्या ठेव्याची ओळख करून देण्यासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने मंत्रालयात व्याघ्रवैभव दर्शन घडवणारे प्रदर्शन भरवण्यात आले होते.**

कधीही सहजासहजी कानावर न पडणारी माहिती वाचून आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नव्हते...

निमित्त होते २९ जुलैचे... हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील व्याघ्रवैभव ठळकपणे जगासमोर मांडण्याचा एक अनोखा प्रयत्न वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला. मंत्रालयात ४ ऑगस्ट २०१५ रोजी महाराष्ट्राचे हे व्याघ्रवैभव ठळकपणे प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकांसमोर आले. एवढंच नाही तर ते लोकांच्या नजरेत भरले. हाच उत्साह आणि लोकसहभाग वनमंत्र्यांना वन विकासासाठी आणि व्याघ्र संवर्धनासाठी अपेक्षित होता.

**डॉ. सुरेखा मुळे**

### मुख्यमंत्र्यांचे पाठबळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दांनी पाठबळ मिळाले. आपल्या उद्घाटनपर भाषणात मुख्यमंत्र्यांनी वनव्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात लोकसहभाग घेतल्याने वन विकासाला

गती मिळाल्याचे सांगितले. ते म्हणाले की, राज्यातील वने आणि व्याघ्र प्रकल्प हे राज्याचे दायित्व नाही तर संपत्ती आहे, या संपत्तीच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. या वेळी त्यांनी निसर्गाचा शोषक नाही तर पोषक व्हायला हवे असे सांगून निसर्गाशी साधर्म्य साधत जगण्याचा संदेश दिला. एवढेच नाही तर यातूनच जीवन जगण्याचा एक उत्तम मार्ग दृष्टिपथात येतो हे ज्या वेळी कळते त्या वेळी वनरक्षणासाठी पोलिसांची गरज भासत नाही, प्रत्येक माणूसच वनशिपाई होऊन वनसंरक्षणाचे काम करायला लागतो हे देखील स्पष्ट केले.

### संकल्प संवर्धनाचा

वनमंत्र्यांनी आपल्या भाषणात वनसंवर्धनाच्या संकल्पाला पुढे उचलून धरले. प्रत्येकाने वन आणि वन्यजीव संवर्धनात सहभागी होण्याचा संकल्प केला पाहिजे, असे आवाहन करताना श्री. मुनगंटीवार यांनी समृद्ध वन जिथे आहे तिथे वाघ आहे आणि जिथे वाघ नाही तिथे वन नाही हे लक्षात घेतले पाहिजे, असे सांगून वाघ ही जैवविविधतेतील महत्त्वाची कडी असल्याचे स्पष्ट केले. व्याघ्रसंवर्धनात लोकांचा सहभाग वाढावा या हेतूने टॅलेंट हाऊस, इंडियाकडून व्याघ्र संवर्धनाशी संबंधित डिझाइन्स, फोटोग्राफी, संगीत आणि लघुपटांची निर्मिती करण्यासाठी वनमंत्र्यांनी स्पर्धाही जाहीर केली.

### अमाप उत्साह

मंत्रालयात सगळ्यांचाच उत्साह त्या दिवशी ओसंडून वाहत होता. तळमजल्यावर लावण्यात आलेले वाघांचे देखणे आणि रुबाबदार रूप त्यांना मोहून टाकत होते. वाघाच्या भल्यामोठ्या कटआऊटसमोर उभे राहून कुणी आपले छायाचित्र काढून घेत होते तर कुणी अतिशय काळजीपूर्वक वाघ, वाघांचा अधिवास आणि राज्यातील व्याघ्र प्रकल्प याची माहिती वाचत होते. मध्येच अरेरे.... यामुळे वाघ कमी होत आहेत का? असे म्हणत वाघांची संख्या वाढलीच पाहिजे असे आग्रही मत मांडतांना दिसत होते.



**संरक्षण वाघाचे संवर्धन पर्यावरणाचे**

काय देखणा प्राणी आहे असे म्हणत महिलांचा ग्रुप वाघाच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वावर खूप खूश होताना दिसत होता. काही महिला वाघाच्या कुटुंबाच्या फोटोच्या प्रेमात पडल्या होत्या. तो छावा बघ नं, किती क्यूट आहे, त्याची नजर बघ, किती वेध घेतेय काळजाचा असं म्हणत कुणी तरी वाघाच्या नजरेचाच वेध घेत होते. अगदी जिवंत वाटावेत असे दोन मोठे फायबरचे वाघ लोकांचे लक्ष वेधून घेत होते. त्याच्याकडे पाहून आता मी नक्की राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पांना भेट देणार अशी इच्छा कोणीतरी व्यक्त करत होते. कुणी निवांत बसून वाघांवर तयार करण्यात आलेल्या चित्रफितीचा आनंद घेत होते तर अरे बाप रे आपल्या राज्यात सहा व्याघ्र प्रकल्प आहेत? मला माहीतच नव्हते, या प्रदर्शनामुळे तरी कळले, असे म्हणत कुणीतरी राज्याचे व्याघ्रवैभव पाहून आनंदून जात होते.

### भेटीचे निमंत्रण

मंत्रालयातील शासकीय कर्मचारी असले तरी ते शेवटी मुंबईकरच, त्यामुळे नेहमीच्या रुटीनला कंटाळलेल्या त्यांच्या मनाला वेगळे काही तरी अनुभवण्याची संधी या प्रदर्शनाने दिली होती. त्यांना सोबत होती ती कामानिमित्ताने मंत्रालयात आलेल्या लोकांची. आपल्या कामाचे काय होणार हा विचार मनात घेऊन आलेल्या सर्वसामान्य माणसांची पावलेही प्रदर्शनाच्या ठिकाणी थबकत होती. गर्दीत हरवलेल्या मुंबईकरांना विरंगुळ्याचे क्षण आणि निसर्गाचे सान्निध्य किती हवेहवेसे असते हे यावरून दिसून येत होते. त्यांच्या मनातली निसर्गाविषयीची ओढ या निमित्ताने दिसून येत होती. वाघांबद्दल त्यांना वाटणारे औत्सुक्य दिसून येत होते. प्रदर्शनातील प्रत्येक माहिती फलक लोकांना एकदा तरी व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्याचे निमंत्रण देत होता. हे संपूर्ण व्याघ्र प्रदर्शन आयोजित करण्यामागचा उद्देशही एक प्रकारे तोच होता.



### जनजागृतीचे व्यासपीठ

प्रदर्शनाच्या उद्घाटनच्या वेळी तळमजल्यापासून सातव्या मजल्यापर्यंत झालेली लोकांची गर्दी प्रदर्शनाचे यश सांगून जात होती. दररोज आपल्या सवयीने सरकणारे सरकते जिनेही त्या दिवशी थांबले होते. त्याच्या प्रत्येक पायरीवर उभा असलेला माणूस हे प्रदर्शन डोळ्यात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करत होता, वन आणि व्याघ्र संवर्धनाचा संदेश मनात साठवून घेत होता. त्यामुळेच हे व्याघ्र प्रदर्शन केवळ प्रदर्शन न राहता ते जनजागृतीचे एक सशक्त व्यासपीठ ठरले होते.

# व्याघ्रदूत अमिताभ बच्चन



संरक्षण वाघाचे
संवर्धन पर्यावरणाचे



ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनी राज्याचे व्याघ्रदूत म्हणून योगदान द्यावे, अशी विनंती वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. अमिताभ बच्चन यांनी वनमंत्र्यांच्या विनंतीला मान देत व्याघ्रदूत म्हणून योगदान देण्यास होकार दिला. चित्रपटांच्या माध्यमातून प्रदीर्घ काळ रसिकमनावर अधिराज्य गाजविणाऱ्या महानायकाने दिलेला हा होकार वनविभागाच्या दृष्टिने अतिशय महत्त्वपूर्ण आहे. विशेषत: श्री. मुनगंटीवार यांनी या संदर्भात घेतलेल्या पुढाकारामुळेच हे शक्य झाले आहे.

४ जुलै, २०१५ रोजी नागपूर येथे राज्यातील व्याघ्र संरक्षण फाऊंडेशनची बैठक संपन्न झाली. या बैठकीत श्री. मुनगंटीवार यांनी राज्यातील ताडोबा, पेंच, मेळघाट, सह्याद्री आणि नागझिरा या व्याघ्र प्रकल्पांचे ब्रँडिंग करून त्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टिने ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन, ज्येष्ठ क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना ब्रॅन्ड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करण्याच्या दृष्टिने विनंती करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार जागतिक व्याघ्र दिनाचे औचित्य साधत वनमंत्र्यांनी श्री. बच्चन आणि श्री. तेंडुलकर यांना त्यासंबंधाने विनंतीपत्रे पाठविली. वनमंत्र्यांच्या विनंतीला तत्काळ प्रतिसाद देत श्री. बच्चन यांनी व्याघ्रदूत म्हणून आपले योगदान देण्यासाठी होकार दिला. त्यांच्या होकारानंतर वनमंत्र्यांनी ११ ऑगस्ट रोजी जुहू मुंबई येथील श्री. बच्चन यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेऊन विस्तृत चर्चा केली. व्याघ्रदूत म्हणून काम करण्यासाठी परिपूर्ण योजना व आराखडा वन विभागाने तयार करावा, त्या माध्यमातून हे काम गतीने पुढे नेऊ असेही श्री. बच्चन यावेळी बोलताना म्हणाले.

श्री. मुनगंटीवार यांनी राज्यातील ६ व्याघ्र प्रकल्प, राज्याचे वनवैभव तसेच वन विभागाचे विविध उपक्रम, योजना याबाबत विस्तृत माहिती श्री. बच्चन यांना दिली. आपण निमंत्रण दिल्यानंतर तत्परतेने दिलेला होकार हा माझ्यासाठी अतिशय आनंददायी व उत्साहवर्धक होता. या शतकातील महानायकाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील व्याघ्रवैभव जगाच्या पाठीवर निश्चितपणे अधोरेखित करू असा विश्वास वनमंत्र्यांनी व्यक्त केला. या भेटीदरम्यान श्री. बच्चन यांनी नम्रपणे वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांचे स्वागत केले, सखोल चर्चा केली. या चर्चे दरम्यान श्री. बच्चन यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने आपली मते मांडली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी वनविभागाला सर्वतोपरी मदत करण्याबाबत श्री. बच्चन यांनी आश्वासन दिले.

श्री. बच्चन यांच्या पाठोपाठ श्री. तेंडुलकर यांनी सुद्धा या प्रक्रियेत आपले योगदान देण्यासाठी चर्चा करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार वनमंत्र्यांनी त्यांचीही भेट घेत विभागाची भूमिका त्यांच्यासमोर विशद केली. वनविभाग श्री. तेंडुलकर यांच्या होकाराच्या प्रतीक्षेत आहे. राज्याचे व्याघ्रवैभव जगाच्या पाठीवर अधोरेखित व्हावे यासाठी श्री. अमिताभ बच्चन यांची लार्जर दॅन लाईफ प्रतिमा निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. श्री. बच्चन भारताच्या सांस्कृतिक क्षेत्राचे मानबिंदू आहेत. त्यांच्या आवाहनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्पांकडे पर्यटक निश्चितच आकर्षित होतील व वनपर्यटनाला चालना मिळेल यात शंका नाही. वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी यासंदर्भात घेतलेला पुढाकार निश्चितच स्तुत्य व अभिनंदनीय आहे.



वनसंवर्धनासाठी योगदान देण्यास भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना विनंती.

# प्रभाव वाढला, व्याप्ती विस्तारली

सामान्य नागरिकांना प्रशासनाविषयी तक्रार करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आपले सरकार या वेब पोर्टलची निर्मिती झाली. या वेबपोर्टलमुळे सामान्यांच्या तक्रारींना न्याय मिळाल्याने प्रशासनाची विश्वासार्हता वाढली.

याच वर्षी २६ जानेवारीला म्हणजे प्रजासत्ताकदिनी 'आपले सरकार' वेब पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले. मंत्रालयीन स्तरावरील तक्रारींसाठीच असलेले हे पोर्टल अल्पावधीतच सामान्यांच्या तक्रारींसाठी हक्काचे व्यासपीठ बनले. मंत्रालयीन स्तरावरील ऑनलाइन लोकशाही दिनामध्ये आपले सरकार वेब पोर्टलवरील तक्रारींची दखल देखील घेण्यात येऊ लागली. सामान्य नागरिकांना न्याय मिळू लागला. पहिल्या टप्प्याची यशस्विता लक्षात घेतल्यानंतर यंदाच्या स्वातंत्र्यदिनी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या वेब पोर्टलचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला.

## सामान्यांना भेटीसाठी वेळ राखून ठेवा– मुख्य सचिव



**सामान्य माणसाशी अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सौजन्याने वागले पाहिजे. सामान्यांना वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची भेट घेणे सोईस्कर व्हावे म्हणून दररोज एक तास या अधिकाऱ्यांनी राखीव ठेवावा व भेटीच्या वेळेबाबतचा फलक देखील आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावा. सामान्यांच्या तक्रारी ऐकल्यास त्यांचे समाधान होते. माहिती तंत्रज्ञानाचा सदुपयोग किती चांगल्या प्रकारे करता येऊ शकतो याचे उदाहरण म्हणजे आपले सरकार वेबपोर्टल आहे.**

## दुसरा टप्पा

राज्यातील सहा महसुली विभागातील ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ६ जिल्ह्यांचा समावेश या दुसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे. वेब पोर्टलच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण करताना राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश असलेला तिसरा टप्पा येत्या प्रजासत्ताक दिनी सुरू करू असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या सोहळ्यास मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे अपर मुख्य सचिव डी. के. जैन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी उपस्थित होते.




आपले स्वराज्य सुराज्यात परिवर्तीत होवो, अशा शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री म्हणाले, लोकाभिमुख सरकार ही संकल्पना प्रत्यक्ष अमलात

**आपले सरकार वेबपोर्टलचा दुसरा टप्पा १५ ऑगस्टपासून कार्यान्वित झाला असून राज्यातील सहा महसूली जिल्ह्यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सामान्य माणसाला घरी बसून तक्रार मांडण्याबरोबरच प्रत्येक व्यवस्थेचे मूल्यमापन करता येणे सोपे झाले आहे. येत्या प्रजासत्ताक दिनापर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश असलेला आपले सरकारचा टप्पा-३ सुरू करण्यात येईल.**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.**

आणण्यासाठी समाजातील कुठल्याही स्तरातील व्यक्तीला शासनाशी थेट संवाद साधता आला पाहिजे. यासाठी व्यासपीठ निर्माण करण्याची गरज होती. त्यातून आपले सरकार वेबपोर्टल २६ जानेवारी २०१५ रोजी सुरू करण्यात आले. मला सांगायला आनंद वाटतो की, या वेबपोर्टलच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांचे समाधान करण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळाले आहे. वेबपोर्टलवरील तक्रारींची दखल आता ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या लोकशाही दिनात घेण्यात येत असल्यामुळे वर्षानुवर्षाच्या तक्रारी आहेत त्या सोडविण्यासाठी मोठी मदत होत आहे. त्याचबरोबर नागरिकांना तक्रार मांडण्यासाठी मुंबईला मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही. राज्य शासनाने नुकतेच सेवाहमी विधेयक मंजूर केले असून त्याद्वारे सामान्यांना विहीत मुदतीत सेवा मिळविण्याचा हक्क मिळाला आहे. त्यामुळे प्रशासनाची जबाबदारी आता अधिक वाढली आहे.

## 'आपले सरकार'ची यशस्वी वाटचाल

नागरिकांकडून मंत्रालय स्तरावरील ९ हजार २०० तक्रारी आजपर्यंत प्राप्त झाल्या असून त्यापैकी ७८ टक्के तक्रारींचा निपटारा झाला आहे. पोर्टलवर मिळणाऱ्या प्रतिसादानुसार नागरिकांच्या तक्रारींचे समाधानकारक निपटाऱ्याचे प्रमाण ८४.५ टक्के इतके लक्षणीय आहे. आता ही सेवा जिल्हास्तरावर विस्तारण्यात येणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, नगरपालिका, पोलीस विभाग आणि जिल्हा परिषदांसंदर्भातील अर्जांचा निपटारा करण्यात येणार आहे. निपटारा न झालेल्या आणि गुंतागुंतीच्या तक्रारी मासिक ई–लोकशाही बैठकीच्या माध्यमातून मुख्यमंत्री स्वतः सोडविणार आहेत.

**अजय जाधव**

विशेष मुलाखत

# एसटी प्रवास सुखकर करणार



**परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते वाहतूक विभागाच्या कायापालटासाठी सज्ज झाले आहेत. त्यात विमानतळाप्रमाणेच अत्याधुनिक वाहनतळाची संकल्पना, राज्यातील दुर्गम भागांना जोडणाऱ्या आधुनिक बसेस, खाजगी वाहतूक सेवांचे नियमितीकरण यासारख्या बऱ्याच गोष्टींचा समावेश असेल. या मुलाखतीत त्यांनी या सर्व मुद्द्यांवर विस्ताराने चर्चा केली...**

**खाजगी बससेवेच्या तुलनेत एसटी बसेसची सेवा सुधारण्यासाठी काही विशेष प्रयत्न करणार आहात का?**

नक्कीच. लोक खाजगी बसेसच्या चकचकीतपणाला भुलतात. शिवाय त्यांचे भाडेही कमी असते. बसवाल्यांनाही ते परवडते कारण ह्या बसेस सामान वाहतुकीसाठीही वापरल्या जातात. आम्हीही त्याच धर्तीवर विचार करत आहोत. त्याशिवाय एसटी बसेससाठी टोल माफ करता येईल का याचाही विचार चालू आहे. तसे झाल्यास तिकीट दर अजून कमी होऊ शकेल. ह्या दिवाळीला आम्ही  निदान ५०० नवीन बसेसची घोषणा करणार आहोत आणि फक्त मुंबई- पुणेच नाही तर विदर्भ, खानदेश आणि मराठवाडा भागातसुद्धा लोकांना या नवीन बससेवेचा फायदा घेता येईल.

**मृदुला वरसकर**

**महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेता त्यांना काही आरक्षण देण्यात येणार आहे का?**

होय, यावर्षी रक्षाबंधनपासून महिलांकरिता बसमध्ये पहिल्या दहा जागा राखून ठेवल्या आहेत. फक्त एकच अट असेल की, किमान एक दिवस आधी बुकिंग करावे लागेल. नवीन मार्गांवर महिलांची सुरक्षितता आणि शौचालये यांना प्राधान्य देण्यात येईल.

**आम्हाला बसआगार विस्तार योजनेबद्दल सांगा.**

मी विमानतळ (एअरपोर्ट) धर्तीवर वाहनतळाची (बसपोर्ट) एक संकल्पना आखली आहे. लवकरच आम्ही राज्यातील प्रमुख बारा ठिकाणी स्वच्छ आणि आधुनिक बसपोर्ट्स उघडणार आहोत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदाही मागवल्या आहेत. बाकीच्या सुखसोयींबरोबरच येथे आम्ही मराठी चित्रपटांसाठी विशेष मिनी-चित्रपटगृह उघडणार आहोत.

विद्यमान आगारांपैकी (डेपो) १४९ डेपोंना कुंपण नाही. त्यामुळे त्यांचे आधुनिकीकरण करण्यापूर्वी प्रथम त्याना कुंपण बांधून ते सुरक्षित केले जाईल. जिथे जागेच्या उपलब्धतेचा प्रश्न आहे, तिथे किमान शौचालयांची सुविधा तरी नक्कीच दिली जाईल.

आम्ही लवकरच बस स्थानकांवर एक महत्त्वाकांक्षी 'फूडचेन' योजना सुरू करीत आहोत. त्यामुळे प्रवाशांना माफक दरात चविष्ट खाण्यापिण्याची सोय उपलब्ध होईल. याची किंमत तिकिटाच्या किमतीतच आकारली जाईल आणि मेनू स्थानिक खाद्यपदार्थांवर आधारित असेल. मोठ्या डेपोंवर वाय-फाय, उपाहारगृहे आणि मनोरंजनाच्या सुविधा देण्याचे ठरविले आहे.

**ग्रामीण एसटी बससाठी काही विशेष योजना आहेत का?**

आम्ही एसटीच्या डिझाइनमध्ये बदल करणार आहोत. तसेच शेतकऱ्यांसाठी या बसेसमध्ये माल वाहतूक करण्यासाठी विशेष सोय असेल जेणेकरून त्याना टेंपोवर अवलंबून राहावे लागणार नाही. त्यामुळे त्यांचा त्रासही वाचेल आणि खर्चही! ग्रामीण लोकांचे एसटी बसेसशी एक भावनिक

नाते आहे. त्याचा त्यांच्या कामात उपयोग करता येऊ शकेल.

**आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वाहतूक क्षेत्रात नोकऱ्या देण्यासंबंधी तुम्ही घोषणा केली होती पण पुढे काहीच झाले नाही.**

हो, पण दुर्दैवाने खात्यातील नोकऱ्यांची भरती प्रक्रिया स्थगित झाल्यामुळे त्याबद्दल पुढे काहीच करता येऊ शकले नाही. अजूनही माझे हेच प्रामाणिक मत आहे की, दुष्काळने होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळाले पाहिजे.

**खाजगी टॅक्सी कंपन्या सध्या कोणाच्याही नियंत्रणाखाली नाहीत. त्यावर काही विचार चालू आहे का?**

हो. निश्चितच. त्याना लवकरच 'मोटर व्हेइकल ॲक्ट' म्हणजे वाहन अधिनियम कायद्याखाली नियंत्रित केले जाईल. त्यांना यापुढे रान मोकळे मिळणार नाही! एकदा हा कायदा अस्तित्वात आला की, मग वाहनांपासून ते चालकापर्यंत प्रत्येक गोष्ट नियंत्रित केली जाईल. प्रत्येक चालकाकडे पोलीस विभागाचे NOC (ना हरकत) प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील. तसेच तत्काळ दूरध्वनी आणि जीपीएस (GPS) प्रणाली प्रवाशांना द्यावी लागेल.



**'मी विमानतळ धर्तीवर बसपोर्टची एक संकल्पना आखली आहे. लवकरच आम्ही राज्यातील प्रमुख बारा ठिकाणी स्वच्छ आणि आधुनिक बस पोर्ट्स उघडणार आहोत. मोठ्या डेपोवर वाय-फाय, उपाहारगृहे आणि मनोरंजनाच्या सुविधा देण्याचे ठरविले आहे.'**

**आपल्या रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांच्या सेवेबद्दल खूप तक्रारी आहेत. म्हणूनच लोक महागड्या खाजगी टॅक्सीजचा पर्याय पसंत करतात.**

रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांबद्दल लोकांच्या खूप तक्रारी येत असतात. त्यांनी हे लक्षात ठेवावे की, लोकांना चांगली सेवा देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. महागाईनुसार त्यांचे भाडे नियमितपणे त्यांच्या समित्या वाढवत असतात त्यामुळे खरे तर त्यांना तक्रार करायचे काही कारण नाही. तरीसुद्धा विमानतळाबाहेर लोकांना अवाच्या सवा भाडी लावतात आणि एरव्हीही बरेचदा जास्त भाडी आकारून फसवतात. लोकांच्या तक्रारींवर आमचे लक्ष आहे आणि आम्ही लवकरच त्या संदर्भात पावले उचलू. माझे या लोकांना सांगणे आहे की, निदान आपल्या रोजी-रोटीचा मान ठेवून तरी आपले वागणे सुधारा. स्त्रियांना आणि ज्येष्ठ नागरिकांना कधीही भाडे नाकारू नका. प्रत्येक ठिकाणी कायद्याचा बडगा चालत नाही. कधीतरी आत्मपरीक्षणही केले पाहिजे. आपल्या कर्तव्याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

**प्रस्तावित सावंतवाडी टर्मिनसबाबत काय सांगाल?**

कोकण रेल्वेसाठी हा अतिशय महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. या टर्मिनसमुळे मुंबई-कोकण मार्गावर जास्त गाड्या आणि बऱ्याच जलद गतीच्या गाड्या सोडता येतील. त्यामुळे कोकण आणि मुंबई जवळ यायला मदत होईल. सध्या कोकणात पोहोचायला जवळ-जवळ दहा तास लागतात. पण आता हे अंतर कमी वेळात पार करता येईल. आता खऱ्या अर्थाने कोकण रेल्वे कोकणातील लोकांची होईल! सध्या कोकण रेल्वे खाली दक्षिणेपर्यंत जाते आणि बऱ्याच वेळा कोकणातील लोकांनाच त्याचा फायदा होत नाही. सावंतवाडी टर्मिनससाठी आम्ही २५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

त्याचप्रमाणे कऱ्हाड आणि चिपळूण मार्गावरसुद्धा एक रेल्वेलाइन टाकायचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. तसेच सावंतवाडी आणि कोल्हापूरमध्ये एक मार्ग सुरू करत आहोत. कोकणात येणेजाणे या सर्व गोष्टींमुळे सोपे होणार आहे.

**पण वाहतूक नियम धाब्यावर बसवणाऱ्यांसाठी केंद्रातील 'मोटार व्हेइकल ॲक्ट'सारख्या कायद्यांतर्गत उपायांची गरज वाटत नाही का?**

होय, नक्कीच. आम्ही त्यावर विचार करत आहोत आणि लवकरच, योग्य वेळी त्याबाबत निर्णय जाहीर करू.

**कोकणातील गणेशोत्सवासाठी यावर्षी काही विशेष तयारी केली आहे का?**


यावर्षी आम्ही या मार्गावर एकूण २३०० बसेस सोडणार आहोत. मी स्वतः या मार्गावर फिरून पाहणी केली आहे. १४,१५ आणि १६ सप्टेंबरला हा मार्ग अवजड वाहनांसाठी बंद केला जाईल तसेच आवश्यक असल्यास काही वाहतूक कऱ्हाड, कोल्हापूर, इंदापूर, वडखळ आणि रेवदंड्याकडे वळविण्यात येईल. या मार्गावरील खड्डे बुजवण्याची आणि रस्त्यांची कामे तातडीने हाती घेतली आहेत. मुंबई-कोकण मार्गावरील वाहतूक कोंडी नियंत्रित करण्यासाठी बसेस कऱ्हाड मार्गाने वळविण्यात येणार आहेत. दर दोन तासांवर तात्पुरते बस थांबे बनवण्यात आले आहेत. जेथे स्वच्छतागृहांची सुविधा देण्यात येईल. या काळतील प्रवास टोलमुक्त करण्यासाठी नितीन गडकरी यांच्यासोबत चर्चा चालू आहे. बंद पडलेल्या वाहनांसाठी प्रथमच क्रेनची व्यवस्था करण्यात येणार आहे. पसळपे आणि रत्नागिरी येथे अपघातग्रस्तांसाठी रुग्णवाहिकांची सोय करण्यात आली आहे.

**अपघातातील बळींसाठी नुकसानभरपाई देण्यासंबंधी कायद्यामध्ये काही सुधारणांची गरज आहे असे तुम्हाला वाटते का?**

आपल्याकडे विम्यासंबंधी कोणताही कायदा किंवा धोरणे नाही. सध्या अपघातग्रस्तांना तीन लाख आणि वाहक व चालकला प्रत्येकी एक लाख रुपये देण्याची तरतूद आहे. गेल्या काही वर्षात या अपघातग्रस्त लोकांना सल्ले देणारी एक लॉबीच तयार झाली आहे. न्यायालयीन खटल्यांमध्ये आतापर्यंत जास्तीत जास्त सात लाख रुपयांपेक्षा जास्त कोणाला मिळाले नाहीत आणि त्यातही या सल्लागारांना देऊन यांच्या हातात ३-४ लाख रुपये येतात. त्यापेक्षा जर भरपाई वाढवून १० लाख केली तर बराच वेळ वाचेल. म्हणून मृत्यू किंवा अपंगत्व आले तर १० लाख रुपयांची तरतूद करण्याबद्दल विचार चालू आहे आणि भरपाई मिळवण्याची प्रकियाही सरळ आणि सोपी करण्यात येईल. सध्या जवळजवळ ८२००० दावे प्रलंबित आहेत.

**(लेखिका विविध विषयांवर लिहिणाऱ्या मुक्त पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०९७६८१२९३९८**

**राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील हे जनसामान्यांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेले नेते आहेत. आपल्या अत्यंत व्यस्त कार्यक्रमातही त्यांना भेटायला आलेल्या प्रत्येक व्यक्तिशी ते बोलतात. त्यांच्या समस्या जाणून घेतात. नुकतेच त्यांच्यासोबत संपूर्ण दिवस घालवायला मिळाला. त्यावेळी त्यांच्यातील कार्यकर्त्याचे, प्रशासकीय कौशल्याचे दर्शन घडले. प्रत्येक प्रश्नाकडे ते बारकाईने लक्ष देतात आणि त्याच्या सोडवणुकीसाठी उपाययोजनाही सुचवतात, असे या दिवसभरात दिसून आले.**



# प्रश्नांवर लक्ष आणि समस्यांची सोडवणूक

युवराज पाटील

अकोला जिल्ह्याला बऱ्याच वर्षांनंतर स्थानिक पालकमंत्री लाभले आहेत. अकोला जिल्ह्याचे रहिवासी असलेले व राज्याचे गृह (शहरे), नगरविकास, सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री असलेले डॉ. रणजीत पाटील यांच्याकडे सध्या पालकमंत्र्यांची जबाबदारी आहे. डॉ. पाटील एका राजकीय पण शेतकरी कुटुंबातून आलेले असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या वेदना नव्या नाहीत. तसेच ते या जिल्ह्यातच अनेक वर्षापासून वैद्यकीय सेवा करत आहेत. जिल्ह्यातील नामांकित अस्थिव्यंग तज्ज्ञ असल्यामुळे आणि गरिबांप्रती अतिशय कणव असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्याकडे जिल्ह्याचे पालकत्व आल्यामुळे ते प्रत्येक कामात वैयक्तिक लक्ष घालत आसतात. त्यामुळे विकासकामाला गती आली आहे.

एकेकाळी पांढऱ्या सोन्यासाठी भारतातच नाही तर युरोप खंडापर्यंत ज्या जिल्ह्याचे नाव होते, त्या अकोला जिल्ह्यातील शिवारातून आता कापूस हद्दपार झाला आहे. कपाशीची तुरळक लागवड होत आहे. गेल्या काही वर्षांपासून पावसाचा लहरीपणा वाढला आहे त्यामुळे तुलनेने कमी पाण्याचे आणि हातात नगदी दाम देणारे पीक म्हणून मोठ्या प्रमाणात शेतकरी सोयाबीनकडे वळले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मूलभूत समस्या सोडवण्याचे प्रमुख उद्दिष्ट आता जिल्ह्यात आहे. वीज जोडणी, जलयुक्त शिवार, पतपुरवठा या समस्या सोडवण्यासाठी पाऊल उचलणे आणि विविध योजनांमार्फत शासन आपल्या पाठीशी असल्याचा दिलासा सातत्याने पालकमंत्री देत असतात.

२३ ऑगस्टला पालकमंत्री सकाळी मुंबईवरून रेल्वेने अकोल्याला आले. नेहमीसारखे स्टेशनवरूनच लोकांच्या कामाची सुरुवात झाली. स्टेशनवर कार्यकर्त्यांचा जत्था होता. गाडीत बसण्यापूर्वी, 'काय काम आहे याची खात्री करून तुम्ही लगेच कार्यालयात या. मी फोन करून संबंधितांना सांगतो,' असे नम्रपणे कार्यकर्त्यांना त्यांनी सांगितले. त्यानंतर गाडी त्यांच्या जठारपेठेतील घराकडे निघाली. रस्त्यात एक दोन ठिकाणी थांबून लोकांची विचारपूसही झाली.

इंगळे नावाच्या स्थानिक स्वीय साहाय्यकाला दिवसभराच्या कामाची

रूपरेषा गाडीतच सांगितली. घरी आल्यानंतर तासाभरातच बंगल्यावर लोकांची गर्दी वाढू लागली. थोड्याच वेळात त्यांचा दिनक्रम सुरू झाला. लोकांशी व्यक्तिश: भेटून ते चौकशी व विचारपूस करू लागले. वेगवेगळ्या तालुक्यातून आलेल्या लोकांबरोबर पीकपाण्याची चौकशी करून जिथे अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले आहे, त्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी दिला. तुमच्या गावात येऊन सर्व समस्या जाणून घेऊन सोडवायच्या आहेत, हे अतिशय आत्मीयतेने सांगितल्यामुळे कार्यकर्त्यांच्या आणि गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद तरंगत असल्याचे स्पष्टपणे जाणवले.

घरी आलेल्या सर्वांबरोबर चहा घेत प्रत्येकाची वैयक्तिक ओळख असल्यामुळे त्यांच्या घरच्यांच्या आरोग्यापासून गावातल्या राजकारणापर्यंतच्या गप्पा सुरू झाल्या. ही अनौपचारिक गप्पांची मैफ़ल सुरू असतानाच अधूनमधून लोकांच्या कामासाठी शासकीय अधिकाऱ्यांना कामाच्या सूचना फोनवरून देणे सुरू झाले.

अकोला जिल्ह्यात गेल्या एक वर्षात ज्या शेतकरी आत्महत्या झाल्या त्यामागच्या कारणांचा शोध घेऊन एक एक काम मार्गी लावण्याचे उद्दिष्ट त्यांनी ठेवले आहे. त्याप्रमाणे ते बैठका घेत आहेत. वीज जोडणी लवकर होत नसल्याचेही एक कारण आत्महत्यांमागे असल्यामुळे वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित केली. घरी आलेल्या सर्वांची भेट घेऊन पालकमंत्री दुर्गा चौकातील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाकडे निघाले. तिथे जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या विभागीय मुख्य अभियंत्यापासून ते कनिष्ठ अभियंत्यापर्यंतचे सर्व अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता वीज वितरण कंपनीचे जिल्ह्यातील कामाचे सादरीकरण करताना, 'प्रत्येक विषयावर हे काम का थांबले, काय अडचणी आहेत,' याची चौकशी करून त्यावर योग्य ते उत्तर काढूनच पुढच्या मुद्द्याकडे पालकमंत्री वळले. बैठक दीडतास चालली, त्यातून त्यांना अपेक्षित असलेले उत्तर मिळाले. जिल्ह्यात जवळपास आठ हजार एवढ्या जोडण्या प्रलंबित आहेत. त्या जोडण्या येत्या एक वर्षात पूर्ण करण्याची हमी घेऊन जो निधी कमी पडेल तो शासन देईल; मात्र कोणत्याही परिस्थितीत या जोडण्या पूर्ण झाल्याच पाहिजे, असे आदेश देऊन पालकमंत्री पुढच्या दौऱ्यासाठी जायला निघाले. दरम्यान एका लग्नाला भेट देण्याचे ठरले. गाडी हॉटेल ग्रीनलँडकडे वळली तिथे सर्वांची भेट घेऊन आणि वधू-वरांना शुभेच्छा देऊन तेल्हारा तालुक्यातील पूरग्रस्त भागाला भेट देण्यासाठी गाडी वळणार तेव्हढ्यात दुसऱ्या एका ठिकाणी येण्याचा आग्रह त्यांना झाला. पुढच्यांचा आग्रह मोडता येत नाही म्हणून त्याही ठिकाणी भेट देऊन तेल्हारा तालुक्याच्या दौऱ्यासाठी पालकमंत्री निघाले.

अकोल्याकडून चौहट्टा मार्गे आडसूळ तेथून तळेगाव डवला शिवारात गाडी थांबवून त्यांनी शिवाराची पाहणी केली. तिथे नागरिकांची विचारपूस करून गाडी तळेगाव-बाभुळगावाकडे निघाली. त्याठिकाणी उतरून



शेतकऱ्यांशी थोडावेळ बोलले. पातुर्डा आणि पातुर्ड्यावरून वांगेश्वर (वांगरगाव) देवस्थानात जाऊन दर्शन घेऊन त्या ठिकाणी या पंचक्रोशीतून आलेल्या शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. अस्मानी संकट, बदलते हवामान, शेतकऱ्यांची हतबलता, सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याचे शासनाचे प्रयत्न याविषयी सविस्तर माहिती पालकमंत्र्यांनी दिली. जलयुक्त शिवार कामातून सुरू असलेल्या कामाचे महत्त्व, त्यातून ओलिताखाली येणाऱ्या जमिनी, ज्यांची वीज जोडणी प्रलंबित आहेत याविषयी चर्चा केली. प्रलंबित वीज जोडण्यासाठी येत्या काही महिन्यात विशेष मोहीम राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले. कौशल्य अभियानातून आता कमी शिकलेल्या मुलांनाही कमावण्याचे कसब असणारे प्रशिक्षण देण्याची योजना हाती घेतल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. पुरामुळे नुकसान झालेल्या जमिनीचे पंचनामे झाले असून तत्काळ मदतीबाबतही कार्यवाही केली जाणार असल्याचे स्पष्ट करून या भागातील पूर्णा नदीवरील पूल आणि रस्ते करण्याबाबत आपण आग्रही असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या संवादामुळे अनेक समस्यांची उत्तरे मिळाल्यामुळे उपस्थित नागरिक, शेतकरी समाधानी झाल्याचे दिसून आले. कार्यक्रम संपवून देवस्थानाच्या रोडग्याच्या प्रसादाचे जेवण त्यांनी उपस्थित सर्वांसोबत घेतले. त्यानंतर २२ तारखेचा दौरा आटोपून पालकमंत्री डॉ. रणजीत पाटील शासकीय कामानिमित्त नागपूरकडे निघाले. एवढी धावपळ, एवढे बोलुनही त्यांच्या चेहऱ्यावरला उत्साह मात्र कुठेही कमी झाल्याचे दिसले नाही हे विशेष...



**संपर्क : ०८८८८१६४८३४**

# प्रश्न सुटले, ‘समाधान’ मिळाले...

नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेले पहिले समाधान शिबिर अत्यंत यशस्वी झाले. या शिबिरात नागरिकांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले विविध प्रश्न मार्गी लागले. या पहिल्या समाधान शिबिराचे यश लक्षात घेऊन नुकतेच दुसरे असेच शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्र्यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न तातडीने कसे सुटतील, याकडे बारकाईने लक्ष दिले. प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक वाचून त्याक्षणीच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना त्यांनी दिल्या. आपले अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले प्रश्न आणि समस्या अशा तऱ्हेने तातडीने सुटत आहेत, याचे वेगळे समाधान या शिबिराला उपस्थित नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

**प्रत्येकाशी मुख्यमंत्री बोलतात... शांतपणे त्यांचे प्रश्न समजावून घेतात... जी महिला तक्रार घेऊन आली, तिचे आपोआपच डोळे पाणावतात. ‘तक्रार पूर्ण ऐकण्याच्या आधीच मुख्यमंत्र्यांना त्याचे गांभीर्य समजले अन् पटकन पोलीस आयुक्तांना फोन लावण्यास सांगितले. खरोखरच आम्ही धन्य झालो. आम्हाला वाटलेच नव्हते, मुख्यमंत्री एवढ्या तत्परतेने दखल घेतील,’ अशी कृतज्ञता व्यक्त करून ती महिला निरोप घेते. ही फलश्रुती आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या दुसऱ्या समाधान शिबिराची.**

### समस्यांची सोडवणूक ‘समाधान शिबिर’

‘जनता आणि प्रशासन यामधील सेतू म्हणून या शिबिराकडे पाहिले जावे. सामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी समाधान शिबिर हक्काचे व्यासपीठ आहे. या शिबिरांच्या माध्यमातून प्रशासनाने बजाविलेल्या भूमिकेबद्दल प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारीही अभिनंदनास पात्र आहेत. समाधान शिबिरांचे आयोजन शहरातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात केले जाईल,’ असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.




ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयात दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर प्रवीण दटके आदी उपस्थित होते. शहरात आयोजित पहिल्या समाधान शिबिरात १३३६ प्राप्त तक्रारींपैकी ९८१ तक्रारी निकाली काढल्या.

‘अरे पोलीस आयुक्तांना फोन लावा, हे बघा सामान्य माणसे कामे घेऊन मुख्यमंत्र्यांपर्यंत येतात. त्यांना काही समाजाकंटकांकडून त्रास होत असेल, तर त्यांना संरक्षण देणे, विश्वास देणे हे आपले कामच असते, असे सांगत असतानाच फोन लागतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोलीस आयुक्तांना म्हणतात, ‘संबंधितांचा तातडीने बंदोबस्त करा शहरात भीतीचे वातावरण अजिबात नसले पाहिजे.

**मोहन राठोड**

‘चला, पुढे कोण आहे,’ असे म्हणत मुख्यमंत्री एकएक करीत सर्वांचेच निवेदन स्वीकारीत असतात. प्रत्येकाशी मुख्यमंत्री बोलतात. शांतपणे त्यांचे प्रश्न समजावून घेतात. जी महिला तक्रार घेऊन आली होती, तिचे डोळे पाणावतात. दोन्ही पायाने अपंग असूनही उद्योगक्षेत्रात भरारी घेणारे जयसिंग चव्हाण यांना मुख्यमंत्री शेजारी बसवून घेतात. त्यांचे प्रश्न व अपंगाच्या अडीअडचणी समजून घेतात. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे सचिव सदानंद फुलझेले भेटतात. येत्या दसऱ्याला येण्याबाबतचे निवेदन स्वीकारण्याआधीच ‘फुलझेले साहेब, मी नक्की येणार,’ असे त्यांना आश्वासित करतात.

समाधान शिबिरासाठी मुख्यमंत्र्यांचे विमानाने नागपुरात आगमन झाल्यावर ते लगेच विमानतळावरूनच जामठा स्टेडियमजवळ उभारण्यात येणाऱ्या कर्करोग रुग्णालयाची जागा पाहायला गेले. हा नियोजित कार्यक्रम नव्हता. पोलीस अधीक्षक डॉ. आरती सिंह यांना त्यांनी अचानक सांगितले, रात्रीचे दहा वाजले होते. परंतु कर्करोगाच्या रुग्णांची वाढती



समाधान शिबिरात सहभागी झालेले नागरिक



संख्या पाहता रुग्णालय लवकर उभे झाले पाहिजे, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी या भेटीच्या वेळी व्यक्त केली.

माजी खासदार स्व. नामदेवराव दिवटे यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांना दुपारी दोन वाजता लाखांदूर येथे जायचे होते. परंतु सकाळपासून रामगिरी निवासस्थानावर शहरातीलच नव्हे तर बाहेरगावावरूनही मोठ्या संख्येने लोक भेटायला आले होते. प्रवेशद्वारावरही लोक थांबले होते. 'सर्वांना येऊ द्या. एवढ्या लांबून लोक येतात, त्यांची कामे आपण केलीच पाहिजेत. मोठ्या आशेने ते येतात, त्यांना अडवू नका,' असे संबंधित अधिकाऱ्यांना ते निर्देश देतात.

दिवसभर लोकांना मुख्यमंत्री भेटले. नागरिकांचे प्रश्न सुटावे म्हणून नागपूर येथील मुख्यमंत्री यांचे सचिवालय सुरू केले. समाधान शिबिर हा अभिनव उपक्रम सुरू केला. त्यामुळे जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. एका दिवसात ते जवळपास चारशे ते साडेचारशे नागरिकांना भेटले. 'आपण सामान्य माणसांचे प्रश्न सोडविलेच पाहिजे. त्यांची गाऱ्हाणी ऐकलीच पाहिजे,' असे ते अधिकाऱ्यांना सांगून पुढील कार्यक्रमासाठी निघतात.

संपर्क : ०९४२३८४८५४५

# तीन वर्षात गोसीखुर्द प्रकल्प सिंचनक्षम



लोकप्रतिनिधी जनतेच्या प्रश्नांप्रती संवेदनशील असले की सामान्यांचे प्रश्न चुटकीसरशी मार्गी लागतात. त्यांचे दु:ख हे स्वत:चे दु:ख समजून त्यावर फुंकर मारली तरी प्रजेला हायसे वाटते. याचा अनुभव गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोसीखुर्द प्रकल्पास नुकतीच भेट दिली. त्यावेळी नागरिकांशी संवाद साधताना ते म्हणाले, 'मी तुमचे दु:ख जाणतो आणि आज या दु:खावर काय उपाययोजना करता येतील याचा निर्णय घेण्यासाठी इथे आलो आहे. तुमचे प्रश्न मार्गी लावल्याशिवाय मी येथून जाणार नाही.' मुख्यमंत्र्यांचे हे शब्द कानावर पडताच त्यांच्यासमोर व्यथा मांडणाऱ्या प्रकल्पग्रस्त महिलेच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

**मनीषा सावळे**

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्प हा राज्यातील एकमेव राष्ट्रीय प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे २ लक्ष ५० हजार हेक्टर शेती सिंचित होणार असून याचा लाभ भंडारा, नागपूर आणि चंद्रपूर या तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. यासाठी केंद्र शासनाचा निधी मिळत असला तरी पुनर्वसनाची जबाबदारी पूर्णपणे राज्य शासनाची आहे. या प्रकल्पात पूर्णत: बाधित तब्बल ८५ गावांचे पुनर्वसन करायचे असून ३४ गावे भंडारा जिल्ह्यातील तर ५१ गावे नागपूर जिल्ह्यातील आहेत. मात्र कधी निधीची कमतरता तर कधी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या अशा कारणांनी हा प्रकल्प २८ वर्षांपासून रेंगाळत राहिला. म्हणूनच प्रकल्पात येणाऱ्या अडचणी समजून घेऊन श्री. फडणवीस यांनी या प्रकल्पाला भेट दिली.

सिंचन प्रकल्प, प्रकल्पग्रस्त आणि पुनर्वसन यांचे परस्परावलंबी नाते आहे. मोठ्या सिंचनप्रकल्पामुळे काही भागात समृद्धी येणार असली तरी त्यासाठी काही लोकांना आपले घरदार, शेती, रोजगार आणि मुख्य म्हणजे त्या गावाशी असलेले भावनिक नाते या सर्वांवर पाणी सोडावे लागते. त्यामुळे अशा पोरक्या झालेल्या प्रकल्पग्रस्तांना नवीन ठिकाणी जाताना पूर्वीपेक्षा चांगल्या ठिकाणी राहायला आलोत एवढा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर नक्की आणू शकतो. पक्के घर मिळाले, शुद्ध वातावरण, शुद्ध पाणी, चांगले रस्ते, मुलांचे भविष्य घडवणारी सुसज्ज शाळा, प्रत्येकाकडे वीज, समाजमंदिर आणि हाताला काम मिळाले तर कोणीही आनंदाने त्या ठिकाणी जाईल. म्हणूनच १८ नागरी सुविधांची कामे करताना प्रकल्पग्रस्तांचा माणूस म्हणून विचार करावा. आपल्याला कधी तिथे राहायला जाण्याचा प्रसंग आला तर आपण राहू शकलो पाहिजे, असा विचार करूनच पुनर्वसनाची कामे पूर्ण करून आदर्श गाव तयार करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. प्रकल्पग्रस्तांना चांगले जीवनमान आणि सुविधायुक्त पुनर्वसन मिळावे यासाठी सगळ्या अटी रद्द करून निधी देण्याचा निर्णयही मुख्यमंत्र्यानी घेतला. सिंचन क्षमता निर्माण करणारी कामे आणि पुनर्वसनाच्या कामांसाठी त्यांनी ७०० कोटी रुपये मंजूर केले. बावनथडी प्रकल्पासाठी १२० कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे. त्याचबरोबर या सर्व कामांवर स्वत: नियंत्रण ठेवणार असल्याचे जाहीर करून कामे दर्जेदारच झाली पाहिजेत हे सांगायला ते विसरले नाहीत. त्यामुळे पुनर्वसन कामांमुळे रेंगाळलेला हा प्रकल्प पुढील तीन वर्षात पूर्ण होऊन शेतीच्या सिंचनाचे स्वप्न साकार होण्यासोबतच आदर्श पुनर्वसनही पाहायला मिळेल यात शंका नाही.

# संकटग्रस्त मराठवाड्याला दिलासा

**औरंगाबाद विभागातील विद्यमान परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवार, दिनांक २३ ऑगस्ट रोजी औरंगाबाद येथे तपशीलवार आढावा घेतला. चारा, पाणी आणि रोजगार याबाबतीत विभागात करण्यात आलेले नियोजन समाधानकारक असून राज्य शासन संकटग्रस्त जनतेच्या पाठीशी सर्व सामर्थ्यानिशी उभे आहे. चारा, पाणी आणि रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कोणत्याही परिस्थितीत पैसा कमी पडू देणार नाही, याची ग्वाही त्यांनी दिली.**

मराठवाडा विभागातील जनता गेल्या काही वर्षांपासून अनियमित, अपुऱ्या व अवेळी होणाऱ्या पावसामुळे निर्माण होत असलेल्या परिस्थितीला तोंड देत आहे. २०११ च्या पावसाळ्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत ८४ टक्के, २०१२ मध्ये ६९ टक्के, २०१३ मध्ये १०९ टक्के, गतवर्षी २०१४ मध्ये ५३ टक्के तर यंदाच्या पावसाळ्यात २२ ऑगस्टपर्यंत वार्षिक सरासरीच्या ३१ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यातच गेली दोन वर्षे विभागात गारपीट झाली. अपुऱ्या पावसाचा शेतीवर आणि एकूणच जीवनव्यवहारावर विपरित परिणाम होत आहे. यंदाच्या आजवरच्या अपुऱ्या पावसाला गेल्या वर्षीच्या अपुऱ्या पावसाची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे विभागात यंदा भरपावसाळ्यात ९८३ गावे आणि ५१३ वाड्यांना १,२९१ टँकरद्वारे पाणी पुरवले जात आहे.

शासनाने विभागातील बीड, लातूर, उस्मानाबाद या तीन जिल्ह्यात गुरांसाठी छावण्या उघडण्यास परवानगी दिली आहे. छावण्या उघडण्याच्या निर्णयाची नियोजनपूर्वक अंमलबजावणी केली जावी आणि मागील अनुभव लक्षात घेऊन हा निर्णय राबवला जावा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. पाणीपुरवठ्यासाठी रिसोर्स मॅपिंग करण्यात आलेले आहे. त्याचा वेळोवेळी आढावा घ्यावा, असे त्यांनी निर्देशित केले. आजची परिस्थिती संकटाची आहे, मात्र या संकटाचे रूपांतर संधीत केले पाहिजे असे सांगून त्यांनी टंचाईग्रस्त भागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त कामे सुरू करण्यात यावीत, या कामात जलसंधारणाशी निगडित बाबींचा प्राधान्याने समावेश असावा असे ते म्हणाले.

**राधाकृष्ण मुळी**

शेतकऱ्यांसाठी स्वातंत्र्यदिनापासून अन्नसुरक्षा योजना सुरू करण्यात आली आहे तसेच त्यांना जीवनदायी योजनाही लागू करण्यात आली आहे. या सर्व निर्णयांची माहिती गावपातळीपर्यंत जावी तसेच गावात या योजनांची प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, हे थेट कळावे म्हणून गावोगावी जबाबदार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामसभा आयोजित करण्यात याव्यात असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस सप्टेंबर महिन्यात मराठवाडा विभागातील टंचाईग्रस्त भागाचा दौरा करणार आहेत. या बैठकीला राज्याचे महसूल व कृषिमंत्री एकनाथ खडसे, मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांचे पालकमंत्री दिवाकर रावते, बबनराव लोणीकर, डॉ. दीपक सावंत, दिलीप कांबळे आणि श्रीमती पंकजा मुंडे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट यांनी त्यांच्या सादरीकरणातून विभागातील परिस्थिती स्पष्ट करताना सांगितले की, विभागातील आठपैकी चार जिल्ह्यात अपेक्षित पावसाच्या तुलनेत ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. उर्वरित चार जिल्ह्यातही पावसाचे प्रमाण अपेक्षित सरासरीच्या तुलनेत ५० ते ७५ टक्के या मर्यादेत राहिले आहे. ७६ तालुक्यांपैकी ४१ तालुक्यात आणि ४२१ महसूल मंडळांपैकी २२५ महसूल मंडळात अपेक्षित सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाला आहे. विभागातील धरणातील पाणीसाठा, पाणीपुरवठ्यासंदर्भात योजण्यात आलेले उपाय, भविष्यातील नियोजन, पीक कर्ज वाटप, रब्बी हंगामाचे नियोजन, चारा छावण्या उघडण्यासाठी करण्यात आलेले नियोजन, शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील उपाययोजना अशा बाबींचा बैठकीत आढावा घेण्यात आला.



**जालना जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव लोणीकर यांनी त्यांचे सहा महिन्याचे मानधन, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी त्यांचे महिनाभराचे मानधन आणि जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीला दिले आहे. या संदर्भातील पत्र श्री. लोणीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सोपवले.**

संपर्क : ०९४२२६४८९२५

# दुर्बल घटकांच्या घरांना प्राधान्य

कॉ. मीनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या महिलांच्या १६०० घरांचा हस्तांतरण समारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. या समारंभास केंद्रीय कामगार राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) बंडारु दत्तात्रय, पालकमंत्री विजय देशमुख, खासदार सर्वश्री शरद बनसोडे, तपन सेन आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, 'राज्यात गरिबांसाठी घरे बांधणाऱ्या व्यक्ती, संस्था यांच्या पाठीशी शासन म्हणून आपण ठामपणे उभे राहू तसेच त्यांना आवश्यक ती सर्व मदत करू. या प्रकल्पामुळे गरीबांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले आहे. अतिशय चांगल्या दर्जाची घरे बांधण्यात आली आहेत. गरिबांसाठी राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेमध्ये सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी शासनामार्फत सर्व प्रकारची मदत केली जाईल. गरीबांना घरे देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे त्याच दिशेने राज्य शासनाची वाटचाल सुरू आहे.'

**कुंभारी येथे माजी आमदार नरसय्या आडम (मास्तर) यांनी विडी कामगारांसाठी राबवलेली योजना महत्त्वाकांक्षी योजना आहे. हा प्रकल्प ५१०० घरांचा असून यातील १६०० घरांचे प्रत्यक्ष लाभार्थीला हस्तांतरण केले जात आहे.**



या वसाहतीमध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी ५० खाटांचे रुग्णालय उभारणीसाठीच्या जागेचा प्रस्ताव एक महिन्याच्या आत पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

'विडी कामगार हा संघर्षातून पुढे आला आहे. त्याला स्वत:च्या घरात जाणे हा आत्मीय आनंद मिळावा यासाठी राबविण्यात येणारी ही महत्त्वाकांक्षी योजना असून त्यांच्यासाठी आणि माझ्यासाठीही हा आनंदाचा क्षण आहे. गरिबांसाठी बांधण्यात येणाऱ्या अशा वसाहती स्वयंपूर्ण असाव्यात. या वसाहतींना सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी योग्य ती मदत केली जाईल.'

राज्यात असंघटित कामगारांची नोंदणी सुरू करणार असून त्यांना सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्याच्या सुविधा मिळवून दिल्या जातील. सोलापूरच्या विकासासाठी योग्य ती सर्व मदत केली जाईल, कामगारांना किमान वेतन देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून या निर्णयाची योग्यप्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी पुढील महिन्यात सर्व संबंधितांची बैठक घेतली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**गोविंद अहंकारी**

संपर्क : ०९८५००९७०७३

जलयुक्त शिवार

# शेतीला नवसंजीवनी

**जलयुक्त शिवार योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील २१८ गावांची निवड करण्यात आली असून या गावांमध्ये विविध यंत्रणेमार्फत ३६१३ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांमुळे १७११२.७१ टीसीएम पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. पावसाने दडी दिल्याने जलयुक्त शिवारमुळे शेतकऱ्यांच्या हजारो हेक्टर शेतीला हा पाणीसाठा संजीवनी ठरला आहे.**

चंद्रपूर जिल्ह्यात २१८ गावामध्ये १५६.६२ कोटी रुपयांची एकूण ९४९५ कामे प्रस्तावित करण्यात आली असून त्यापैकी ४२१८ कामे सुरू करून ३६१३ कामे पूर्ण केली आहेत. यात प्रामुख्याने जुना सिमेंट नालाबांध खोलीकरण व शेततळे झाल्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. त्याचबरोबर जमिनीतील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भविष्यात जलयुक्त शिवारमुळे शेतकऱ्याला सिंचनाच्या शाश्वत सोई उपलब्ध होणार आहेत.

वरोरा कृषी विभागाच्या वतीने वरोरा, भद्रावती व चिमूर तालुक्यात नाला खोलीकरण व शेततळ्याचा विशेष कार्यक्रम राबवण्यात आला. कृषी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेली शेततळी व जुना सिमेंट नाला बांध पावसाच्या पाण्याने तुडुंब भरली आहेत. सिंचनाची कुठलीही सोय नसणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जुना सिमेंट नालाबांध व शेततळे वरदान ठरत आहे. ३५ जुने सिमेंट नालाबांध खोलीकरणामुळे यात ४९० टीसीएम पाणी साठले असून यातून या तालुक्यात ४५०० हेक्टर संरक्षित सिंचन झाले आहे. कृषी विभागाने वरोरा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी राबवलेला शेततळे कार्यक्रम शेतीला नवसंजीवनी देणारा ठरला आहे.

जलयुक्त शिवार कार्यक्रमांतर्गत वरोरा तालुक्यातील १९ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावात विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम व जलयुक्त शिवार मिळून करण्यात आलेल्या १३९ शेततळ्यांत काठोकाठ पाणी भरले असून यामुळे ३७५ एकर संरक्षित सिंचन होणार आहे. यासोबतच ६ जुने सिमेंट नाला बांध खोलीकरणामुळे, शेतातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. या कामामुळे या परिसरातील पीक घनता १४७ टक्के वाढली आहे.

विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम व जलयुक्त शिवार अंतर्गत १३९ शेततळी व ६ जुने सिमेंट नाला बांध खोलीकरण करण्यात आले. या सोबतच ९०० ढाळीचे बांध तयार करण्यात आले आहे. या बांधामुळे



पावसाचे पाणी शेतातच जिरणार असून अतिरिक्त पाणी नालीवाटे निघून शेततळ्यात जमा होणार आहे. यामुळे शेतातील गाळ वाहून जाण्याचे प्रमाण कमी होऊन पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे.

**रवी गिते**

सोयाबीन, कापूस व हरभरा या पिकासाठी शेततळे नवसंजीवनी देणारे ठरणार आहेत. महालगांव परिसरातील शेतकऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कृषी विभागाच्या साहाय्याने शेततळ्याच्या माध्यमातून उत्पादन वाढविण्याचे अभिनंदनीय पाऊल उचलले आहे. या चार गावात ३० बाय ३० चे व २० बाय २० चे लहान मोठे १३९ शेततळे तयार करण्यात आले आहेत. या शेततळ्यांच्या माध्यमातून ३७५ एकर जमिनीचे संरक्षित सिंचन होणार आहे. शेततळे व नाला खोलीकरणामुळे खरीप व रब्बी पिकाची उत्पादकता वाढली आहे. वरोरा तालुका कोरडवाहू म्हणून गणला जात असून या भागातील शेतकरी पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असतात. सोयाबीन, कापूस व हरभरा हे पीक घेणारे शेतकरी या परिसरात मोठ्या प्रमाणात असून या शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेततळ्यांचा मोठा हातभार लागणार आहे. महालगांव परिसरात ६ जुने सिमेंट बांध नाला खोलीकरणाच्या कामामुळे शेतातील पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे.



संपर्क : ०९४०३२३९२०७



# गौरव महाराष्ट्राचा....

स्थळ राजभवन. या ठिकाणी विविध सत्कार समारंभ नित्यपणे होत असतात. पण १९ ऑगस्ट २०१५ रोजी झालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा हा अनेक वर्षे उपस्थितांच्या स्मरणार्थ राहणारा ठरला.

अत्यंत भावस्पर्शी अशा वातावरणात शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवरांनी बाबासाहेबांच्या थोर कर्तृत्वाचे अतिशय समर्पक शब्दांत वर्णन केले. हा संपूर्ण सोहळा बाबासाहेबांच्या गौरवाने जसा व्यापला होता, तसाच शिवछत्रपतींच्या विविध प्रेरणादायी घटना आणि प्रसंगांच्या उल्लेखाने भारावून गेला होता. बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे गुणगान वक्त्यांच्या तोंडून ऐकताना उपस्थितांचे डोळे पाणावले.

बाबासाहेब पुरंदरे गेली अनेक वर्ष शिवचरित्रावर व्याख्यान देत असून आतापर्यंत त्यांनी १२००० हून अधिक व्याख्याने महाराष्ट्रासह जगभरात दिली आहेत. त्यांनी २५ हून अधिक ग्रंथ लिहिले आहेत. ऐतिहासिक महानाट्य 'जाणता राजा'चे लेखन त्यांनी केले आहे. शिवशाहीर, ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत म्हणून ख्यातकीर्त असलेल्या श्री. पुरंदरे यांनी केलेले लेखन लोकप्रिय आहे. १९ ऑगस्ट २०१५ रोजी राजभवन

**महाराष्ट्राची गौरवशाली शिवकालीन परंपरा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे काम बाबासाहेब पुरंदरे वयाच्या ९४ व्या वर्षीही करीत आहेत. अफाट बुद्धिमत्ता आणि स्मरणशक्तींच्या जोरावर ते शिवचरित्र आपल्या वाणीतून जिवंत उभे करतात. बाबासाहेबांनी केलेले लेखन आजही तितकेच लोकप्रिय आहे. संयम, चिकाटी व तीव्र स्मरणशक्ती, सखोल अभ्यासासह शिस्तबद्धता, वक्तशीरपणा ही त्यांच्या स्वभावाची खास गुणवैशिष्ट्ये आहेत.**

येथील दरबार हॉलमध्ये त्यांना महाराष्ट्राचा सर्वोच्च सन्मान महाराष्ट्र भूषण प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य उपस्थितांसमोर मांडून अजूनही आपला शिवाजी महाराजांवरचा अभ्यास सुरुच राहणार असल्याचे सांगितले.

या सोहळ्याला राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, मुंबई शहराचे पालकमंत्री सुभाष देसाई, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, परिवहन मंत्री दिवाकर रावते, गृहनिर्माण मंत्री प्रकाश मेहता, वित्त व नियोजन राज्यमंत्री दीपक केसरकर, महिला व बालविकास राज्यमंत्री विद्या ठाकूर, सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री दिलीप कांबळे, महापौर स्नेहल आंबेकर, खासदार अरविंद सावंत, खासदार संजय राऊत, आमदार सर्वश्री मंगलप्रभात लोढा, महादेव जानकर, डॉ. आशिष शेलार, डॉ. नीलम गोऱ्हे, प्रताप सरनाईक यांच्यासह महाराष्ट्र भूषण मंगेश पाडगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान मान्यवर कलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा

**वर्षा आंधळे**

जीवनप्रवास काही पोवाड्यातून सादर केला.

### गौरवाचा क्षण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषणात सांगितले की, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी सगळ्यांना अभिमान वाटावे असे महान कार्य मागील ७५ वर्ष केले असून; त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशातच नव्हे तर जगभर पोहचवला आहे. श्री. पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळणे हा एक गौरवाचा क्षण असून; महाराष्ट्र भूषण पुरस्कारात बाबासाहेब पुरंदरे यांचे नाव जोडले गेल्याने या सन्मानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी केलेले कार्य शिवचरित्र आणि 'जाणता राजा'च्या माध्यमातून श्री. पुरंदरे यांनी सर्वदूर पोहोचवले आहे. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाचे बीजरोपण त्यांनी याद्वारे केले आहे. 'जाणता राजा' आणि शिवचरित्र वाचले की, तरुणांना राष्ट्रभक्ती शिकवण्याची गरज उरत नाही. आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या खऱ्या सेवकाला राज्य शासनामार्फत सन्मानित करण्यात आले आहे.


कार्यक्रमात बोलताना सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. तावडे म्हणाले की, महाराष्ट्रात असे अनेक लोक आहेत ज्यांना कधी विचारले की तुम्हाला शिवाजी महाराजांची माहिती कशी मिळाली तर त्यांच्याकडून येणारे उत्तर हे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या लेखनातूनच मिळाली, असे असते. यावरून बाबासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा केलेला गाढा अभ्यास दिसून येतो. बाबासाहेब पुरंदरे यांना शिवशाहीर ही पदवी सुमित्राराजेंनी दिली होती. ही पदवी बाबासाहेबांना किती योग्य आणि समर्पक आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून महाराष्ट्राला दाखवून दिले आहे.

### सर्वोच्च आनंदाचा क्षण

मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. देसाई आपल्या भाषणात म्हणाले की, 'आज शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे. या आनंदाच्या क्षणाचा मला साक्षीदार होण्याची संधी मिळाली, याचे मी भाग्य समजतो. बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिल्याने महाराष्ट्र भूषण ही मालिका अधिकच समृद्ध झाली आहे.'



## कॅन्सरग्रस्तांसाठी २५ लाखांची मदत



**महाराष्ट्र भूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आपल्या भाषणात म्हणाले की, 'मला आज आनंद आहे की, मी सोप्या आणि सरळ भाषेत केलेले लेखन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले आहे. कलाकाराने कधीही अहंकारी असू नये आणि सतत नवीन काहीतरी शिकण्याची तयारी ठेवावी आणि म्हणूनच आज मी जरी ९४ वर्षांचा असलो तरी मला दररोज काहीतरी वाचावे, लेखन करावे असे सतत वाटत असते. राज्य शासनामार्फत देण्यात आलेला महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार ही माझ्यासाठी आनंदाची आणि तितकीच जबाबदारीची बाब आहे. गेली ८० वर्ष करीत असलेले कार्य यापुढील काळातही सुरू ठेवून माझ्याकडून अधिकाधिक चांगले लेखन व्हावे यासाठी माझा प्रयत्न असणार आहे. आज राज्य शासनामार्फत महाराष्ट्र भूषण या पुरस्काराबरोबरच १0 लाख रुपये मला रोख देण्यात आले असले तरी मी हे पैसे न घेता या पैशामध्ये माझे स्वत:चे १५ लाख रुपये घालून एकूण २५ लाख रुपये पुण्यातील मा. दिनानाथ आणि माई मंगेशकर रुग्णालयाला कॅन्सर रुग्णांच्या मदतीसाठी देणार आहे.'**

### आतापर्यंतचे महाराष्ट्र भूषण

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित तज्ज्ञांच्या समितीने सन २०१५ च्या या पुरस्कारासाठी श्री. बळवंत मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे यांची निवड केली होती. महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरीक सन्मान असून हा पुरस्कार सन १९९७ पासून देण्यात येतो.

आतापर्यंत पुढील मान्यवरांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. पु. ल. देशपांडे (साहित्य), लता मंगेशकर (संगीत), सुनील गावस्कर (क्रीडा), डॉ. विजय भटकर (विज्ञान), सचिन तेंडुलकर (क्रीडा), भीमसेन जोशी (कला), डॉ. अभय बंग व राणी बंग (सामाजिक प्रबोधन), बाबा आमटे (सामाजिक प्रबोधन), डॉ. रघुनाथ माशेलकर (विज्ञान), रतन टाटा (उद्योग), रा. कृ. पाटील (सामाजिक प्रबोधन), मंगेश पाडगावकर (साहित्य), नानासाहेब धर्माधिकारी (समाज प्रबोधन), सुलोचना (मराठी चित्रपट), जयंत नारळीकर (विज्ञान), डॉ. अनिल काकोडकर (विज्ञान).

## २७ सप्टेंबर जागतिक पर्यटन दिवस



अजिंठा लेणी



एलिफंटा

# अमर्याद महाराष्ट्र



एलोरा

महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. त्याचबरोबर येथील मनगटांनी सौंदर्याच्या नव्या परिभाषा निर्माण केल्या आहेत. त्यामुळेच विस्तीर्ण अशा सह्याद्री घाटाबरोबरच अजंठा-वेरूळची लेणी, एलिफंटा लेणी आणि छत्रपती शिवाजी टर्मिनसला 'जागतिक वारसा' म्हणून मान्यता मिळाली आहे. विस्तीर्ण समुद्र किनारा, ढगांशी स्पर्धा करणारे डोंगर आणि उत्कटतेने कोसळणारे धबधबे बघण्यासाठी देशविदेशातून पर्यटक महाराष्ट्रात येतात. आधुनिक सोयी-सुविधांची उपलब्धता आणि दळणवळणाची उत्तम सोय यामुळे आगामी काही वर्षात महाराष्ट्र पर्यटकांसाठी सर्वोत्कृष्ट ठिकाण ठरेल, यात शंकाच नाही.



छत्रपती शिवाजी टर्मिनस



कास पठार



राधानगरी



चांदोली



कोयना




# स्मार्ट नागपूरची स्मार्ट मेट्रो

१९२१ मध्ये केवळ १ लाख ४५ हजार लोकसंख्येचे शहर असणाऱ्या नागपुरात आज २४ लाखांपेक्षाही अधिक लोक राहतात. शहरात फिरण्यासाठी आपल्याकडे स्वतःचे वाहन असावे असे प्रत्येकाला वाटू लागल्याने खासगी वाहन वापरणाऱ्यांचीच संख्या शहरात अधिक झाली आहे. २००६ मध्ये नागपुरातील रस्त्यांवर दुचाकी, चारचाकी, ट्रान्सपोर्ट वाहने अशी मिळून ८ लाख २४ हजार १८५ वाहने होती. आता या वाहनांची संख्या १२ लाखांच्या वर जाऊन पोहोचली आहे. वाहतूक पोलिसांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार २०१७ मध्ये वाहनांची संख्या किती वाढेल याचे जे अंदाज बांधण्यात आले तेवढी वाहनांची संख्या २०१३ मध्येच वाढली. शहरातील ५५ टक्के नागरिक दुचाकीने तर १० टक्के नागरिक कार-जीप-व्हॅनसारख्या वाहनांतून प्रवास करतात. धक्कादायक बाब म्हणजे शहरात सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करणारे केवळ ८ टक्के आहेत. नागपुरातील संपूर्ण रस्त्यांची लांबी १ हजार ९०७ किलोमीटर असून महत्त्वाच्या रस्त्यांची लांबी ५०० किलोमीटर आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्यासाठी हे रस्तेही अपुरे पडणार आहेत. त्यामुळे नागरिकांना खाजगी वाहनापासून सार्वजनिक वाहतूक सेवेकडे वळविण्याचे मोठे आव्हान आहे. भविष्य काळातील धोक्यांची घंटा दर्शविणारे हे चित्र बदलण्यासाठी आता मेट्रो रेल्वेशिवाय पर्याय नाही असा विश्वास नागपूरकरांमध्येही निर्माण झाला आहे.

**प्रवाशांबरोबर, पर्यटक आणि खरेदीदारांनाही आकर्षित करणाऱ्या मेट्रोमुळे नागपूरचे जनजीवन बदलणार आहे. मुंजे चौकासोबत अंबाझरीला या प्रकल्पामुळे नवा लूक प्राप्त होणार आहे. नागपूरचे पर्यटन स्थळ म्हणून अंबाझरी तलावाला आजही पर्यटक भेट देतात. या पर्यटनस्थळात आता नागपूर मेट्रोमुळे मोठी भर पडणार आहे. सुमारे १५ मीटर उंचावर या ठिकाणी वॉक वे तयार करण्यात येणार आहे. धरमपेठ कॉलेज ते रचना नगरपर्यंत असणाऱ्या या वॉकवे मधून अंबाझरी तलावाचे खरे सौंदर्य पाहण्याची संधी आता नागपूरकरांना मिळणार आहे. या 'वॉक वे'ला ग्लास वॉलही तयार करण्यात येणार आहे. कमर्शिअल सेंटरही याठिकाणी तयार करण्यात येणार असल्याने खरेदीसाठी आणखी एक ठिकाण नागपूरकरांना उपलब्ध होणार आहे.**

### मेट्रोचा प्रगती अहवाल

मेट्रो रेल्वे साकारण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीची नोंदणी १८ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. १३ मार्च रोजी दिल्लीत झालेल्या एनएमआरसीएलच्या

**प्रवीण लोणकर**

बैठकीत मेट्रो रेल्वे साकारण्यासाठी निर्णय घेण्याचे सर्वाधिकार व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांना देण्यात आले आहे. त्यामुळे मेट्रो रेल्वेच्या कामाला दिशा मिळाली.
दीक्षाभूमीजवळील मौजा लेन्ड्रा या नागपूर सुधार प्रन्यासच्या जागेवर नागपूर मेट्रो रेल्वेचे प्रशासकीय कार्यालय उभारण्यात येत आहे. नागपूर मेट्रो रेल्वेला ओळख निर्माण व्हावी यासाठी लोगो

तयार करण्यात आला आहे. प्रत्येकाला मेट्रो आपलीशी वाटावी यासाठी 'माझी मेट्रो' असा उल्लेख या लोगोवर आहे. ३७० ठिकाणी भूसर्वेक्षण काम सुरू असून ते आता अंतिम टप्प्यात आहे. नागपुरातील मेट्रो रेल्वे प्रकल्प साकारण्यासाठी कुठलीही अडचण येऊ देणार नाही असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

### महत्त्वाच्या घडामोडी

- नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन कंपनीची नोंद १८ फेब्रुवारी रोजी झाली.
- १३ मार्च रोजी निर्णय घेण्याचे सर्वाधिकार व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांना देण्यात आले.
- फ्रान्सस्थित फ्रेन्च डेव्हलपमेंट एजन्सीचे पथक २६ ते २८ मार्च रोजी नागपुरात येऊन गेले.
- राइट्स आणि डीएमआरसीची अंतर्गत सल्लागार म्हणून नियुक्ती
- www.metrorailnagpur.com संकेतस्थळाचे उद्घाटन २२ मार्च रोजी.
- विमानतळ ते खापरी पहिल्या कामाची निविदा १७ एप्रिल रोजी.
- मौजा लेंन्ड्रा येथे प्रशासकीय इमारतीचे काम सुरू.
- उद्योग भवन येथे तात्पुरते कार्यालय सुरू
- मेट्रो रेल्वेच्या मार्गात येणाऱ्या कार्यालय स्थानांतरणाचा प्रस्ताव राज्याकडे
- जिओटेक्निकल सर्वेक्षणाच्या कामाला १६ मे पासून सुरुवात.

## अशी धावेल मेट्रो...

**मार्ग १- ऑटोमोटिव्ह चौकातून निघणारी मेट्रो नारी रोड, इंदोरा चौक, कडबी चौक, गड्डी गोदाम चौक, कस्तुरचंद पार्क, झिरो माइल, सीताबर्डी, काँग्रेसनगर, रहाटे कॉलनी, अजनी चौक, छत्रपती चौक, जयप्रकाशनगर, उज्ज्वल नगर, एरअपोर्ट, मिहान पर्यंत जाणार आहे.**

**मार्ग २- प्रजापतीनगर येथून निघणारी मेट्रो वैष्णवदेवी चौक, आंबेडकर चौक, टेलिफोन एक्सचेंज, चिताळओळी चौक, अग्रसेन चौक, दोसर वैश्य चौक, नागपूर रेल्वे स्टेशन, सीताबर्डी, झांशी राणी चौक, शंकर नगर चौक, एलएडीचौक, धरमपेठ कॉलेज, सुभाषनगर, वासुदेवनगर, बंसीनगर, लोकमान्यनगरपर्यंत जाणार आहे.**

- विमानतळ ते खापरी या ८६ कोटी रुपयांच्या कामाला ३१ मे रोजी सुरुवात.
- ११० कोटी रुपयांचे काम प्रगतिपथावर

### जनरल कन्सलटन्टची भूमिका

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी ज्यांच्यावर असणार त्या जनरल कन्सलटन्टला एनएमआरसीएलने ४८ महिने म्हणजे चार वर्षांचा अवधी दिला आहे. हा प्रकल्प वेळेच्या आतच पूर्ण होणार असल्याचा विश्वास एनएमआरसीएलच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. मेट्रो रेल्वेची संपूर्ण जबाबदारी जनरल कन्सलटन्टवर असणार आहे. छोट्या कामांना सुरुवात झाली असली तरी जनरल कन्सलटन्ट नेमणे हा सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. मेट्रो रेल्वेचे डिझाइन तपासणे, ड्राईंगमध्ये बदल सुचविणे, बांधकामावर देखरेख ठेवणे, प्रकल्पाच्या साहित्याची तपासणी करणे या सर्व कामांवर जनरल कन्सलटन्ट लक्ष ठेवणार आहे.

### मेट्रोमुळे बदलेल नागपूरचा चेहरा

मेट्रोमुळे नागपूरचा चेहरामोहरा बदलेल. या मेट्रोच्या मार्गावरील अनेक भागांमध्ये नावीन्यपूर्ण बदल अपेक्षित आहे. विशेषतः ऑटोमोटिव्ह चौक ते मिहान आणि प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर या दोन मार्गांवरील मेट्रो रेल्वे मुंजे चौकात क्रॉस होणार आहे. यासाठी मुंजे चौकात टॉवर तयार करण्यात येणार आहे. २० मजल्यांचे टॉवर आणि त्यातून मेट्रो जाणार असल्याचे विहंगम दृश्य मुंजे चौकात पाहायला मिळणार आहे. मुंजे चौकातील महाराष्ट्र बँकेच्या उंचीच्यावर ५ मीटर अंतरावरून मेट्रो रेल्वे क्रॉस होणार आहे. मुंजे चौकातील टॉवर साकारण्यासाठी आंतरराष्ट्रीय आर्किटेक्टची स्पर्धा भरविण्यात आली. त्यामुळे प्रवाशांच्या सुविधेबरोबर देश आणि विदेशातील पर्यटकांना आकर्षण ठरणारा टॉवर मुंजे चौकात साकारणार आहे.

### सौर ऊर्जेचा वापर

नागपुरातील मेट्रो ग्रीन मेट्रो असणार आहे. सोलर एनर्जीच्या माध्यमातून वीज निर्माण करण्यात येणार आहे. एनएमआरसीएलवर याचा अतिरिक्त भार न पडता ४० मेगावॅट वीज उपलब्ध होऊ शकेल. मेट्रो रेल्वेसाठी विजेची मोठी गरज यामुळे निर्माण होऊ शकेल. मेट्रो रेल्वेच्या सर्व स्थानकांच्या छतावर सोलर पॅनल लावण्यात येणार आहे. यासह सीमेवरील भिंतींवरही असे पॅनल लावण्यात येणार आहेत. मेट्रो रेल्वेसाठी लागणारी दोन तृतीयांश वीज ही सौर ऊर्जेच्या माध्यमातून प्राप्त होणार आहे.

### असे मिळेल उत्पन्न

मेट्रोसाठी येणारा खर्च केवळ तिकिटांतून मिळणाऱ्या उत्पनातून भागणार नाही यासाठी इतर आर्थिक स्रोत तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. टीओडी म्हणजेच ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट, एफएसआय वाढवून, स्टॅम्प ड्युटी वाढवून, विकास शुल्क आकारून येणाऱ्या नफ्यातून मेट्रो रेल्वेचा खर्च भागविण्यात येणार आहे.

**(लेखक हे महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राचे वरिष्ठ पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०९८२२६६०२००**






# नवी ओळख मुंबई प्रदेशाची

**मुंबईवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी मुंबई परिसरातील जिल्ह्यांचा विकास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मुंबई परिसरात आणखी ग्रोथ सेंटर्सची उभारणी गरजेची आहे. ही बाब लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई परिसरातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या विकासाकडे लक्ष दिले आहे. त्याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रात कल्याण ग्रोथ सेंटर विकसित करणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १ हजार ८९ कोटींच्या खर्चास नुकतीच मंजुरी दिली. या केंद्रामुळे कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ परिसराच्या विकासास मोठी चालना मिळणार आहे.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' टेक्स्ट ब्लॉकमधील २० हेक्टर इतकी जागा, आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रासाठी राखून ठेवण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या विशेष बैठकीत घेतला. या केंद्रासाठी नकाशे आणि नागरी संकल्पचित्रे तयार करून घेण्यात आली आहेत. या केंद्रामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मोठ्या व प्रतिष्ठित संस्थांची कार्यालये या परिसरात स्थापन होऊन आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवहार मुंबईत मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

या केंद्राच्या अनुषंगाने विविध नागरी सुविधा परिसरात उपलब्ध करून देण्याचा शासनाचा निर्धार आहे. तसेच परिसरात जागतिक दर्जाच्या परिवहन सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे ते वेगवान परिवहनाशी जोडले जाणार आहे. सध्या राष्ट्रीय पातळीवरील विविध वित्तीय संस्थांची येथे कार्यालये आहेत.

त्याचप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलास स्मार्ट दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ९५ कोटी ५७ लाख इतक्या खर्चासही मंजुरी देण्यात आली. यामध्ये वाय-फाय सेवा, स्मार्ट पार्किंग, सर्व इमारतींची एकत्रित देखरेख पद्धत, नियंत्रण केंद्र, आधुनिक पथदिवे, बससेवा इत्यादींचा समावेश आहे.



### मुंबई परिसरात ११८ किमी मेट्रोचे जाळे

बीकेसी आणि सीएसएलआर जवळ ७४४ कोटींचे तीन उन्नत मार्ग अंधेरी (पू.)–दहिसर (पू.) आणि दहिसर–डीएन नगर मेट्रोच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली.

मुंबई आणि परिसरात ११८ किमी लांबीचे मेट्रो मार्गाचे जाळे उभारण्यासाठी ३५ हजार ४०० कोटी रुपये मंजूर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. याशिवाय अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) आणि दहिसर ते डीएन नगर मेट्रो मार्गाच्या विस्तृत प्रकल्प अहवालासही मान्यता देण्यात आली असून वांद्रे–कुर्ला संकूल (बीकेसी) आणि सांताक्रुझ–चेंबूर जोडरस्ता (सीएसएलआर) जंक्शनवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तीन उन्नत मार्गांसाठी ७४४ कोटींच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

### दर्जेदार पायाभूत सुविधा

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील विकासकामांसाठी प्राधिकरणाकडून ६० कोटी ६१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने रस्ते मजबुतीकरण, काँक्रिटीकरण, गटार बांधकामासाठी हा निधी उपलब्ध होणार असल्यामुळे या क्षेत्रातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. मुंबईलगतच्या जिल्ह्यांसाठी प्राधिकरणाच्या माध्यमातून भरीव तरतुदीमुळे या भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावणार आहे.

### कल्याण ग्रोथ सेंटर

कल्याण ग्रोथ सेंटरच्या उभारणीसाठी प्राधिकरणाने मान्यता दिली असून त्याच्या विकासासाठी एक हजार ८९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. हे केंद्र रस्ता आणि रेल्वे मार्गांनी जोडण्यात येणार आहे. यामुळे मुंबईबाहेर रोजगारनिर्मिती होऊन महानगर प्रदेशाचा समतोल विकास होण्यास मदत होणार आहे. विकास केंद्र विकसित करण्यासाठी प्राधिकरणातर्फे लवकरच पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे.



या ग्रोथ सेंटरच्या एक हजार ८९ हेक्टर क्षेत्रापैकी पहिल्या टप्प्यात नगर नियोजन योजनेच्या माध्यमातून ३३० हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. या क्षेत्रापैकी ३३० हेक्टर क्षेत्रामध्ये मोकळ्या जागा उपलब्ध असून सुमारे ४४ हेक्टर शासकीय जमिनींचा समावेश आहे. ही जमीन प्राधिकरणास विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येईल. हे ३३० हेक्टर क्षेत्र निळजे रेल्वे स्टेशन व राज्य मार्ग क्रमांक ४० व ४३च्या मधील असून या क्षेत्राच्या पश्चिमेला मेगासिटी प्रकल्प व पूर्वेला विशेष नगर वसाहत प्रकल्प विकसित करण्याचे काम सुरू आहे.

प्राधिकरणाने २०१४ मध्ये कोरियन सरकारच्या मदतीने एक हजार २१ हेक्टर क्षेत्रावरील या सेंटरच्या प्राथमिक अभ्यासात रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट क्लस्टर, वाणिज्य व रहिवासी वापर तसेच सार्वजनिक सोयी सुविधा प्रस्तावित केल्या आहेत. या वापरासाठी दोन ते चार चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेतला आहे. त्यानुसार त्याच्या विकासासाठी एकूण ११ हजार ८९० कोटी रुपये खर्च दर्शविला होता. सद्यःस्थितीत २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठी शासनाने मार्च २०१५ मध्ये मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार वगळलेला भाग यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये अधिमूल्य आकारून कमाल चटई क्षेत्र निर्देशांक १.९५ हा ४००० चौ. मी. पेक्षा मोठ्या भूखंडांना जे २४ मी. पेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यालगत आहेत त्यांना देण्यात येणार आहे. हे ग्रोथ सेंटर रस्ता आणि रेल्वे मार्गांनी जोडलेले असून ठाणे शहराच्या हद्दीलगत असून परिसरात वसाहती आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. या ठिकाणी प्रादेशिक स्तरावरचे उपक्रम, कार्य, सामुदायिक सभा, प्रदर्शन आणि संस्थात्मक वापरासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या केंद्राच्या सुनियोजित विकासामुळे अधिक चांगल्या स्वरूपात पायाभूत सोयीसुविधा निर्माण होऊन या क्षेत्रामधील व्यावसायिक व औद्योगिक गुणवत्तेस वाव मिळण्यास मदत होणार आहे. या केंद्राच्या पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाकरिता एक हजार ८९ कोटी रुपये खर्चाच्या तरतुदीसाठी या वेळी मान्यता देण्यात आली आहे.



**– प्रवीण कुलकर्णी**

## सामाजिक न्याय वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांसाठी १२५ कोटी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०१५ ते १४ एप्रिल २०१६ हे वर्ष राज्य शासनातर्फे समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. संपूर्ण राज्यात त्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व कार्यक्रमांसाठी १२५ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी मंत्रीस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समता व सामाजिक न्याय वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबरोबरच काही महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आले आहेत. या अंतर्गत पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी (बार्टी) नवीन प्रशासकीय इमारत आणि संकुल निर्माण करणे, नोकरी करणाऱ्या अनुसूचित जातीच्या महिलांसाठी मुंबई, पुणे आणि नागपूर येथे वसतिगृह तसेच मुलींसाठी ५० विद्यार्थी क्षमतेची तालुकास्तरीय ५० वसतिगृहे बांधणे आणि दलित वस्त्यांच्या सर्वंकष विकासाची योजना यांचा समावेश आहे. दलित उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शनही मुंबईत भरविण्यात येईल.



डॉ. आंबेडकर यांच्या दुर्मीळ छायाचित्रांचे आणि साहित्याचे प्रकाशन करून ते संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासह संविधान उद्देशिका आणि समता दिनदर्शिका प्रकाशन, परिसंवाद, चर्चासत्र आणि कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या ऐतिहासिक वर्षात इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या बांधकामास तातडीने सुरुवात करण्याचा शासनाचा निर्धार आहे. तसेच केंद्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर राज्यात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान' स्थापन करण्यात येणार आहे. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित असलेली घटनास्थळे आणि महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देण्यासोबतच त्यांचा विकास करण्यात येणार आहे.

## डॉ. आंबेडकर यांच्या लंडनमधील वास्तू खरेदीचा प्राथमिक करार पूर्ण



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही काळ वास्तव्य असलेल्या लंडनमधील वास्तूच्या खरेदीबाबत राज्य शासनाकडून प्राथमिक करार पूर्ण करण्यात आला आहे. उर्वरित प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाणार असल्याची माहिती सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडनमधील ऐतिहासिक वास्तूचे रूपांतर आंतरराष्ट्रीय स्मारकात केले जाणार आहे. या वास्तूच्या खरेदीशी संबंधित करार (डीड ऑफ एक्स्चेंज) राज्य शासनातर्फे वास्तुचे मालक डगलस माईली यांच्याशी करण्यात आला. लंडनमधील भारतीय उच्चायुक्त कार्यालयाचे प्रथम सचिव एम. पी. सिंग यावेळी उपस्थित होते. याविषयी माहिती देताना श्री. बडोले म्हणाले की, ही खरेदीची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाणार आहे.

डॉ. आंबेडकरांच्या लंडनमधील निवासस्थान खरेदीची १० टक्के रक्कम मालकाला देण्यात आली असून, निवासस्थान खरेदी करारासंबंधीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारकडून उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल. याबाबत वास्तूच्या मालकाशी करार झाल्यानंतर वास्तूची चावी प्राप्त झाली आहे.

## तारांकित

### 'गोविंदा' आता साहसी क्रीडा

गोकुळाष्टमी हा अतिशय लोकप्रिय उत्सव असून, या दिवशी गोविंदा पथकांकडून मनोरे उभे केले जातात. या प्रक्रियेत युवक, युवतींचा मोठा सहभाग असतो. साहस, जिद्द, चिकाटी, संघभावना हे गुण वाढीस लागतात. क्रीडा धोरणांतर्गत 'गोविंदा'ला साहसी क्रीडा प्रकार म्हणून शासन मान्यता देण्यात येत असल्याची घोषणा क्रीडा व युवक कल्याण मंत्री विनोद तावडे यांनी केली आहे.



यासंदर्भात आमदार आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्यांच्या अहवालानुसार विविध विभागांशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे. गोविंदा पथकात सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या सुरक्षेबाबत धोरण आखण्यात आले आहे. १२ ते १५ वर्षे वयोगटातील गोविंदा चार थरांहून अधिक उंच थर रचणार असतील तर, त्यांच्या पथकाकडे व आयोजकांकडे त्यांच्या पालकांच्या मान्यतेचे पत्र असणे आवश्यक असणार आहे. गोविंदा पथक, स्पर्धा आयोजक यांनी याबाबत काय काळजी घ्यावी याबाबतही स्पष्ट नियम करण्यात आले आहेत.

## उपराजधानीत क्रांतिकारकांचे स्मारक



नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने नागपूर जिल्ह्यातील १०० क्रांतिकारकांच्या बलिदानाचे शहीद स्मारक नागपुरातील मॉरीस कॉलेज, टी पॉइंटजवळ उभारले आहे. या स्मारकाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी क्रांती दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात बलिदान दिलेल्या सर्व क्रांतिकारक व स्वातंत्र्यसंग्राम सेनानी यांना मानवंदना अर्पण केली. 'स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिकारकांनी बलिदान देऊन जे स्वातंत्र्य आपल्याला दिले त्या थोर क्रांतिकारकांना मानवंदना अर्पण करताना स्वातंत्र्याचे मोल काय आहे हे समजून घेण्यासाठी प्रत्येक भारतीयाने शहीद स्मारकास भेट द्यावी आणि देशासाठी त्यांनी केलेल्या बलिदानाची आठवण करावी,' असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

## 'टेली मेडिसीन' कार्यक्रमात 'शिव आरोग्य सेवा' प्रभावी

सुदृढ व निरोगी महाराष्ट्रासाठी 'शिव आरोग्य सेवा' ही योजना 'टेली मेडिकल कॅम्प' द्वारे तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून राज्यातील दुर्गम भागातील रुग्णांवर उपचार करीत आहे. या उपक्रमाचे मेळघाट ते दिल्ली असे प्रत्यक्ष सादरीकरण केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्यासमोर नवी दिल्ली येथे करण्यात आले.

महाराष्ट्रात शिवआरोग्यसेवा अतिशय प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. यामुळे आरोग्यसेवेची कमतरता असलेल्या ग्रामीण आणि दुर्गम भागातील असंख्य रुग्णांना विशेषत: आदिवासी बांधवांना याचा फायदा होत आहे. या रुग्णांसाठी ही योजना संजीवनीसमान ठरली आहे. देशातील 'टेली मेडिसीन' कार्यक्रमात 'शिव आरोग्य सेवेचे' योगदान महत्त्वाचे असल्याची प्रशंसा श्री. नड्डा यांनी या सादरीकरणानंतर केली. राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी 'टेली मेडिसीन' सेवेचे सादरीकरण केले. यावेळी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी राज्यातील मेळघाट भागातील सेमाडोह येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण आणि डॉक्टर्स तसेच मुंबई येथील स्टुडिओत बसलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूचे अभिनंदन केले. यावेळी खासदार चंद्रकांत खैरे, आनंदराव अडसूळ, अरविंद सावंत, कृपाल तुमाने आणि महाराष्ट्र राज्य कुटुंब कल्याण विभागाच्या आयुक्त व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संचालक श्रीमती कुंदन यावेळी उपस्थित होत्या.






# तारांकित

## 'शिवनेरी'मध्ये महिलांसाठी राखीव जागा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे चालविण्यात येणाऱ्या सर्व शिवनेरी बसेसमध्ये २९ ऑगस्ट २०१५ पासून म्हणजे रक्षाबंधनाच्या दिनापासून महिलांसाठी दहा आसने राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती, परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी दिली आहे.

रक्षाबंधनाच्या दिवसापासून



महिलांसाठी शिवनेरी बसेसमधील आसन क्र. ३ ते १२ अशी एकूण दहा आसने राखीव ठेवण्यात येतील. ही योजना सध्या प्रायोगिक तत्त्वावर राज्यात राबवण्यात येत असून दादर–स्वारगेट, दादर–पुणे स्टेशन, ठाणे–स्वारगेट, शिवाजीनगर, नाशिक, शिवाजीनगर –औरंगाबाद या शिवनेरी बसेसच्या फेऱ्यांकरिता महिलांच्या आरक्षणाबाबतची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**शिवनेरीत सुगम संगीत :**

समाजाला सामर्थ्य देणाऱ्या मराठी साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी शिवनेरी बसमध्ये हेडफोनद्वारे मराठी कविता, गाणी, कथाकथन आणि इतर साहित्याचा आस्वाद प्रवाशांना घेता येईल अशी व्यवस्था लवकरच करण्यात येईल, अशी घोषणा परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी केली आहे.

## स्मार्ट सिटी पुणे



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा मोठ्या प्रमाणावर लावण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांची सुरक्षितता अधिक भक्कम होईल. सीसीटीव्ही कार्यान्वित होत असल्याने या दोन्ही शहरांची स्मार्ट सिटीच्या दिशेने गतीने वाटचाल होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठीच्या सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पाचे लोकार्पण झाले. पुणे पोलीस आयुक्तालयात झालेल्या या कार्यक्रमास पालकमंत्री गिरीश बापट, राज्यमंत्री दिलीप कांबळे, राज्यमंत्री विजय शिवतारे, राज्यमंत्री प्रा. राम शिंदे, अतिरिक्त मुख्य सचिव के.पी. बक्षी आदी उपस्थित होते.

पुणे शहर हे राज्यातीलच नव्हे देशातील एक महत्त्वाचे शहर आहे. शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाणाऱ्या पुणे शहराची सध्याची ओळख एक उद्योग नगरी, आयटी नगरी, चित्रपटनिर्मितीचे केंद्र म्हणून विकसित झाली आहे.

देशभरातून येथे रोजगारासाठी लोक येत आहेत. त्यामुळे साहजिकच पुण्याच्या वाढत्या पसाऱ्यामुळे काही प्रश्न आणि समस्याही उद्भवत आहेत. या समस्यांवर विशेषत: गुन्हेगारीवर प्रभावी पद्धतीने लक्ष ठेवता यावे यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. देशातील सर्वाधिक मनुष्यबळ राज्यातील पोलीस दलात आहे. वाढत्या शहरीकरणामुळे पोलीस दलाची संख्या वाढवावी, अशी मागणी असते. पण या त्याऐवजी स्मार्ट पोलिसिंगची संकल्पना सीसीटीव्हीच्या माध्यमातून साध्य होणार आहे. याच धर्तीवर मुंबईच्या एका परिमंडळात येत्या नोव्हेंबरपर्यंत तर संपूर्ण मुंबईत पुढील वर्षीच्या ऑक्टोबरपर्यंत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## न्या. टहलियानी नवे लोकायुक्त



मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मदनलाल लक्ष्मणदास टहलियानी यांनी २४ ऑगस्ट रोजी राज्याचे लोकायुक्त म्हणून शपथ घेतली. राजभवन येथील दरबार हॉलमध्ये राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी त्यांना पदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण मंत्री विनोद तावडे तसेच उच्च न्यायालयातील न्यायाधीश आदी मान्यवर उपस्थित होते.

# तारांकित

## राजभवनात सर्वांना प्रवेश

समुद्रकिनारी मलबार हिलसारख्या आलिशान आणि निसर्गरम्य ठिकाणी वसलेल्या राजभवनाबद्दल सर्वांनाच उत्सुकता असते. मात्र काही मोजक्या लोकांनाच ते पाहण्याची संधी मिळते. परंतु आता सर्वसामान्यांनाही राजभवनाला भेट देता येणे शक्य आहे. राजभवनातून सर्वसामान्य नागरिकांना सूर्योदय पाहता येणार आहे. राज्यपालांचे निवासस्थान असलेली राजभवनातील सूर्योदय गॅलरी तसेच येथील देवी मंदिर ही दोन स्थळे येत्या १ सप्टेंबरपासून जनतेसाठी खुली करण्यात येणार असल्याचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी जाहीर केले आहे.



राजभवनासाठी तयार केलेल्या rajbhavanmaharashtra.gov.in या ऑनलाइन नोंदणी प्रणालीचे औपचारिक उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते नुकतेच राजभवनात झाले. याप्रसंगी त्यांनी ही घोषणा केली. सुरक्षेबाबात खबरदारी म्हणून राजभवन येथे भेट देण्यासाठी नोंदणी प्रणालीवर प्रवेशपूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. मंगळवार ते रविवार या दिवशी सकाळी सव्वासहा ते आठ या वेळेत प्रवेश देण्यात येणार आहे. मात्र एका दिवशी केवळ दहा जणांनाच प्रवेश दिला जाईल. त्यासाठी २५ रु. नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे. नोंदणी केलेल्यांना ईमेल व एसएमएसद्वारे तारीख व वेळ कळवण्यात येईल.

## तरुणांच्या बुद्धिमत्तेची शासनयंत्रणेशी सांगड

नव्या विचारांची शासकीय यंत्रणेशी सांगड घालण्यासाठी मुख्यमंत्री इंटर्नशिप उपक्रम सुरू करण्यात आला असून तरुणाईच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब शासनाच्या ध्येय-धोरणात पुरेपूर उमटण्यासाठी या उपक्रमाचा निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या उपक्रमास मंत्रालयात प्रारंभ झाला. यावेळी महसूल राज्यमंत्री संजय राठोड, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय आणि विविध विभागांचे सचिव उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत निवडलेल्या ४० प्रशिक्षणार्थ्यांसोबत मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. तसेच क्षेत्रीय कामासाठी निवड केलेले प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्याशी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.



मुख्यमंत्री इंटर्नशिप उपक्रम

प्रत्येक पिढीची मूल्ये, विचार आणि आशाआकांक्षा वेगवेगळ्या असतात. शासनामध्ये काम करीत असताना अनेक अडचणी येतात. त्या सोडवण्यासाठी नवा विचार आणि शासकीय यंत्रणांची सांगड घालण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, उमेदवारांना अनुभव मिळण्यासोबतच शासनालाही त्यांच्यातील नव्या दृष्टिकोनाचा लाभ मिळेल. त्यामुळे हा उपक्रम गांभीर्याने राबवणे गरजेचे आहे. निवडण्यात आलेल्या उमेदवारांना निश्चित काम नेमून देऊन त्यांना अडचणी आल्यास त्या तत्परतेने सोडवाव्यात व त्यांच्या कामाचा अहवाल मुख्यमंत्री कार्यालयास पाठविण्याच्या सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

यावर्षी या उपक्रमासाठी ४० उमेदवार निवडण्यात आले आहेत. या उपक्रमाचे यश बघून प्रत्येक वर्षी त्यात वाढ करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. निवड झालेल्या उमेदवारांना राज्यातील विविध योजनांसाठी काम करण्याची संधी मिळाली असली, तरी शासनाचे नियम व आचारसंहिता याचे त्यांनी काटेकोरपणे पालन करावे, असे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी सांगितले.

गुणात्मक मानव संसाधनाचा उपयोग राज्याच्या विकासासाठी करता यावा यासाठी हा उपक्रम मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग आहे. ४० उमेदवारांपैकी मुख्यमंत्री सचिवालयात १४ उमेदवार काम पाहतील. यापैकी ९ प्रशिक्षणार्थी मुख्यमंत्र्यांच्या 'वॉर रूम'मध्ये मुंबई व महाराष्ट्रासाठीच्या महत्त्वपूर्ण योजनांचा दर आठवड्याला आढावा घेतील. तर ५ उमेदवार विविध योजनांचा लाभ जनसामान्यांना होईल या दृष्टीने सोशल मीडियाचा प्रभावी वापर करतील. तसेच विविध जिल्हाधिकारी कार्यालये १२, सिडको ४, एमआयडीसी ३, एमटीडीसी आणि महावितरण प्रत्येकी २ तर जलयुक्त शिवार, स्वच्छ महाराष्ट्र आणि पुणे महानगरपालिका येथे प्रत्येकी १ उमेदवार काम करणार आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, यवतमाळ, सातारा, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, वर्धा, नंदूरबार, पालघर या जिल्ह्यांमध्ये हे उमेदवार कार्य करणार आहेत. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आणि संबंधित क्षेत्रातील एक वर्षाच्या कामाचा अनुभव असलेले २५ वर्षांखालील वयोगटातील पदवीधर या उपक्रमासाठी पात्र ठरले आहेत.

# तारांकित

## एटीएसमध्ये पहिली महिला

कधी काळी केवळ पुरुषांचेच वर्चस्व असलेल्या अनेक क्षेत्रात आता महिला केवळ दिसत नसून त्या क्षेत्रावर आपला ठसाही उमटवत आहेत. एकेकाळी पुरुषांचे वर्चस्व असलेल्या पोलीस दलात मीरा बोरवणकर, डॉ. रश्मी करंदीकर, अर्चना त्यागी, शालिनी शर्मा, स्वाती साठे अशा अनेक महिलांनी आपला ठसा उमटविला



आहे. या साखळीची आणखी एक कडी जोडण्यासाठी सातारा जिल्ह्यातील किरोली या छोट्या गावातून आलेल्या पोलीस अधिकारी गीता चव्हाण सरसावल्या आहेत. त्यांची दहशतवादीविरोधी पोलीस पथकात (एटीएस) पोलीस उपायुक्त म्हणून नेमणूक झाली आहे.

२००४ मध्ये एटीएसची स्थापना झाली, त्यानंतर पहिल्यांदाच महिला अधिकाऱ्यास ही संधी मिळाली आहे. सातारा जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या त्या कन्या आहेत. वडिलांबरोबर नेहमी त्या शेतात जात असत. आई-वडलांनी त्यांच्या शिक्षणाला उत्तेजनच दिले. पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या. २००७ मध्ये बीड जिल्ह्यात उपअधीक्षक झाल्या. नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीत त्यांनी काम केले. त्यानंतर त्यांना पोलीस अधीक्षकपदी बढती मिळाली, त्यावेळी त्यांची नेमणूक अमरावतीला राज्य गुन्हे अन्वेषण विभागात होती. आता त्या एटीएसमध्ये काम करणार आहेत.

# पहिले शाही स्नान

**देशासह विदेशातील माध्यमांचे लक्ष लागून असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यातील पहिल्या पर्वणीतील शाही स्नान भक्तिपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात २९ ऑगस्टला संपन्न झाले. नाशिक येथील रामकुंड आणि त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त येथे पहाटे ४ वाजल्यापासून शाही स्नानाला सुरुवात झाली. या पर्वणीत देशभरातून आलेल्या विविध मानाच्या आखाड्यांचे प्रमुख, साधू, संत, महंत व असंख्य भाविकांनी स्नान केले.**










त्र्यंबकेश्वर येथे पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास शाही स्नानास प्रारंभ झाला. मानानुसार विविध आखाड्यांनी त्यांचे प्रमुख, साधू, संत, महंत यांच्यासह उपस्थिती लावून कुशावर्तातील कुंडात शाही स्नान केले. श्री. शंभू पंचदशनाम जुना आखाडा (निलपर्वत) यांची मिरवणूक गुरुगद्दी रमता पंच छावणी येथून निघाली. त्यापाठोपाठ श्री. पंचदशनाम आवाहन आखाड्याचे आणि त्यानंतर पंच अग्नी आखाड्याच्या साधू, महंतांची मिरवणूक निघाली. आजच्या सिंहस्थ पर्वातील ही पहिली शाही मिरवणूक होती. पिंपळंद शिवारातून या मिरवणुकांना प्रारंभ झाला. दुसऱ्या शाही मिरवणुकीत श्री. तपोनिधी निरंजनी आखाडा, श्री. तपोनिधी पंचायती आनंद आखाडा या दोन आखाड्यांच्या साधुमहंतांनी सहभाग घेतला. तिसऱ्या शाही मिरवणुकीत श्री. पंचायती महानिर्वाणी आखाडा, श्री. शंभू पंचायती अटल आखाडा या आखाड्याच्या साधुमहंतांनी सहभाग घेतला. त्यात प्रथम श्री. पंचादश जुना आखाडा, आवाहन आखाडा, श्री. पंचायती अग्नी आखाडा, श्री. पंचायती निरंजनी आखाडा, श्री. पंचायती आनंद आखाडा, श्री. पंचायती महानिर्वाण आखाडा, श्री. पंचायती अटल आखाडा यांनी या वेळी शाही स्नानाची पर्वणी साधली. त्यानंतर श्री. पंचायती बडा उदासीन आखाडा, श्री. पंचायती नवा उदासीन आखाडा आणि श्री. निर्मल पंचायती आखाड्याच्या साधूंनी मिरवणूक काढली. श्री. पंचायती बडा उदासीन आखाडा, श्री. पंचायती नवा उदासीन आखाडा, श्री. पंचायती निर्मल आखाडा यांनी शाही स्नान केले. महंत श्री ग्यानदासजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत अखिल भारतीय श्री पंच निर्वाणी अनी आखाड्यापासून या मिरवणुकीस सुरुवात झाली. रामकुंड येथे पालकमंत्री गिरीश महाजन आणि सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी साधुमहंतांचे स्वागत केले.

पहाटे तीनपासूनच भाविक साधुग्राममधून गोदावरीकडे जात होते. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अखिल भारतीय श्री पंच निर्वाणी अनी आखाड्याच्या साधुमहंतांची मिरवणूक सुरू झाली. निर्वाणी आखाड्यानंतर अखिल भारतीय श्री पंच दिगंबर आखाड्याची मिरवणूक शाही स्नानासाठी मार्गस्थ झाली. शेवटी निर्मोही आखाड्याच्या साधुमहंतांची मिरवणूक निघाली. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या शाही स्नानासाठी साधुग्राममधून निघालेल्या मिरवणुकीच्या शेवटी महाराष्ट्रातील जगद्गुरू संत तुकाराम महाराज व संत एकनाथ महाराज यांच्या दिंड्या सहभागी झाल्या होता.



# रस्ते विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया गतिमान

**राज्यातील पनवेल-इंदापूर आणि इंदापूर-झारप द्रुतगती महामार्गाबाबत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली विशेष बैठक, नक्षलग्रस्त भागाच्या औद्योगिक विकासाच्या अनुषंगाने सुरक्षा व्यवस्थेविषयी गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांनी 'नागपूर-मुंबई प्रस्तावित ६ पदरी एक्सप्रेस वे'चे केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या समोर केलेले सादरीकरण आणि राज्यमंत्री राजे अंबरिशराव आत्राम यांनी गडचिरोली जिल्ह्यातील प्रलंबित प्रकल्पांबाबत विविध मंत्रालयात केलेला पाठपुरावा या बाबी राज्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या.**

राज्यातील रस्ते विकासासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या अनुषंगाने परिवहन भवन येथे पनवेल-इंदापूर आणि इंदापूर-झारप द्रुतगती महामार्गाबाबत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाणाऱ्या इंदापूर-पनवेल द्रुतगती महामार्गाच्या सद्य:स्थितीची माहिती दिली.

कोकणात गणपती उत्सव काळात इंदापूर-पनवेल द्रुतगती महामार्गाच्या दुरुस्तीचे आणि रुंदीकरणाचे काम तातडीने पूर्ण करणे, रस्त्याच्या कडेला येणारे पाईपलाइनचे अडथळे याबाबत बैठकीत चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी इंदापूर-झारप या द्रुतगती मार्गासाठी केंद्राकडून आवश्यक मदतीची मागणी केली. राज्यात भूसंपादन प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. इंदापूर-पनवेल व इंदापूर-झारप द्रुतगती महामार्गासह भूसंपादनामुळे रखडलेल्या राज्यातील रस्ते विकासासाठी, भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव एस.एम. सबनीस, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे सहसचिव रोहित कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नक्षलग्रस्त भागाच्या विकासाला प्राधान्य

राज्यातील नक्षलग्रस्त भागाच्या औद्योगिक विकासासाठी, केंद्र शासनाने अधिक सुरक्षा पुरवावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त भागातील विकास व सुरक्षाविषयक बाबींवर गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली गृहमंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत केली. राजनाथ सिंह यांनी नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या कृतिआराखड्याचे कौतुक केले. या भागात दळणवळण सुविधा, उद्योग उभारणी, कौशल्य विकास, शिक्षण, लागणारी सर्व सुरक्षा व सहकार्य केंद्र शासन करेल असे त्यांनी या बैठकीत स्पष्ट केले. यावेळी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रसायन व खते राज्यमंत्री हंसराज अहीर, आदिवासी विकास राज्यमंत्री राजे अंबरिशराव आत्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, नक्षलग्रस्त भागात उद्योग व रोजगार निर्मितीसाठी राज्य शासन अधिक प्रयत्न करीत आहे. गडचिरोली हा खनिज संपत्तीने समृद्ध असलेला जिल्हा आहे. केवळ खनिज उत्पादन न करता त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग या भागात यावेत, यासाठी राज्यशासनाने कृतिआराखडा तयार केला आहे. तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी कौशल्य विकासाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्य शासन या भागातील लोकांना

**दयानंद कांबळे**

विकासाच्या मूळ प्रवाहात घेऊन येण्यासाठी प्रयत्न करीत असून शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आदी सर्वच स्तरांवर व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत.

राज्य शासन राबवत असलेल्या या उपक्रमास सुरक्षेच्या दृष्टीने कुठलीही अडचण येऊ नये यासाठी केंद्र शासनाने अधिक सुरक्षा पुरवावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत केली.

### आदिवासी विकास योजनांना केंद्राची मदत

राज्यातील आदिवासींच्या विविध प्रश्नांसंदर्भात आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांची शास्त्री भवन येथे भेट घेतली.

श्री.सवरा यांनी राज्यातील आदिवासीबहुल जिल्ह्यांमधे सुरू करण्यात आलेल्या 'एकलव्य आदर्श निवासी शाळांबाबत' केंद्रीय मंत्र्यांना माहिती देताना सांगितले की, केंद्राच्या मदतीने राज्यात १४ एकलव्य आदर्श निवासी शाळा मंजूर झाल्या आहेत, त्यापैकी ११ सुरू झाल्या आहेत. या शाळांना मिळणारा प्रतिसाद बघता राज्यात आणखी सहा एकलव्य आदर्श निवासी शाळांची गरज आहे. यासाठी ९६ कोटी रुपये अतिरिक्त निधीची आवश्यकता असून हा निधी लवकरात लवकर मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

### गडचिरोली जिल्ह्यातील प्रलंबित प्रकल्प

गडचिरोली जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, वडसा–देसाईगंज रेल्वे मार्ग व साकोली–मनचेरीयाल राष्ट्रीय महामार्ग आदी विकास कामांबाबत गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे आदिवासी विकास राज्यमंत्री राजे अंबरिशराव आत्राम यांनी विविध केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेऊन प्रलंबित विकास कामांबाबत सविस्तर चर्चा केली. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची परिवहन भवन येथे श्री. आत्राम यांनी भेट घेतली.

जिल्ह्यातील रस्ते विकासासंदर्भात त्यांनी यावेळी चर्चा केली. तसेच त्यांनी जिल्ह्यातील साकोली–मनचेरीयाल या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती मिळावी, अशी विनंतीही केली. या महामार्गाचे काम लवकर झाल्यास दळणवळण व्यवस्था मजबूत होईल. स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल, असे श्री. आत्राम यांनी सांगितले. देशातील दुर्गम भागातील महामार्गाकडे प्राधान्याने लक्ष दिले जात असल्याचे सांगत श्री. गडकरी यांनी गडचिरोली भागातील राष्ट्रीय महामार्गाचे काम लवकर पूर्ण करू असे आश्वासन दिले.

संपर्क : ०९८२२१०९३६२

## 'नागपूर-मुंबई सहापदरी एक्सप्रेस वे'






नागपूर–मुंबई शहरांदरम्यान प्रस्तावित सहापदरी एक्स्प्रेस वे प्रकल्पास केंद्र शासनाकडून सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाला दिले.

परिवहन भवन येथे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने नितीन गडकरी यांची भेट घेऊन 'नागपूर–मुंबई सहापदरी एक्स्प्रेस वे' प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले. या सादरीकरणात एक्सप्रेस वे च्या एकूण ८१९ कि.मी. लांब रस्त्याचा मार्ग कसा असेल, राज्याच्या कोणत्या भागातून हा रस्ता जाईल. हा रस्ता झाल्यावर नागपूर–मुंबई हे अंतर एकूण १० तासात कसे पूर्ण होऊ शकेल. या बाबींचा यात समावेश होता. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभागातून हा एक्सप्रेस वे जाणार असून राज्याच्या विकासात या रस्त्याचे मोलाचे योगदान राहणार असल्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.



# गाव बाप्पांचे

**मला आठवतो मागच्या वर्षीचा अनंतचतुर्दशीचा दिवस! शेजारची ५-६ वर्षाची लहानगी रुद्रा अनंतचतुर्दशीला बाप्पा आता आपल्या गावी जाणार म्हणून दरवर्षी रडून रडून गोंधळ घालते. पण या वर्षी ती अगदी खूश होती. तिला म्हटलं, 'रुद्रा बाप्पा तर आज त्यांच्या गावाला जाणार ! तशी ती म्हणाली, 'जाऊ दे ना काकू, आता मला माहितीय बाप्पा कोणत्या गावाला जातात ते. मी पप्पांबरोबर बघितले नां गणपतीचं गाव. सगळ्यांकडचे गणपती पुन्हा तिथेच जातात. मी जाईन न पेणला बाप्पाला भेटायला,' तसा माझ्या डोक्यात प्रकाश पडला. बाईसाहेब पेणला गणपतीचं गाव समजत होत्या. आणि आता बाप्पाच्या गावाचा पत्ता मिळाल्याने खूश होत्या. तिचा हा तर्क मात्र मला विचार करायला लावून गेला.**

**कीर्ती पांडे**

खरंच पेण हे गणपतीचं गाव आहे. मुंबईपासून अवघ्या ८० कि.मी.वर असणारं हे अगदी छोटं गाव. रायगड जिल्ह्यातलं मुंबई–गोवा हायवेवर लागणारं. वरकरणी बघायला गेलं तर भारतातलं कोणतंही गाव दिसतं तसंच हे पेण. छोट्या घरांचं, भातशेतीचं आणि खडबडीत रस्त्यांचं, दूरवरपर्यंत मोठ्या इमारती दिसतच नाहीत. तरीही पेणला आज स्वत:ची ओळख आहे. ते म्हणजे गणपतीचे गाव म्हणून.

२५००० लोकवस्ती असलेले हे गाव दरवर्षी २.५० ते ३ लाख गणपतीच्या मूर्ती बनवते. यावर विश्वास बसणे जरा कठीण आहे. आम्ही पेणला भेट दिली ते एप्रिल–मे महिन्याचे उन्हाळ्याचे दिवस होते. शाळांना सुट्या लागल्या की, या काळात एकूणच सगळीकडे सुस्तावलेपण आलेले असते पण पेणमध्ये मात्र याउलट चित्र दिसत होते. सगळीकडे कामाची लगबग उडाली होती. घराच्या अंगणातून, पडवीतून, खिडक्यांतून, शेता–शिवरातून सगळीकडून गणपती बाप्पा डोकावत होते.



वेगवेगळ्या वेशभूषेतले, कुठे उंदरावर, मोरावर, हत्तीवर विराजमान झालेले बाप्पा सर्वत्र दिसत होते. शाळेतल्या गणवेशातले, सायकल चालवणारे, क्रिकेट खेळणारे असे आधुनिक अवतारातले बाप्पा बघताना गंमत वाटत होती. पेणमध्ये पुर्वी शाडूच्या मातीपासून गणपती बनवणारी काही परंपरागत कुटुंबं होती आणि मूर्तीही अगदी साधी ठरावीक पद्धतीची असायची. काळानुरूप आणि ग्राहकांची आवडनिवड लक्षात घेऊन आता या मूर्तींमध्ये बरीच विविधता आली आहे. महाराष्ट्रात, अनेक ठिकाणी गणपतीच्या मूर्ती घडवल्या जात असल्या तरी पारंपरिकपणे पेण येथून गणेशमूर्तींची खरेदी करणारी कित्येक कुटुंबे मुंबई-ठाण्यामध्ये आहेत. याशिवाय महाराष्ट्रातील इतर गावांमध्येही पेणहून दरवर्षी मूर्ती पाठवल्या जातात.

## वर्षभर मूर्ती घडतात

गणेशमूर्ती घडविण्याचे काम अव्याहतपणे वर्षभर चालू असते. गणपतीचे १० दिवस आणि पुढे येणारा पितृपक्ष या काळातच काय ती या कारागिरांना विश्रांती असते. पेण आणि पेण तालुक्यातील हमरापूर, कळवा, वाशी, जोहे, दिव, भाल, शिर्की, गडब, वडखळ, बोरी, काप्रोळी, उंबर्डे या गावांमध्ये साधारणपणे ३५० मूर्तिशाळा आहेत. दिवसेंदिवस मूर्तिकलेचा हा व्यवसाय वाढत चालला आहे. या वर्षी पेण आणि आजूबाजूच्या गावांतील मूर्तिशाळांनी मिळून अंदाजे ३० लाख गणेशमूर्ती घडवल्या आहेत. यावर्षी ह्या व्यवसायाची उलाढाल १०० कोटींची होईल, असा अंदाज या व्यवसायातल्या जाणकार मंडळींचा आहे.

गणेशचतुर्थी ते नवरात्र या काळात पेण हे गाव काहीसे सुस्तावलेले दिसते. दसरा आटोपला की, पेणच्या मूर्तिशाळांना जाग येते आणि पुढील वर्षीच्या गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या मूर्ती घडवण्यात कारागीर स्वत:ला झोकून देतात. कसबी कारागिरी आणि अतिशय नैसर्गिक वाटावे असे केलेले रंगकाम हे पेणच्या मूर्तींचे वैशिष्ट्य आहे. या मूर्तींचे डोळे अगदी जिवंत वाटावे असे असतात आणि फक्त डोळे रंगवण्यासाठी वेगळे कारागिर या परिसरात आहेत. या कारागिरांना फक्त डोळे रंगवण्यासाठी मूर्तीमागे १० रुपये दिले जातात.

पेणच्या गणेशमूर्ती आधी फक्त शाडूच्या मातीपासून बनवल्या जात पण आता काही कारागीर प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये त्या बनवतात. त्या हाताळायला सोप्या व वजनाला हलक्या असतात. त्यामुळे आता पेणच्या कारागिरांनीही पीओपीला पसंती दिली आहे. असे असले तरी पेणमधल्या मूर्तींचे साचे, त्यांची ठेवण, आकार यातील सूत्रबद्धता आसन, महिरप, अलंकार यांमध्ये असणारी सुबकता, हातातील आयुधे आणि डोळे यांचा जिवंतपणा यामुळे या मूर्तींचे वेगळेपण आजही टिकून आहे. पेणच्या ह्या मूर्तिव्यवसायाने ३० हजार लोकांना वर्षभर रोजगार मिळवून दिला आहे. हा व्यवसाय आता सातासमुद्रापार पोहचला आहे. या वर्षी मॉरिशस, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, अमेरिका या देशांमध्ये २० हजारांहून अधिक बाप्पाच्या मूर्ती तिथल्या गणेशोत्सवासाठी पोहचल्या आहेत. २५० हून अधिक प्रकारच्या गणेशमूर्ती इथे घडवल्या जातात.

## दरवर्षी नवे साचे

दरवर्षी प्रत्येक कारखान्यात १५ ते २० नवे साचे तयार केले जातात. आधी मूर्ती तयार करून त्या मूर्तीवरून साचा बनवणे याला खरे कसब लागते. अशा प्रकारे साचे बनवून देण्यासाठी सर्वाधिक किंमत मोजली जाते. यानंतर साच्यातून मूर्ती तयार करणे, त्यांना पांढरा कोट चढवणे, रंग देणे, हे काम इतर कारागीर आणि घरातील मंडळी यांच्या साहाय्याने केले जाते. रंगकामाच्या या व्यवसायात आज महिलावर्गही बऱ्यापैकी सज्ज आहे. पेणहून कच्च्या मूर्ती नेऊन त्यांना रंग देण्याचे काम करणाऱ्या रंगशाळा मुंबई आणि परिसरात मोठ्या प्रमाणात बघायला मिळतात. सर्वत्र बाप्पा विराजमान असणाऱ्या या बाप्पाच्या गावाचे काही प्रश्नही आहेतच. मूर्तिकलेचा हा व्यवसाय वाढला असला तरी त्याला आज म्हणावी तशी प्रतिष्ठा मिळालेली नाही. त्यामुळे तरुण रोजगाराची संधी म्हणून त्याकडे बघत नाही. त्यामुळे व्यवसाय वाढला तरी तो कुटीरोद्योगच राहिला आहे. पेण येथील उद्योग महामंडळाने याला इंडस्ट्रीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला पण सरकारी नियमांमध्ये गणेश कार्यशाळांना बसवणे कठीण होते. पण उद्योग झाला नसला तरी पेणच्या आजूबाजूच्या गावात मूर्तिकलेचा प्रसार वेगाने होतोय. दिवसातून तीनदा होणारे लोडशेडिंग, जागेची कमतरता, उत्तम कारागिरांची कमतरता, एजंटांकडून होणारी फसवणूक या साऱ्यांवर मात करत पेण येथील कलाकार दरवर्षी घरोघरी बाप्पा पाठवतात.

संपर्क : ०९५९४९४४८००

### मूर्तिशाळा



**पेण आणि आजूबाजूच्या गावात साडेसहाशे मूर्तिशाळा आहेत. पेण शहरातच तर बऱ्याच मूर्तिशाळा आहेत. त्यात फणसडोंगरी, गुरवआळी, कोंबडपाडा, कासारवाडी, कुंभारआळी, तसरे आळी ही काही गणेशमूर्तींसाठी प्रसिद्ध ठिकाणे आहेत. पेण नगरपालिकेने २००९ मध्ये गणेश संग्रहालय निर्माण केले आहे. या संग्रहालयात शाडू, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनवण्याचे साचे, गणपतीच्या विविध आकाराच्या मूर्ती, पेणमधील मान्यवर मूर्तिकारांची माहिती, छायाचित्रे, सुबकपणे मांडून ठेवण्यात आली आहेत.**



राजगड

# दुर्ग बारा मावळातले...

**मुळा, वेळवंडी, पवना, कानद, मुठा अशा बारा वेगवेगळया नद्यांचा उगम या मावळात होतो आणि त्या पूर्वेकडे वाहत कृष्णा, इंद्रायणी, यासारख्या मोठ्या नद्यांना जाऊन मिळतात. या बारा नद्यांच्या परिसराला 'बारा मावळ' हा शब्द प्रचलित आहे. या नद्यांबद्दल आणि त्यांच्या खोऱ्यांबद्दल मी एवढी माहिती का देत आहे असा प्रश्न वाचकांना पडू शकतो. याचे मुख्य कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीची सुरुवात या बारा मावळातूनच केली.**

**डॉ. सचिन जोशी**

सह्याद्रीच्या घाटमाथ्याच्या मुख्य रांगेपासून पूर्वेकडे डोंगराच्या काही छोट्या उपरांगा पसरलेल्या आहेत. या रांगा सातमाळ, बालाघाट यांसारख्या जरी मोठ्या आणि लांबच लांब पसरलेल्या नसल्या तरी मुख्य रांगेपासून पूर्वेला त्या किमान २०-३० कि.मी. पसरलेल्या आहेत. या डोंगररांगा एकमेकांच्या खूप जवळ असल्यामुळे दोन रांगांमध्ये दरी तयार झाली आहे. या दरीमध्ये अनेक छोट्या-मोठ्या नद्या उगम पावतात. नदी सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून सुरू होऊन पूर्वेकडे वाहत जाते. तो प्रवाह ज्या डोंगरदऱ्यांमधून जातो त्या भागाला त्या नदीचे खोरे म्हणतात. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत अशा अनेक नद्यांची खोरी पाहायला मिळतात. विशेषतः पुणे परिसरातील या खोऱ्यांना इतिहास काळापासून 'मावळ' ही संज्ञा वापरली जात आहे. मुळा, वेळवंडी, पवना, कानद, मुठा अशा बारा वेगवेगळ्या नद्यांचा उगम या मावळात होतो आणि त्या पूर्वेकडे वाहत कृष्णा, इंद्रायणी, यांसारख्या मोठ्या नद्यांना जाऊन मिळतात. या बारा नद्यांच्या परिसराला 'बारा मावळ' हा शब्द प्रचलित आहे. या नद्यांबद्दल आणि त्यांच्या खोऱ्यांबद्दल मी एवढी माहिती का देत आहे असा प्रश्न वाचकांना पडू शकतो. याचे मुख्य कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीची सुरुवात या बारा मावळातूनच केली. या डोंगराळ भागात शिवपूर्वकाळापासून काही किल्ले वसलेले होते. विजापूरच्या आदिलशाहीच्या आणि अहमदनगरच्या निजामशाहीने या बारा मावळात किल्ले बांधलेले होते. कोरीगड, लोहगड, सिंहगड, राजगड यासारखे किल्ले मावळात शिवपूर्वकाळापासून दिसून येतात. यातील जवळजवळ सर्वच किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले आणि त्यांची दुरुस्ती केली. घनगड, राजगड, तोरणासारख्या किल्ल्यांची मजबुती करून घेतली.


### पवना नदीचे खोरे

पवना नदीच्या खोऱ्यात तुंग, तिकोना आणि इंद्रायणी नदीच्या खोऱ्यात लोहगड, विसापूर अशी चार किल्ल्यांची बुलंद चौकडी अनेक वर्षे ऊन, वारा, पाऊस यांसारख्या नैसर्गिक आपत्तींशी झुंज देत आपले अस्तित्व टिकवून आहे. पवना नदीच्या खोऱ्याला 'पवन मावळ' हा शब्द शिवकाळापासून प्रचलित आहे. तसेच इंद्रायणी नदीच्या खोऱ्याला 'नाणे मावळ' असे संबोधले जात असे. लोहगड आणि विसापूर हे दोन किल्ले एकमेकांच्या शेजारी आहेत. या दोन किल्ल्यांमधील खिंडीला 'गायखिंड' असे नाव आहे. गायखिंडीच्या दक्षिणेला पवन मावळ आणि उत्तरेला नाणे मावळ आहे. लोहगडवाडी हे लोहगड किल्ल्याच्या पायथ्याचे गाव असून भाजे गाव हा विसापूरचा पायथा आहे. लोहगड-विसापूर हा परिसर सातवाहन काळापासूनच गजबजलेला होता. नाणे आणि पवन मावळात एवढी जुनी वसाहत असण्यामागचे कारण म्हणजे तेथील इंद्रायणी व



कल्याण दरवाजा, सिंहगड






पवना या नद्या. अंदाजे २००० वर्षांपूर्वीदेखील या भागात मानवाची वसाहत होती हे तेथील बौद्ध लेण्यावरून सांगता येते. सातवाहन काळात व्यापारी व धार्मिक दृष्टिकोनातून हा पूर्ण परिसर खूप महत्त्वाचा होता. विसापूर किल्ला ज्या डोंगरावर आहे त्याच्या पोटात इ.स.पू. तिसऱ्या शतकातील लेणीसमूह आहे. या समुहाला भाजे लेणी असे नाव असून प्रसिद्ध कार्ले-भाजे लेण्यांमधील ही भाजे लेणी होय. भाजे लेणी समुहाचे खोदकाम झाले त्याच काळात लोहगड किल्ल्याच्या पोटातदेखील सहा लेण्यांचा छोटा समूह खोदला गेला. त्याचे अवशेष लोहगडवाडी ते किल्ल्याचा माथा यादरम्यान दिसू शकतात. यानंतर अंदाजे १५०० वर्षांनंतर लोहगड आणि विसापूर हे बुलंद दुर्ग मध्ययुगीन काळात बांधले गेले. तीच गोष्ट पवन मावळातील तुंग आणि तिकोना किल्ल्यांची. लोहगडच्या पोटात जशा लेण्या खोदल्या आहेत तशाच काही लेण्या तिकोना किल्ल्याच्या डोंगरात आहेत. त्याचाही कालखंड सातवाहन काळापर्यंत मागे जातो. पण याचा अर्थ असा नाही की, तिकोना डोंगरावर सातवाहन काळात किल्ला होता. किल्ला नंतर १२-१३ व्या शतकात यादवांनी बांधल्याचे पुरावे बांधकामात दिसतात. तुंग किल्ल्याच्या पोटातदेखील लेण्या खोदल्या आहेत. या वेगवेगळ्या काळातील बांधकामावरून हे स्पष्ट होते की नाणे मावळ आणि पवन मावळ या परिसराला गेली २००० वर्ष धार्मिक, व्यापारी आणि लष्करी महत्त्व प्राप्त होते. या दोनही मावळातून कोकणात उतरणारे घाटमार्ग होते. बोरघाट आणि आंबिवलीची नाळ या दोन्ही मार्गांनी कोकणातील रायगड जिल्ह्यात आजही उतरता येते. मध्ययुगीन काळात या चारही किल्ल्यांना खूप मोठे महत्त्व प्राप्त झाले होते याचे मुख्य कारण म्हणजे या किल्ल्यांचे घाटमार्गावर असलेले भौगोलिक स्थान. या दुर्ग चौकडीतील नाणे मावळात वसलेला ऐतिहासिकदृष्ट्या सर्वात महत्त्वाचा किल्ला म्हणजे लोहगड. हा किल्ला कधी आणि कोणी बांधला याबद्दल काही माहिती ऐतिहासिक कागदपत्रात अजून तरी मिळालेली नाही.

अहमदनगरच्या निजामशहाकडे १५ व्या शतकाच्या सुरुवातीला हा किल्ला असल्याची नोंद आहे. त्यानंतर शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या काळात इ.स. १६५७-५८ या साली मोठी मोहीम काढून अनेक किल्ले जिंकून घेतले त्यामध्ये लोहगड, विसापूर, तुंग आणि तिकोना हे चारही किल्ले घेतले. पण त्यानंतर काही वर्षांनी मोगलांशी झालेल्या पुरंदर येथील तहात जे २३ किल्ले महाराजांना द्यावे लागले त्यात हे चारही किल्ले होते. हे सर्व किल्ले महाराजांनी इ.स. १६७० च्या आसपास मोगलांकडून परत जिंकून घेतले. लोहगड किल्ला शिड्या लावून जिंकून घेतला तर इतर तीन किल्ले अगदी सहज जिंकले. महाराजांच्या मृत्यूनंतर १७०१ सालापर्यंत तुंग, तिकोना हे किल्ले मराठ्यांकडेच होते.

लोहगड हा किल्ला लष्करी बांधकामाच्या दृष्टीने अत्यंत वेगळा आहे. या किल्ल्यावरील वास्तूंचे बांधकाम वेगवेगळ्या काळात झालेले आहे. किल्ल्यावर देखील दोन वेगवेगळ्या ठिकाणी वसाहत असल्याचे पुरावे आजही दिसतात. लोहगडावरील द्वादशकोनी तलावाच्या उत्तरेला शिवपूर्वकालात वसाहत होती तर तलावाच्या दक्षिणेला शिवकालीन तसेच पेशवेकालीन घरांची आणि सदरेची जोती आजही दिसतात. वसाहतीजवळील लेण्यांचा उपयोग धान्यकोठार किंवा काही वस्तू ठेवण्यासाठी केला गेला असावा. लोहगडावर खडकात खोदलेली पाण्याची जवळजवळ वीस टाकी आहेत. याव्यतिरिक्त दोन छोटे व एक मोठा तलावदेखील आहे. सर्वात मोठ्या तलावातील पाणी काढण्यासाठी मोट लावलेली होती त्याचे अवशेष तलावाजवळ आहेत. किल्ल्याच्या दरवाज्याचे बांधकाम हे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. गणेश आणि नारायण दरवाजा पेशव्यांच्या काळात बांधला गेला होता आणि त्याविषयीचा शिलालेख गणेश दरवाज्याच्या आत ठेवलेला आहे.

विसापूर किल्ल्याचा विस्तार प्रचंड मोठा असूनही त्याला इतिहासात कायम दुय्यम दर्जा मिळाला. किल्ल्यावर चार शिवकालीन वास्तू आजही उभ्या आहेत. या वास्तूंना कोठार म्हणावे लागेल कारण अशाच प्रकारची कोठारे रायगड, सुधागड या किल्ल्यांवर आहेत. विसापूरवरील सर्वात आकर्षक बांधकाम म्हणजे तेथील भक्कम तटबंदी. या तटबंदीत ठिकठिकाणी बुरूज बांधलेले असून काही ठिकाणी दोन थरांचा बुरूज आहे. या सर्व बांधकामासाठी गरजेची असलेली गोष्ट म्हणजे चुना. दोन दगडांमध्ये वापरला जाणारा चुना हा गडावरच तयार केला जात असे. त्यासाठी चुन्याचा घाणा हा गडावरच असे. विसापूर किल्ल्यावर असे सहा चुन्याचे घाणे पाहायला मिळतात त्यावरून हा अंदाज लावता येतो की गडावर किती बांधकाम झाले असेल. खडकात पाण्याची जवळजवळ २० टाकी खोदून मुबलक पाण्याची व्यवस्था विसापूरवर केलेली दिसते.

तिकोना हा देखील शिवपूर्वकाळात बांधलेला किल्ला असून गडाच्या दरवाज्यांच्या बांधकामावरून तो यादव काळातील असावा असे वाटते. दोन वाटांनी गडावर प्रवेश करता येऊ शकतो. गडाचे जुने नाव तिकोना असून शिवाजी महाराजांनी ते बदलून वितंडगड असे ठेवले. पेशवेकाळात गडाच्या माथ्यावर असलेल्या वितंडेश्वराच्या मंदिराची दुरुस्ती झाल्याचे उल्लेख मिळतात. गडाला आजही भक्कम तटबंदी आणि दरवाजे आहेत. तुंग हा पवन मावळातील अजुन एक गिरिदुर्ग असून याचे वैशिष्ट्य म्हणजे इथे सपाटीची जास्त जागा नसून वेगवेगळ्या उंचीवर गडाचे अवशेष दिसून येतात.

संपर्क : ०९८२२१०९३६२

लोहगड, विसापूर



राजगड, पुणे





# कर्णबधिरता

**इतकी सुंदर सृष्टी पण सगळे कसे शांत बघता येते पण ऐकू येत नाही , दुसऱ्यांशी संवाद साधता येत नाही. कर्णबधिरता किंवा बहिरेपणा दिसून येत नाही. त्यामुळे लोकांची मदत किंवा सहानुभूतीसुद्धा मिळत नाही. जन्मजात दोष व आनुवंशिक आजार सोडले आणि कानांची काळजी घेतली की कान निरोगी ठेवणे बरेचसे आपल्याच हातात असते. ऐकू येणे कमी झाले की, प्रत्येकच वेळेस औषध व शस्त्रक्रिया करून ऐकू येणे सुधारता येईलच याची खात्री देता येत नाही. म्हणूनच बहिरेपणा येऊच नये त्यासाठी अगोदरच काळजी घेणे हेच उत्तम.**

**आजकाल हेडफोन्स, गाड्यांचे कर्कश हॉर्न, रॉक म्युझिक, डिजे मोठमोठ्या फटाक्यांच्या लडी (माळ), लाऊडस्पीकरचा वापर खूप वाढत आहे. या सर्वांमुळे असकर्ण व कानाची शीर खराब होऊन येणाऱ्या बहिरेपणाचे प्रमाणही वाढत आहे.**

**डॉ. स्मिता कनक नागले**

दूरदर्शनवर एक जाहिरात लागायची, 'कानाने बहिरा मुका परी नाही.' मूळ रोगावर प्रभावीपणे केलेली ही जाहीरात मूळ समस्येला थेटपणे भिडते.

बहिरेपणा म्हणजे कमीअधिक प्रमाणात ऐकू न येणे. बहिरेपणा येण्यामागची अनेक कारणे आहेत. काही मुलांमध्ये जन्मजात दोषांमुळे कर्णबधिरता असते व त्यातला मुकेपणा हा बहिरेपणाचाच परिणाम असतो. मुळात बालक मुके नसते तर त्याच्या कानावरच शब्द आदळत नाहीत त्यामुळे तो उच्चारत नाही. त्यामुळे तो मुकाच आहे असे समजले जाते पण आजार वेळीच ओळखू आल्यास काही उपचार व प्रशिक्षण करता येते.

कोणतेही मूल ऐकून ऐकूनच बोलायला शिकते, म्हणून त्याच्याशी सतत बोलत राहिले पाहिजे. काही मुलांना जन्मजात बधिरता असते. हे आईवडलांच्या लक्षात यायला उशीर होतो. यावर औषधोपचार काही नाही, मात्र हा दोष लवकर ओळखून त्या दृष्टीने संगोपन व प्रशिक्षण करणे आवश्यक असते. बहिरेपणा हा असा जन्मजात असतो किंवा मोठेपणी अनेक कारणांनी येतो. उतारवायतही ऐकू न येण्याचे प्रमाण वाढल्याचे सध्याचे चित्र आहे. आनुवंशिक आणि जन्मजात दोषांवर उपाय कमी असले किंवा काहीवेळा उपाय नसले तरी मोठेपणी बहिरेपणा येऊ नये यासाठी आपण काळजी घ्यायला हवी. कानाची योग्य काळजी घेतली तर मोठेपणी बहिरेपणापासून आपण दूर राहू शकतो.

### अशी घ्या काळजी

- कानात काडी, पिन किंवा इअरबड्स टाकून कान साफ करणे धोकादायक असते. त्यामुळे कानाच्या पडद्याला इजा होऊ शकते. (कान स्वत: पुसून काढायची गरजच नसते. चावताना जबड्याची जी हालचाल होते त्यामुळे कानातील मळ आपोआपच बाहेर येत असतो. याउलट स्वत: काडी किंवा बड घेऊन कान साफ करताना मळ आत ढकलला जाऊ शकतो आणि हे कानासाठी हितकारक होण्याऐवजी अपायकारकच होते.)
- कानात खोबरेल तेल, हाईड्रोजन परॉक्साइड किंवा दुसऱ्या रुग्णासाठी डॉक्टरांनी दिलेले कानाचे ड्रॉप्स डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कानात टाकू नयेत.
- लहान बाळांना तेलमालीश करताना कानात तेल टाकण्याची प्रथा आहे. ही प्रथा पूर्णतः चुकीचीच आहे. कानात तेल टाकणे हेच बाळासाठी अपायकारक असते. त्यात खोबरेल तेल तर मुळीच नाही कारण ते कानात जाऊन घट्ट होते व कानात बुरशी (Fungus) चा संसर्ग होऊ शकतो.
- खूप दिवस सर्दी होणे हे कानासाठी घातक असते त्यामुळे सर्दी झाली की त्यासाठी तातडीने औषध घ्यायला पाहिजे.
- हेडफोन्स वापरणे शक्यतो टाळा व अत्यंत गरजेचे असेल तर आवाजाची तीव्रता एकदम कमी ठेवा. जास्तवेळ जर हेडफोन्स वापरले तर त्याचा कानावर विपरित परिणाम होतो आणि हळूहळू कमी ऐकू येते. कमी ऐकू येते म्हणून पुन्हा मोठ्या तीव्र आवजात ऐकावे लागते.
- कानठळ्या बसणारे संगीत ज्यात संगीतापेक्षा आवाज आणि गोंगाटालाच जास्त प्राधान्य दिलेले असते असे संगीत ऐकणे टाळा.

सध्या सणासुदीचे दिवस आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी डिजे आणि लाऊडस्पीकरचा आवाज मोठ्याप्रमाणात असतो.

सरकारी बंधने झुगारून अनेक मंडळे आवाजाची तीव्रता मोठी ठेवतात, अशा वेळी या आवाजापासून स्वतःचे संरक्षण करणे महत्त्वाचे असते. हा आवाज आपण रोखू शकत नसलो तरी त्यापासून बचाव करण्यासाठी खिशात कायम कापसाचे बोळे ठेवणे आवश्यक आहे . या मोठ्या आवाजाला सामोरे जाताना कानात कापसाचे बोळे किंवा इअरप्लगचा वापर करा. अगदी एखाद्या वेळी जर कापूस घेणे तुम्ही विसरलात तरी काही बिघडत नाही.

स्वत:च्या बोटांनी कानाची छिद्रे बंद करा, जेणेकरून आवाजाची तीव्रता कमी होईल. त्यामुळे कानावर त्याचा आघात कमी होईल आणि अर्थातच त्याचा परिणामही कमी होईल.

## तज्ज्ञांचा सल्ला कधी घ्याल ?

आपल्या कानात मळ साचला आहे त्यामुळे कमी ऐकू येते, असे स्वतःच ठरवून रस्त्याच्याकडेला बसलेल्या माणसांकडून कानातील मळ काढून घेण्याचा उपाय महागात पडू शकतो. कारण एक तर तो खूप



अणकुचीदार हत्याराने कानातील मळ काढतो, त्यामुळे काही संसर्गजन्य आजारही पसरण्याची शक्यता असते. त्या माणसाकडे असलेले हत्यार गंजलेलेही असू शकते परिणामत: कानाचा पडदा फाटू शकतो. त्यामुळे कायमचे बहिरेपण येण्याची शक्यता असते, म्हणून अशा माणसांपासून दूर राहिलेलेच बरे. कान ठणकतो, कानात खूप मळ झाला आहे अशी लक्षणे तुम्हाला जाणवली तर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यायला पाहिजे. अनेकवेळा अगदी साध्यासोप्या उपायांनीही कानासंबंधीचे आजार बरे होतात. डॉक्टरांकडे गेल्यावर शस्त्रक्रिया करावी लागेल ही भीती अनाठायी आहे. याबरोबरच मुलांनी कानात एखादी वस्तू उदा. दगड, रबर, मोती, शेंगदाणा, एखादे बी, इत्यादी टाकल्यास घाबरून जाऊ नका किंवा अतिउत्साहाने काढायचा प्रयत्न करू नका. तज्ज्ञांकडे जा. एखादा दिवस उशीर झाला तरी फारसा फरक पडत नाही. पण याबाबत तज्ज्ञ डॉक्टरांचाच सल्ला घेणे आवश्यक असते. याबरोबरच कानात किडा गेल्यास काय? कानात तातडीने तेल टाकावे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे यावेळी कानात तेल टाकायचे आहे ते कानासाठी म्हणून नव्हे तर तो कानात शिरलेला किडा मरावा म्हणून. हा किडा मेला तर तो कानाला इजा पोचविणार नाही.

## असे करा उपाय

- वारंवार होणाऱ्या सर्दीकडे दुर्लक्ष करणे हे कानासाठी घातक ठरते. त्यामुळे सर्दीकडे दुर्लक्ष करू नको. बऱ्याच वेळेस फक्त सर्दी झाल्यावरच कान वाहतो. नंतर अगदी कोरडा असतो. त्यामुळे रुग्ण ह्याकडे दुर्लक्ष करतो, पण कानांची हाडे झिजत जाऊन बहिरेपणा वाढत जातो.
- कधी वर्षभर कानातून अगदी कमी प्रमाणात घाणेरडा वास असलेला पू वाहत असतो या पू चे प्रमाण इतके कमी असते की, रुग्णाला फक्त कान ओला आहे इतकेच जाणवते व तो बरेच वर्ष दुर्लक्ष करतो. आत मात्र कानाचे हाड सडत असते व हळूहळू जंतूसंसर्ग मेंदूपर्यंत पोहोचतो. मग रुग्णाला एकाएकी डोकेदुखी, तोंड वाकडे होणे, उलट्या व चक्कर सुरू होतात. तेव्हा कानाची शस्त्रक्रिया करावी लागते. असा रुग्ण दगावण्याची शक्यता असते. त्यातून वाचला तरी कानाची हाडे काढून टाकल्यामुळे तो त्या कानाने बहिरा होतो. कधी तोंड नेहमीकरिता वाकडे राहण्याची शक्यता असते.
- काही मुले जन्मत:च बहिरी असतात. लहान बाळ अगदी २-३ महिन्याचे असतानासुद्धा ते आवाजाला प्रतिसाद देत नाही हे पालकांच्या लक्षात आल्यावर त्याच वेळेस नाक, कान, घसा तज्ज्ञांकडून योग्य तपासण्या करून बाळाच्या बहिरेपणाचे प्रमाण ठरवून त्याला कर्णयंत्र देता येते. त्यामुळे त्याची वाढ योग्य रीतीने होऊन तो मुका राहत नाही. कानांनी ऐकू आले तरच मूल बोलू लागते. (conciliar implant) कॉकीलयर इम्प्लांट बसवून ठार बहिऱ्या बाळालापण चांगले ऐकू येते.
- चष्मा नको असेल तर कॉन्टॅक्ट लेन्सेस वापरता येतात. तसे कानाच्या आत फिट होणारी व बाहेरून न दिसणारी अशी कर्णयंत्रे पण मिळतात.
- अभ्यासात मंद असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वांत आधी थोड्याफार प्रमाणात बहिरेपणा आहे का? ह्याची तपासणी पालकांनी व शिक्षकांनी तज्ज्ञांमार्फत जरूर करावी. कारण वर्गात शिक्षक काय शिकवतात ते त्यांना ऐकूच येत नसेल तर समजणार कसे. हेच विद्यार्थी मग कानाचा उपचार घेतल्यावर अभ्यासात चमकू शकतात. अचानक बहिरेपणा आल्यास, लगेचच काही तासांमध्येच औषधोपचार सुरू झाले तर बहिरेपणा काही प्रमाणात सुधारता येतो.

वरील सर्व माहितीवरून एक बाब आपल्याला प्रामुख्याने लक्षात येईल की, कानाची नीट निगा राखल्यास व वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास आपण बहिरेपणा निश्चितच टाळू शकतो.

**(लेखिका जी.टी. रुग्णालयाच्या कान-नाक-घसा विभागाच्या प्रमुख आहेत.)**




**विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेल्या चिखलदराचे सौंदर्य सध्या चांगलेच बहरले आहे. उन्हाळ्यातही गारवा, नजर टाकावी तेथे विहंगम दृश्य, विविध प्रजातींची फुले, झाडे, हिरवा गालिचा,आणि डोंगरदऱ्यातून जाणाऱ्या ढगांची मालिका पाहून कोणालाही वारंवार यावेसे वाटणाऱ्या चिखलदऱ्याच्या सौंदर्याची किमया न्यारीच!**

**सुरेश काचावार**

विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळख असलेले थंड हवेचे ठिकाण चिखलदरा महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. हैद्राबाद फलटणीचा कॅप्टन रॉबिन्सन याने १८२३ साली चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध लावला. पर्यटन विकास महामंडळ, वन विभाग, व्याघ्र प्रकल्प, नगर परिषद, सा.बां. विभागाने पर्यटकांना सोयीसुविधा उपलब्ध केल्यामुळे चिखलदरा हे पर्यटनस्थळ नावारूपास आले आहे. सातपुडाच्या शिखरावर चिखलदऱ्याचे पठार असून मोथा ते वैराटपर्यंत २५ ते ३० कि.मी.हा परिसर पसरलेला दिसतो. चिखलदरा शहराचे क्षेत्रफळ ३९४ हेक्टरच्या वर आहे. समुद्रसपाटीपासून उंची ३ हजार ६५० फूट आहे. येथील हवामान थंड आणि आरोग्यदायी आहे.

### प्रेक्षणीय स्थळे

चिखलदरा परिसरात भीमकुंड, पंचबोल पॉईंट, गाविलगड, देवी पॉईंट, शक्कर तलावातील बोटिंग, शासकीय वन उद्यान, आमझरी रोपावाटिका, जगाडोह येथील धबधबा, सेमाडोहची जंगल सफारी, पावसाळ्यातील व्हॅली क्रॉसिंग, रॉक क्लायंबिंग, वॉटरफॉल अशी १०–१२ पर्यटनस्थळे आहेत. यातील सर्वात महत्त्वाचा पॉईंट म्हणजे सनसेट आहे. हा पॉईंट केवळ उन्हाळ्यातच पाहायला मिळतो. सद्यःस्थितीत भीमकुंड पर्यटकांना खुणावते आहे. चिखलदरा परिसरात चांगला पाऊस झाल्यामुळे ठिकठिकाणी धबधबे दिसून येतात. भिमकुंड धबधबा पाहण्यासाठी सध्या पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. पंचबोल पॉईंटवरही मोठी गर्दी झालेली दिसून येते. या पॉईंटचे वैशिष्ट्य असे की येथे पाच वेळा आवाज ऐकू येत असल्याने पर्यटक या पॉईंटकडे आवर्जून जातात. येथेच इतिहासाची साक्ष देणारा ऐतिहासिक गावीलगड मोठ्या डौलाने उभा आहे. रॅपलिंगची सोय वन विभागाने केल्यामुळे पर्यटकांच्या उत्साहात आणखी भर पडली आहे.

### मान्सून मेळघाट सफारी

चिखलदरा नगरपरिषद व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विद्यमाने चिखलदरा येथून पर्यटकांच्या सोयीसाठी मान्सून सफारी सुरू करण्यात आली आहे. चिखलदरा नगरपरिषद येथून २० आसनाची मिनीबस दररोज दोन वेळा निघते. सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत चिखलदरा ते सेमाडोह, कोलकास–सेमाडोह व परत चिखलदरा या मार्गाने निसर्गरम्य स्थळदर्शनाची अंदाजे १०० कि.मी. भ्रमंती करण्यात येते.

प्रतिव्यक्ती २५० रुपये शुल्क आकारण्यात येते. संध्याकाळचा मार्ग चिखलदरा, वैराट, परत चिखलदरा अंदाजे ३० कि.मी. वेळ संध्याकाळी ४ ते ६–३० पर्यंत भ्रमंतीसाठी प्रतीव्यक्ती १०० रुपये शुल्क आकारण्यात येते. एकाच दिवशी दोन्ही मार्गाने सफारी करणाऱ्या

#### असे जाता येईल

चिखलदरा येथे जाण्यासाठी जवळचे विमानतळ नागपूरचे आहे. रेल्वेने बडनेरा जवळचे स्टेशन आहे. येथून १०० कि.मी.चिखलदरा आहे. रोडने मुंबई–चिखलदरा ७६३ कि.मी. नागपूर–चिखलदरा २३० कि.मी., अमरावती–चिखलदरा १०० कि.मी.अंतर आहे. परिवहन महामंडळाच्या बसेस नागपूर,अमरावती येथून चिखलदरा येथे जाण्यासाठी सहजपणे उपलब्ध असतात.

# चिखलदरा



**सफारीचे बुकिंग चिखलदरा नगरपरिषद व वनपरिक्षेत्र अधिकारी मेळघाट व्याघ्र प्रकल्प चिखलदरा यांच्या कार्यालयात सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत होते. वनपरिक्षेत्र अधिकारी मेळघाट व्याघ्र प्रकल्प, चिखलदरा येथे ०७२२०-२३०२६८ अथवा ९३७२८४३९५२ वर संपर्क साधाता येईल.**

पर्यटकांना प्रतिआसन ३०० रुपये आहे. आतापर्यंत अनेक पर्यटकांनी या सफारीचा आनंद घेतला आहे. मेळघाट म्हणजे घाटांचा मेळ आणि एक शुष्कपर्णी पानगळीच्या जंगलाचा सुमारे साडेतीन हजार चौ.कि.मी.चा एक आगळावेगळा भूभाग. वनसंपत्ती, निसर्ग सौंदर्याची लयलूट असलेला भाग.

विविध तज्ज्ञ सांगतात की, मेळघाट हे वनस्पती, जैवविविधता व जनुकांचे समृद्ध भंडार आहे. नष्ट होण्याची भीती असलेल्या कित्येक वनस्पती, भाज्या, फळे यांची मूळ जनुके मेळघाटात शाबूत आहेत. मेळघटी दऱ्या, टेकड्या आणि पहाडी बल्डे, शेकडो जातींची फुलपाखरे, बिबट, पट्टेदार वाघ, हरीण, नीलगाय, अस्वल, रानगवे, हजारोंच्या संख्येने मोर, यांचे पर्यटकांना आकर्षण आणि अप्रूप असते.

संपर्क: ०९४२२९४५२८५

## येथे राहता येईल

चिखलदरा येथे पर्यटन विकास महामंडळाची एमटीडीसी हॉलिडे रिसॉर्ट आहेत. एमटीडीसीच्या मुंबई व नागपूर येथील कार्यालयात किंवा अमरावती विभागीय कार्यालय, बरॅक क्र.३, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कॅम्प रोड अमरावती ४४४६०१, दूरध्वनी ०७२१-२६६१६११, फॅक्स ०७२१-२६६१६०१, roamravatimaharashtra.gov.in चिखलदारा रिसॉर्ट ०७२२०-२३०२३४/ २३०२६३ या पत्यावर आरक्षण करता येते.
सा. बां. विभाग, नगर परिषद, वन विभागाचीही स्वतंत्र विश्रामगृहे आहेत.
खाजगी हॉटेल आणि लॉजदेखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.









# ध्येयासक्तीला परिश्रमाचे बळ

यूपीएससी (संघ लोकसेवा आयोग)च्या परीक्षेत यश मिळवण्यापर्यंतचा मार्ग खूप खडतर आहे. त्यासाठी सूत्रबद्ध नियोजन आणि परिश्रमाबरोबरच संयमही खूप महत्त्वाचा असतो. मात्र परिश्रमाला पर्याय नाही. शिवाय कसलाही न्यूनगंड न बाळगता आपल्या भक्कम आणि कमकुवत बाजू लक्षात घेऊन या परीक्षेची तयारी केली तर लवकर यश मिळते.

**'मला डॉक्टर, इंजिनीअर व्हायचंय' अशी स्वप्ने बाळगणारी गावातील मुले अचानक 'मला कलेक्टर व्हायचंय' असे म्हणू लागली तर! होय, हे घडलं आहे अभिजीत शेवाळे यांच्या अथक परिश्रमातून मिळालेल्या यश प्राप्तीमुळे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कारदगा (ता. चिकोडी, जि. बेळगाव) या छोट्याशा गावातील श्री. शेवाळे यांनी प्रशासनात येण्याचा निर्णय घेतला आणि स्वप्न सत्यातही उतरवले. त्यांना संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ९० वी रँक मिळाली आहे. त्यांच्या यशामुळे संपूर्ण गाव भारावून गेला आहे. डॉक्टरकी करण्याचा चांगला पर्याय समोर असतानाही त्यांनी प्रशासनात येण्याचा निर्णय घेतला. त्यांची प्रेरणादायी यशस्वी वाटचाल त्यांच्याच शब्दात...**



**अभिजित शेवाळे**
भा.प्र.से. रँक – ९०

### टर्निंग पॉइंट

महाराष्ट्राच्या सीमेपासून अवघ्या दोन कि.मी. अंतरावरील कारदगा (ता. चिकोडी, जि. बेळगाव) हे माझे गाव. येथेच माझे बालपण गेले. दहावीपर्यंतचे शिक्षण येथेच झाले. वडील तुकाराम शेवाळे भारत संचार निगम लिमिटेडमध्ये कोल्हापूर येथे टेक्निकल असिस्टंट आणि आई शेतकरी. २२ सदस्यांचे आमचे एकत्र कुटुंब असल्याने भावनिक पाया भक्कम राहिला. दहावीनंतर मात्र पुढील शिक्षणासाठी मी आजोबांकडे कोल्हापूरला आलो. येथील विवेकानंद महाविद्यालयात ११ वी विज्ञान शाखेला प्रवेश घेतला. १२ वीनंतर मुंबईतील शासकीय दंत महाविद्यालयातून बीडीएस (बॅचलर्स ऑफ डेन्टल सर्जरी) पदवी शिक्षण पूर्ण केले.

बीडीएसनंतर डेन्टिस्ट म्हणून व्यवसाय आणि सेवा करण्याची संधी होती. परंतु ही सेवा काही रुग्णांपर्यंतच मर्यादित राहिली असती. या क्षेत्रात राहून असंख्य वंचित, पीडितांना मी न्याय देऊ शकत नव्हतो याची जाणीव झाली. शिवाय गावी गेल्यानंतर रेशनच्या दुकानावर लागलेल्या रांगा दिसल्या की चीड यायची. एकदोनवेळा तक्रार करण्याचा प्रयत्न केला. मात्र उपयोग झाला नाही. तेव्हा सामान्यांचे प्रश्न सोडवण्याचा तुला एवढा कळवळा आहे तर मग व्यवस्था सुधारण्यासाठी प्रशासनात ये, असे वडिलांनी सांगितले. दरम्यान पदवी शिक्षणानंतर गावातील लहू नावाच्या मित्राकडून मला यूपीएससीची माहिती मिळाली. प्रशासनात येण्याचा हा राजमार्ग असल्याचे पटले आणि लागलीच फेब्रुवारी २०१२ मध्ये या परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली.

### परिश्रमाला प्राधान्य

फेब्रुवारी २०१२ ला मी तयारीला जोमाने सुरुवात केली खरी परंतु मे महिन्यातच परीक्षा असल्याने माझी पुरेशी तयारी झाली नव्हती. तरी उत्साहात आणि घाईत ही परीक्षा दिली. खरं तर ही माझी चूक म्हणावी लागेल. मी माझा एक अटेम्प्ट घालवला होता. परंतु २०१३ च्या परीक्षेची मी नियोजनबद्ध आणि काटेकोर पद्धतीने तयारी केली. दरम्यान स्पर्धा परीक्षा केंद्रांच्या विशिष्ट शिकवण्यांची गरज भासली नाही. त्यापेक्षा परिश्रमाला प्राधान्य देण्यावर माझा भर होता. 'एनसीआरटी' आणि 'सीबीएससी'ची सर्व पुस्तके सविस्तर अभ्यासली. विविध विषयांवर वेळोवेळी मित्रांसोबत गटचर्चा केली. याची फलश्रुती म्हणजे २०१३ च्या परीक्षेत दुसऱ्या प्रयत्नात मी ही परीक्षा उत्तीर्ण झालो. परंतु मला आयएएस केडर मिळू शकले नाही. भारतीय राजस्व सेवेसाठी (आयआरएस) निवड झाली. मात्र आहे त्यावर समाधान न मानता आयएएस होण्याच्या ध्येयावर ठाम राहिलो. दरम्यान भारतीय राजस्व सेवेत रुजू झालो. परंतु तयारीत खंड पडू दिला नाही. यश मला खुणावत होते.

दुसऱ्याच प्रयत्नात आयएएस मिळाले नसले तरी आयआरएससाठी निवड म्हणजे माझ्यासाठी यशाची पायरी होती. शिवाय माझे प्रयत्न योग्य दिशेने सुरू असल्याची ती पावती होती. आता फक्त आपण कोठे कमी पडलो ते शोधायचे होते. ज्या चुका गेल्या वेळी झाल्या त्या शोधून काढल्या. त्यावर काम केले. त्या पुन्हा होणार नाही याची काळजी घेतली. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवले. विविध ठिकाणी मॉक इंटरव्ह्यूमध्ये भाग घेतला. परीक्षेपूर्वी झालेल्या अभ्यासाची, तयारीची उजळणी पूर्ण केली. आणि तो दिवस उजाडला... ज्यासाठी मी अविरत परिश्रम घेत होतो त्याचे फलित झाले. २०१४ च्या परीक्षेत मला यश मिळाले. ४ जुलै २०१५ रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि गावात एकच जल्लोष झाला. गावातील मुलेही आता 'मला कलेक्टर व्हायचंय' असे म्हणू लागली. ही बाब माझ्यासाठी अभिमानाची आहे. ज्या सेवेसाठी माझी निवड झाली आहे त्या प्रशासकीय सेवेत जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास मी प्राधान्य देईन. आपण ज्या तळमळीने या सेवेत दाखल होऊ इच्छितो त्याच तळमळीने पदावर रुजू झाल्यावर काम करत राहिल्यास जनसामान्यांच्या जीवनात प्रचंड सकारात्मक बदल घडून येऊ शकतात, असा मला विश्वास आहे.

### मार्गदर्शक

प्रत्येकाकडून काहीतरी चांगले घेण्यासारखे असते. त्यामुळे पावलोपावली मला मार्गदर्शक ठरलेल्या सर्वांचा माझ्या यशात वाटा आहे. अगदी मित्रांकडून मिळालेले मार्गदर्शन असो की एखाद्या लहान मुलाकडून

## मुलाखतीची तयारी

**मुख्य परीक्षा चांगली गेल्यानंतर मुलाखतीच्या दृष्टीने मी इंग्रजीवर अधिक भर दिला. कारण मला मुलाखत याच भाषेत द्यायची होती. स्वत:ला व्यक्त करता येणे खूप महत्त्वाचे असते. किंबहुना यालाच मुलाखत म्हणतात. मॉक इंटरव्ह्यू दिले. त्यामुळे मुलाखतीची चांगली तयारी झाली. ग्रामीण भागातील उमेदवारांना थोडे इंग्रजीवर काम करावे लागते. ही भाषा सुधारण्यासाठी द हिंदू, इंडियन एक्स्प्रेस आदी नामांकित दैनिकांचे नियमित वाचन करावे. मुलाखत मात्र इंग्रजीमधूनच दिली पाहिजे असे नाही. मातृभाषेतूनही देता येते.**

मिळालेली प्रेरणा. प्रत्येकाकडून काही ना काही घेत गेलो. ते सर्वजण माझ्यासाठी त्यात्या क्षणी गुरूच्या ठिकाणी होते. विशिष्ट मार्गदर्शनाची गरज भासली नाही.






### उत्कृष्टतेचा ध्यास

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशाला २०२० पर्यंत महासत्ता बनन्याचे स्वप्न दाखवले. ते सत्यात उतरवण्याची धमक आजच्या युवकांमध्ये आहे. प्रशासनात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी यूपीएससी राजमार्ग आहे. मात्र करीअर, देशसेवा, लोकसेवेसाठी हेच एक माध्यम आहे असे नाही. आयुष्यातील २० ते ३० ही वर्षे 'लाथ मारेन तिथे पाणी काढेन' अशा करारीपणाची असतात. त्यामुळे मी ज्या क्षेत्रात जाणार त्या क्षेत्राचा शिवाजी होणार ही खूणगाठ मनाशी बांधून काम करीत राहिले तर आपल्याला आकाश मोकळे आहे.

### यशाची सूत्रे


- अभ्यासक्रम समजून घ्या.
- घोकंपट्टी न करता संकल्पना समजून घ्या.
- तासन्तास अभ्यास करण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण अभ्यास कसा होईल यावर भर द्यावा.
- एखाद्या टॉपिकच्या तयारीसाठी मोजकी निवडक पुस्तके अभ्यासावी.
- विविध विषय अभ्यासताना स्वत:च्या नोट्स काढाव्यात.
- परीक्षेपूर्वी केलेल्या अभ्यासाची उजळणी करण्यासाठी काही दिवस राखून ठेवावे.
- उत्कृष्टतेचा ध्यास ठेवा.
- मुलाखतीत स्वत:ला व्यक्त करा.
- नामांकित इंग्रजी दैनिकांचे नियमित वाचन करा.
- संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपासून चांगले गुण घ्या.
- विविध प्रलोभनांपासून स्वत:ला दूर ठेवा.
- स्वत:च्या गरिबीच्या आणि हालाखीच्या परिस्थितीचा बाऊ करू नका.
- मार्गदर्शनासोबतच स्वअध्ययनावर भर द्या.

दरम्यान विविध प्रलोभनांपासून स्वत:ला दूर ठेवले तर यशाच्या मार्गात अडथळ्यांचा सामना करावा लागत नाही. शिवाय आता सर्वांना संधी उपलब्ध आहे. त्यामुळे गरिबीचा, हलाखीच्या परिस्थितीचा बाऊ न करता आर्थिक चणचणीवर मात करत त्यातून मार्ग काढण्याची सदैव तयारी ठेवावी. आणि आवडीच्या क्षेत्रालाच जर करीअर म्हणून निवडाल तर अनेक अडचणींवर हसतमुखाने मात कराल. यशापयशाची, बक्षिसाची चिंता राहणार नाही.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

# हितगूज हिताचे

**गेल्या महिनाभरात दिलखुलास कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी हितगूज केले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू देवानंद शिंदे, जागतिक स्तनपान सप्ताह (१-७ ऑगस्ट) निमित्त राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनच्या महासंचालक श्रीमती वंदना कृष्णा, माहिती-शिक्षण आणि संवाद सल्लागार प्रफुल्ल रंगारी, लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे महासंचालक प्रवीण दीक्षित, यशदामधील आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संचालक व्ही. एन. सुपनेकर यांनी विविध विषयावर श्रोत्यांना मार्गदर्शन केले.**




**देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी प्रयत्न केले जात असून विद्यापीठातील संशोधनाच्या आधारावरच भारतातील पहिल्या २५ अग्रेसर विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. नोकरीक्षम रोजगारनिर्मिती करणारे मनुष्यबळ तयार करण्याचे काम विद्यापीठ करीत आहे. आयसीटी (इन्फरमेशन, कम्युनिकेशन, टेक्नॉलॉजी) वापर शिवाजी विद्यापीठाचा स्तुत्य उपक्रम असून डाटासेंटर, नॉलेज नेटवर्क, प्रशासकीय विभागाचे संगणकीकरण यासारख्या उपक्रमांद्वारे सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याचा फायदा विद्यार्थी आणि नागरिक यांना होईल.

**वंदना कृष्णा, महासंचालक, माता–बाल आरोग्य व पोषण मिशन**

स्तनपानाविषयी माहिती सांगताना राजमाता जिजाऊ माता–बाल आरोग्य व पोषण मिशनच्या वंदना कृष्णा म्हणाल्या, स्तनपानाविषयी समाजात अनेक गैरसमज आहेत. योग्य पद्धतीने कधी आणि केव्हा, कसे स्तनपान करावे हे आपण समजून घेतले पाहिजे. प्रसूतीनंतर अर्ध्या तासाच्या आत बाळाला मातेचे दूध देणे खूप महत्त्वाचे असते. कारण हे एक प्रकारचे टॉनिक असून, संतुलित आहाराचे अन्नघटक या चीक दुधामध्ये असतात. स्तनपानाचे महत्त्व सांगताना प्रफुल्ल रंगारी म्हणाले, आईच्या मानसिक स्थितीवर आईचे दूधनिर्मितीचे प्रमाण असते. घरातील व्यक्तींनी (पती, सासू आदी) घरकामापेक्षा बाळाच्या आरोग्यासाठी मातेला बाळास स्तनपान करण्यास सांगावे. याबरोबर आईने आदर्श आहार घ्यावा. यामध्ये दूध, अंडी, केळी, भाज्या असाव्यात. प्रसूतीनंतर अर्ध्या तासाच्या आत बाळाला आईकडे दिले पाहिजे. यामुळे मूल आणि आईच्या स्पर्शामुळे आईच्या शरीरात दूध तयार होते. बाळ स्वत:हून दूध पिण्यासाठी धडपडते. याला स्तनपानाची यशस्वी सुरुवात असे म्हटले जाते. या मुलांना भविष्यात रक्तदाब, लठ्ठपणा यासारखे आजार होत नाहीत. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. मातेलाही स्तनाचा कर्करोग यासारखा आजार होत नाही.

**प्रवीण दीक्षित, महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग**

लाच या व्याख्येत कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो, तसेच एखाद्या सामान्य नागरिकाकडून एखाद्या कामासाठी लाच मागितली गेली असल्यास कोठे तक्रार करायची याविषयी माहिती देताना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे महासंचालक प्रवीण दीक्षित म्हणाले, तक्रारदारांना लाचलुचपत संदर्भात १०६० या नि:शुल्क हेल्पलाईन प्रमाणेच acbmaharashtra.net या संकेतस्थळावर विभागवार लाच मागण्यासंदर्भातील माहिती मिळेल. शिवाय मोबाइलच्या माध्यमातून तक्रार करता येऊ शकते. तक्रारदार १०६० या हेल्पलाइनवर २४ तास तक्रार आणि माहिती सांगू शकतो. यामध्ये ऑडिओ, व्हिडीओ क्लिप किंवा त्यांच्याकडील उपलब्ध पुरावे एका क्लिकवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आपण पाठवू शकता. लाचखोरी विरोधात जागृती करून यात नागरिकांचा सहभाग वाढवून समाजातील ही प्रवृत्ती दूर होण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न केला जातो.

**व्ही. एन. सुपनेकर, संचालक, आपत्ती व्यवस्थापन, यशदा**

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबात माहिती देताना कर्नल व्ही. एन. सुपनेकर यांनी सांगितले की, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत आपत्तीवर मात केली जाते. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापनात समाजाचा उत्स्फूर्त सहभाग आणि स्वसंरक्षणाबरोबरच दुसऱ्याला मदत करण्याची भावना असणे खूप महत्त्वाचे असते.

बहुमजली इमारतीला आग लागणे आणि लिफ्टमध्ये अडकणे अशा घटना घडतात. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा सर्वसामान्य नागरिकांना समजायला हवा. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनात सर्व घटकांचा सहभाग असू शकतो. याबरोबरच आपत्ती व्यवस्थापनात प्रसारमाध्यमांची नेमकी कोणती भूमिका असावी, याविषयी व्ही. एन. सुपनेकर यांनी भाष्य केले.

**– मीरा ढास**



**देवानंद शिंदे**
(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)



**वंदना कृष्णा**
(माता–बाल आरोग्य व पोषण मिशन)



**प्रवीण दीक्षित**
(लाचलुचपत प्रतिबंध विभाग)



**व्ही. एन. सुपनेकर**
(आपत्ती व्यवस्थापन कक्ष, यशदा, पुणे)

**सात शतके लोकप्रियतेची...**

# उपयुक्त आणि सर्वसमावेशक

**'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात गेल्या महिन्यात विविध विषयातील तज्ज्ञ, मान्यवर प्रेक्षकांच्या भेटीला आले. यात परिवहन मंत्री दिवाकर रावते, उद्योगमंत्री सुभाष देसाई, जे.जे. समूह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था चंद्रकांत दळवी यांचा सहभाग होता. या कार्यक्रमातील त्यांच्या मुलाखतीचा हा थोडक्यात आढावा...**

**दिवाकर रावते, परिवहन मंत्री**

गणेशोत्सव आता जवळ येऊन ठेपला आहे. या उत्सवाच्या निमित्ताने हजारो मुंबईकर चाकरमानी कोकणात जातात. हे लक्षात घेता एस.टी. महामंडळाने अत्यंत नियोजनबद्ध तयारी केली आहे. या पार्श्वभूमीवर जय महाराष्ट्र कार्यक्रमात परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते यांना आमंत्रित करण्यात आले होते. एस.टी. महामंडळाच्या जादा गाड्या कोकणात सोडण्यात येणार आहेत. तसेच गणेशोत्सवासाठी एस.टी. महामंडळाची तयारी, जादा गाड्यांविषयी श्री. रावते यांनी सांगितले. सुरक्षित प्रवास हा एस.टी.चा ध्यास आहे. एसटीची स्वतःची सुमारे २४९ आगारे व ५०० च्या वर बसस्थानके आहेत. येत्या काही काळात एस.टी.सोबतच या आगारांचाही चेहरामोहरा बदलविण्यात येईल, असे परिवहन मंत्री म्हणाले. शिवनेरी बसमध्ये महिलांना आसने राखीव ठेवण्याविषयीच्या निर्णयामागची भूमिका त्यांनी कार्यक्रमादरम्यान स्पष्ट केली.

**सुभाष देसाई, उद्योगमंत्री**

'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर 'मेक इंडिया महाराष्ट्र' ही संकल्पना राज्यात राबवण्यात येत आहे, याविषयी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अभ्यासपूर्ण माहिती दिली. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आणण्यासाठी आपण शिष्टमंडळासह अमेरिका दौऱ्यावर गेलो होतो. औद्योगिक विकासासाठीचा हा अमेरिका दौरा यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र पुरेसे मनुष्यबळ, इंग्रजीचे ज्ञान, जागेची उपलब्धता या वैशिष्ट्यांमुळे आघाडीवर असल्याचे ते म्हणाले. येत्या काळात उद्योग क्षेत्रात राज्य आघाडी घेणार असून अधिकाधिक गुंतवणूक राज्यात होणार असल्याचे उद्योगमंत्री म्हणाले.

**डॉ. तात्याराव लहाने, अधिष्ठाता, जे.जे. रुग्णालय**

शरीर हे क्षणभंगुर आहे, मृत्यूनंतर सारे नष्ट होते. मात्र अवयवरूपाने जिवंत राहायचे असेल तर 'अवयव दान' करा. मृत्युपश्चात एक देह सात जणांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरू शकतो, असे आवाहन जे.जे. समूह रुग्णालय, मुंबईचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने यांनी केले. अवयवदान हे केवळ डोळे किंवा किडनीपुरते मर्यादित नसून शरीराचे सुमारे १० विविध अवयव आपण दान करू शकतो. फक्त त्यासाठी पुरेशी माहिती व इच्छाशक्ती असण्याची गरज आहे. मात्र आपल्या समाजात अवयवदानाविषयी फारशी जागृती नसल्याने कित्येक रुग्ण वर्षांनुवर्ष प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान ठरते, असे डॉ. लहाने यांनी सांगितले.

**चंद्रकांत दळवी, सहकार आयुक्त व निबंधक (सहकारी संस्था)**

श्री. दळवी म्हणाले, महाराष्ट्र हे भारतातील सहकार चळवळीतील आघाडीचे राज्य असून त्यास प्रदीर्घ इतिहास आहे. सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावते. महाराष्ट्रात सुमारे दोन लाख नोंदणीकृत सहकारी संस्था आहेत. या सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाला १ जुलैपासून सुरुवात झाली असून येत्या ३० सप्टेंबरपर्यंत ते केले जाणार आहे. या सर्वेक्षणात बंद असलेल्या, कार्यस्थगित व ठावठिकाणा नसलेल्या सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येणार आहे.

**प्रभाकर सावे, कृषितज्ज्ञ**

श्री. प्रभाकर सावे म्हणाले, वाढीव उत्पादन खर्च व शेतमालाची कमी किंमत यामुळे शेतीचे आर्थिक गणित जमेनासे झाले आहे. पण बदलत्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्यांबरोबरच या क्षेत्रात काही नवीन संधी उपलब्ध होत आहेत. कृषी पर्यटन ही त्यापैकीच एक संधी. निसर्ग वाचनाचा अनुभव व आनंद देत शेतकऱ्याने आपल्या कसत्या शेतावर पर्यटकांना घडविलेली सहल अशी कृषी पर्यटनाची व्याख्या करता येईल. अर्थातच फक्त माहितीचा आनंद व निसर्गाशी जवळीक साधण्यापुरतीच ही संकल्पना मर्यादित नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**– अतुल पांडे**



**दिवाकर रावते**
(परिवहन मंत्री)



**सुभाष देसाई**
(उद्योगमंत्री)



**डॉ. तात्याराव लहाने**
(अधिष्ठाता, जे.जे. रुग्णालय)



**चंद्रकांत दळवी**
सहकार आयुक्त व निबंधक
(सहकारी संस्था)



**प्रभाकर सावे**
(कृषितज्ज्ञ)

# सिंहस्थ संवाद...!

महान्यूज वेब पोर्टल हे मुळात न्यूज पोर्टल आहे. यामध्ये शासन करीत असलेल्या लोकोपयोगी आणि विकासात्मक कामाला नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश अभिप्रेत आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे या वर्षी सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. बारा वर्षांनी साजरा होणारा हा कुंभमेळा म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवामध्ये भर घालणारा महोत्सव आहे. यासाठी येणाऱ्या लाखो लोकांची गैरसोय होऊ नये आणि हा सोहळा सुरळीत पार पडावा यासाठी राज्य शासन सर्व उपाययोजना करीत आहे.

या कुंभमेळ्यासाठी शासन करीत असलेल्या उपाययोजनांबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. यासाठी महान्यूजने सिंहस्थ संवाद विशेष सदर सुरू करून त्याद्वारे तेथे झालेल्या आणि होत असलेल्या प्रत्येक कामाला लोकांपर्यंत पोहोचवण्यात वाटा उचलला आहे. महान्यूजमधून सिंहस्थ संवाद सुरू झाला २७ जुलैपासून. याद्वारे नाशिक, त्र्यंबकेश्वर, तपोवन आदी ठिकाणे, कुंभमेळा २००३ ते २०१५, या वर्षी उभारण्यात आलेले घाट, तेथे कसे जावे याबाबत मार्गदर्शन, कुंभमेळ्यातील सुरक्षा व्यवस्था, या उत्सवाचे सामाजिक पैलू, आरोग्याची काळजी कशी घ्यावी, कुंभमेळा कालावधीत शासन, स्थानिक प्रशासन, महानगरपालिका, एसटी महामंडळ, वीज मंडळ करीत असलेल्या उपाययोजना, आपत्ती व्यवस्थापन अशा अनेक बाबींसंदर्भात माहिती देण्यात येत आहे. यातील काही लेख हे महासंचालनालयातील अधिकाऱ्यांनी लिहिलेले तर काही लेख संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून लिहून घेतलेले आहेत. ही माहिती कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

**-ब्रिजकिशोर झंवर**


# लोकमान्य : लोकराज्य



**सातारा जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल**

महाराष्ट्र शासनाच्या विविध उपक्रमांची, धोरणांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून शासकीय यंत्रणेचा अधिकाधिक लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचावा, यासाठी लोकराज्यच्या माध्यमातून सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. लोकराज्य हे मासिक राज्य शासनाच्या सामान्य जनतेप्रती असलेल्या दायित्वाचे प्रतिक आहे, अशा शब्दात सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल यांनी जिल्हा माहिती कार्यालयाच्या भेटीदरम्यान कौतुक केले. यावेळी ते व त्यांच्यासोबत उपस्थित कर्मचारी लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार झाले.

कुंभमेळ्याच्या माहितीपूर्ण अंकासोबतच सातारा जिल्ह्यासह महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार योजनेबाबत जुलै महिन्याच्या अंकात आढावा घेण्यात आला. या योजनेला लोकाभिमुख करण्यात लोकराज्यचा मोलाचा वाटा असल्याचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी या वेळी स्पष्ट केले. राजस्थान सरकारने या प्रकल्पाचे स्वागत केल्याचे वृत्तही या अंकात घेतल्याचे त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिले. सातारा जिल्ह्यातील कार्यासाठी श्री. मुद्गल यांचे कौतुक राजस्थानच्या मुख्यमंत्री




**अकोला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेच्या यशासाठी लोकराज्य किती महत्त्वाची भूमिका बजावते, ही बाब समजावून सांगितली.**



**यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह यांनी जिल्हा माहिती कार्यालयाला भेट देऊन लोकराज्यचे अंक बघितले. त्यात प्रकाशित होत असलेल्या उपयुक्त माहितीबद्दल समाधान व्यक्त केले.**

# महामानव अंकाचे मोफत वाटप

ब्ल्यू स्कॉय चॅरिटेबल ट्रस्ट सांगली यांच्यामार्फत लोकराज्य एप्रिल २०१५ चे ५०० अंक मोफत वाटप करण्यात आले. हा अंक एप्रिल महिन्यात प्रकाशित करण्यात आला होता. या अंकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दर्शविणारे लेख प्रसिद्ध करण्यात आले. संघटनेचे मुख्य विश्वस्त प्रा. पी. एस. कांबळे, प्रा. एस.एम.पाटील, वर्षा कांबळे, नंदिनी माळवी, हर्षा बन्सोडे यांनी मोफत अंक वितरणासाठी पुढाकार घेतला.





# लोकराज्य ग्रामचा सिंधुदुर्ग पॅटर्न

## २३ गावे लोकराज्य ग्राम, ३,३९८ वर्गणीदार

**संध्या गरवारे**

निसर्गाचे अद्‌भूत सौंदर्य लाभलेला सिंधुदुर्ग पहिला पर्यटन जिल्हा म्हणून परिचित आहे. आता तो लोकराज्य ग्राम म्हणून स्वतःची नवी ओळख करू पाहत आहे. पहिला साक्षर जिल्हा, पहिला ई ऑफिस प्रणाली राबवणारा जिल्हा, लोकसंख्या स्थिर असलेला जिल्हा अशी सिंधुदुर्ग जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्यात स्त्री–पुरुष प्रमाणही राज्यातील इतर जिल्हयांच्या तुलनेत चांगले असल्याचे २०११ च्या जनगणनेत समोर आले आहे. निर्मल ग्राम व तंटामुक्त जिल्ह्याकडे वाटचाल करणारा जिल्हा अशी सिंधुदुर्गची ओळख आहे.

लोकराज्य ग्राम ही नावीन्यपूर्ण संकल्पना प्रभावीपणे राबवण्यात सिंधुदुर्ग जिल्ह्याने आघाडी मिळवली आहे. जिल्ह्यात देवगड तालुक्यातील तेवीस गावे लोकराज्य ग्राम झाली आहेत. या उपक्रमामुळे महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेले लोकराज्य मासिक हे देवगड तालुक्यातील तेवीस गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत अर्थातच घराघरात पोहोचण्यास मदत होणार आहे.

लोकराज्य मासिक घरोघरी पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालय सिंधुदुर्गतर्फे सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. देवगड तालुक्यातील गावांना लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार करण्यासंदर्भात पंचायत समितीमध्ये ग्रामसेवक बैठकीच्या मासिक सभेत हा विषय गटविकास अधिकारी यांच्यामार्फत मांडण्यात आला होता. या अनुषंगाने देवगड पंचायत समितीचे सभापती डॉ. मनोज सारंग व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हा माहिती अधिकारी संध्या गरवारे यांनी या गावांना आवाहन केले होते. या आवाहनास सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे देवगड तालुक्यातील सांडवे, धालवली, मेळगाव, ओंबळ, हडपीड, बुरंबावाडे, चाफेड, उंडिल, मिठबुंबरी, मोंडपार, रहाटेश्वर, गढीताम्हाणे, चांदोशी, पावणाई, वानिवडे, गवाणे, शिरवली, महाळुंगे, लिंगडाळ, कुणकवण, पडवणे, फणसे, कातवण या २३ गावातील ३,३९८ कुटुंबांना लोकराज्य मासिकाचे वर्गणीदार करण्यात आले आहेत.

अशा प्रकारे महाराष्ट्रात एकावेळी सर्वाधिक ग्रामपंचायती लोकराज्य ग्राम होण्याचा मान सिंधुदुर्ग जिल्ह्याला मिळाला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३१ गावे लोकराज्य ग्राम झाली आहेत. सर्वाधिक २४ गावे लोकराज्य ग्राम एकाच वेळी होण्याचा मान देवगड तालुक्याला मिळाला आहे. यापूर्वी ग्रामपंचायत पिंगुळी व भरणी (ता.कुडाळ), ग्रामपंचायत पाटगाव (ता.देवगड), ग्रामपंचायत कुशेवाडा,परुळेबाजार, चिपी व भोगवे (ता.वेंगुर्ला), ग्रामपंचायत तरंदळे (ता. कणकवली) ही गावे लोकराज्य ग्राम झाली आहेत.

लोकराज्य ग्राम करण्यामध्ये देवगडचे गटविकास अधिकारी विजय चव्हाण व पंचायत समिती सभापती डॉ. मनोज सारंग यांचा मोलाचा वाटा आहे.




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या दहा महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

रक्षाबंधन दिनानिमित्त

Heartiest Greetings to all brothers and sisters on this auspicious occasion of #RakshaBandhan

नागपूर येथील मिहानमध्ये रिलायन्स ग्रुपतर्फे संरक्षण सामग्री निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्यानिमित्त

It is indeed a pleasure to inform that Dhirubhai Ambani AerospacePark in MIHAN is first of its kind in India in defence manufacturing sector

I congratulate and thank Shri Anil Ambani & reliancegroup for choosing MIHAN which is a milestone towards making Nagpur, an aviation hub.

बेंबला प्रकल्पाला भेट दिल्यानंतर

Visited Bembla irrigation project site,Dehani Irrigation project site,interacted with PAPs & chaired review meeting

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन मधील घराच्या खरेदीसंदर्भात

Maharashtra Government formally does the deed of exchange to buy the house where Dr. Babasaheb Ambedkar used to live in London.

कल्याणच्या विकासासाठी एमएमआरडीए ने १०८९ कोटी रुपयांची मंजुरी दिल्यानंतर

MMRDA approves Rs. 1089 crore for Kalyan Growth Centre across 27 villages which will lead to employment generation & balanced development.

भालचंद्र पेंढारकर यांच्या निधनाने रंगभूमीला पवित्र तीर्थ मानणारा,अतिशय निरलसपणे मराठी रंगभूमीची सेवा करणारा ज्येष्ठ रंगकर्मी आपण गमावला आहे.

राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त

My Salutations to the great freedom fighter and a revolutionary #Rajguru on His Birth Anniversary !

केंद्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची स्थापना करणार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर खरेदीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केल्याबद्दल

Thank you Hon @narendramodiji for the support & appreciation in #MannKiBaat for Dr. Ambedkar's memorial&London house.

लघुउद्योगांना आव्हाने स्वीकारण्याचे आवाहन करताना

Small scale enterprises must convert their challenges into opportunities &enter the present day competition.It helps in nation's growth too.

दुष्काळासंदर्भात मदत करण्याचे अश्वासन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी दिल्यानंतर

Thank You Hon @sureshpprabhu ji for extending immediate help & support to State Govt in drought mitigation measures.

## शूरांना अभिवादन

**राष्ट्रपती पोलीस शौर्य पदकप्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिवादन करताना**

**Saluting brave officers who were awarded President's Police Medal at the hands of Hon Governor C. Vidyasagar Raoji.**






सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२३६८
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार, सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...७८२ भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ६५ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th September 2015
Date of Publication : 10th of every Month


# लोकमान्य : लोकराज्य





















सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे–बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक